अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै २०१० | किंमत १५ रुपये

दिवाळी अंक २०१०
वाचकांसाठी स्पर्धा
पान नं ७,८,९ पहा












# ‘जिना प्रकाशन सोहळा’



‘जिना’ पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रकाशक सुनील मेहता, सुनील गाडगीळ, अशोक पाध्ये आणि माधव गाडगीळ

---

# मना सर्जना प्रकाशन सोहळा



‘मना सर्जना’ पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर

◆ जुलै २०१०
◆ वर्ष दहावे
◆ अंक सातवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | १८ |
| पुस्तक परिचय | |
| अ बेटर इंडिया, अ बेटर वर्ल्ड : अनु. चित्रा वाळिंबे | ४८ |
| गर्ल्स ऑफ रियाध : अनु. स्नेहल जोशी | ५६ |
| द फकीर : अनु. सुनीति काणे | ६२ |
| हे वयच वेडं असतं : शुभांगी खासनीस प्रसन्न रबडे । केतकी काळे | ७४ |
| पुरस्कार | ९२ |
| वाचकांचा प्रतिसाद | ९६ |
| श्रद्धांजली | ९८ |
| बालनगरी | १०४ |


संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email** - info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## संपादकीय - कॉमनवेल्थ साहित्य पुरस्कार

सध्या पुस्तकांना पुरस्कार देण्यासाठी अनेक संस्था पुढाकार घेत आहेत. ही गोष्ट निश्चितच स्वागतार्ह आहे. या पुरस्कारांमुळे लेखकांना काही रक्कम मिळते, त्यापेक्षाही त्यांना मान्यता मिळते. इतर अनेक लेखकांपेक्षा त्यांचे वेगळेपण किंवा गुणवत्तेतील श्रेष्ठत्व अधोरेखित होते. एक कलावंत म्हणून त्याची श्रेणी वरची ठरते आणि पुरस्कारप्राप्त पुस्तकाची मागणी वाढून प्रकाशकालाही लेखकाप्रमाणेच अधिक अर्थप्राप्ती होऊ शकते.

फ्रान्समध्ये कादंबरीला एक पुरस्कार आहे, त्याची पुरस्काराची रक्कम पाच सात हजाराच्या आसपासच असते. परंतु तो पुरस्कार ज्या कादंबरीला जाहीर होतो, त्या कादंबरीच्या ३/४ लाख प्रती अल्पावधीत विकल्या जातात. त्यामुळे ते पुस्तक आणि तो लेखक यांच्यावर एकदम प्रकाशझोत टाकला जातो.

पुरस्काराच्या रकमेपेक्षा त्या पुरस्काराने लक्षावधी वाचकांपर्यंत पुस्तक पोचते, या गोष्टीला खरे महत्त्व आहे. अशी प्रतिष्ठा असणारे पुरस्कार अर्थातच मोजकेच असणार; परंतु ते पुरस्कार गुणवत्तेची आणि वेगळेपणाची अलिखित हमी देणारे असतात आणि वर्षानुवर्षे वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरलेले असतात. यात त्यांचे मोठेपण आणि माहात्म्य सामावलेले असते. नोबेल पुरस्कार, मानबुकर प्राईझ, कॉमनवेल्थ रायटर प्राईझ, ऑरेंज पुरस्कार, पुलिट्झर प्राईझ, दि मुस्लिम रायटर्स ॲवॉर्ड, डेसमाँड एलियट प्राईझ, वगैरे पुरस्कारांना आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगली मान्यता आहे.

भारतीय पातळीवरचे पुरस्कार आणि महाराष्ट्र पातळीवरचे पुरस्कारही बरेच आहेत. त्यांचे आपापल्या परीने महत्त्व आहेच. ते मिळाल्याने लेखकाची प्रतिष्ठा आणि कीर्ती वृद्धिंगत होते; थोडीबहुत आर्थिक प्राप्तीही होते. पुरस्कारामुळे पुस्तकाच्या विक्रीला चालना मिळणे हे मात्र या बहुसंख्य पुरस्कारांबाबत क्वचितच दृष्टोत्पत्तीस येते. त्याची अनेक कारणे देता येतील. पण त्यांचा विचार येथे प्रस्तुत नाही. प्रस्तुत एवढेच आहे की पुरस्कारामुळे पुस्तकाचा गाजावाजा व्हावा, त्याची मागणी व्हावी, त्याचा खप व्हावा, त्याचा आनंद लक्षावधी रसिकांनी घ्यावा. वाङ्मयीन अभिरुचीचे संवर्धन व्हावे.

पुरस्कारांना प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी निवड समितीच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता हवी. सर्वसामान्य वाचक, जाणकार अभ्यासक, ग्रंथपाल, विविध वाङ्मयीन प्रवाहांचे प्रतिनिधित्व करणारे परीक्षक वगैरेंना त्या प्रक्रियेत स्थान असावे. परंतु ही प्रक्रिया खूप वेळ घेणारी आणि खूप खर्चिक असते; त्यामुळे केवळ मोठ्या पुरस्कारांबाबतच ही प्रक्रिया स्वीकारणे शक्य होते. छोटे पुरस्कार हे कोणाच्यातरी वैयक्तिक लहरीवर अवलंबून राहतात. त्यामुळे त्या पुरस्कारांची गुणवत्ता सर्वांना स्वीकारार्ह वाटतेच असे नाही.

'कॉमनवेल्थ रायटर्स प्राइझ'च्या निवड प्रक्रियेकडे या दृष्टीने लक्ष वेधावेसे वाटते. सलमान रश्दी, मायकेल ओंडालो, लुई द बर्नियर्स यांच्यासारख्या मान्यवर कादंबरीकारांना हा पुरस्कार यापूर्वी मिळालेला आहे.

या पुरस्कारासाठी पूर्वाश्रमीच्या ब्रिटिश साम्राज्यातील देशांच्या म्हणजे सध्याच्या राष्ट्रकुलातील देशांच्या लेखकांना भाग घेता येतो. त्यामुळे स्पर्धकांमध्ये खूपच विविधता असते; आणि निवडीचे काम अवघड ठरते.

यंदाच्या पुरस्काराच्या शॉर्ट लिस्ट मधे एकूण सात लेखकांचा समावेश होता. त्यात दक्षिण आफ्रिकेतील मेरी हीसे (Marie Heese), कॅनडातील मायकेल क्रमी आणि शँडी मिटवेल, ऑस्ट्रेलियातील ग्लेंडा गेस्ट यांचा समावेश होता. नायजेरिया, ग्रेट ब्रिटन, सामोवा, भारत यांचेही कादंबरीकार स्पर्धेत होते. नायजेरियन कादंबरीत तेथील भ्रष्टाचाराचे सर्वंकष स्वरूप स्पष्ट करणारी आणि समाजजीवनाचे चित्रण करणारी कादंबरी अनेक परीक्षकांना धक्कादायक वाटली. भ्रष्टाचाराला प्रतिष्ठा आणि मान्यता देण्याची तेथील प्रणाली तेथील समाजजीवनातील नैतिकतेचा पायाच दोलायमान करीत आहे. जगभर नायजेरिअन तरुणांनी आणि माफियांनी आपले मायाजाल पसरले असून 'तुम्हाला पाच कोटी डॉलर्सची लॉटरी लागली आहे. तिची रक्कम घेण्यासाठी प्रोसेसिंग शुल्क अमुक अमुक खात्यावर भरा' यासारखे संदेश ई-मेल वर पाठवून हजारो लोकांना लुबाडले जात आहे. सरकारी कामकाजात भ्रष्टाचाराशिवाय पान हालत नाही. या कादंबरीतील अशा घटनांनी डोके गरगरायला लागते.

कॅनडा आणि सामोवा या देशातील समाजवास्तवाचे दर्शन घडविताना सांस्कृतिक आणि आर्थिक विषमतेकडे आणि संघर्षाकडे लक्ष वेधले आहे.

भारतीयांना अभिमान वाटावी अशी घटना म्हणजे राणा दासगुप्ता यांना 'सोला' या कादंबरीबद्दल 'ओव्हरऑल' पुरस्कार मिळाला. राणा दासगुप्ता यांनी या पुरस्काराबद्दल धन्यता प्रकट केली. या निमित्ताने इंग्लंडच्या राणीसाहेबांना प्रत्यक्ष भेटायची संधी मिळेल याचाही आनंद त्यांनी व्यक्त केला.

ऑस्ट्रेलियाच्या ग्लेंडा गेस्ट हिला उत्तम प्रथम कादंबरीबद्दलचा पुरस्कार मिळाला. ब्रिटिश कादंबरीकाराला कॉमनवेल्थ रायटर्स प्राइझचा सन्मान मिळाला.

कॉमनवेल्थ फाउंडेशनचे संचालक मार्क कॉलिन्स यांनी यंदाच्या स्पर्धेतील कादंबऱ्या खूपच आक्रमक आणि वास्तवाचे अंतर्भेदक चित्रण करणाऱ्या होत्या, असे निरीक्षण नोंदवले.

बुकर पुरस्कारही कॉमनवेल्थ देशातील लेखकांना दिला जातो. त्याची निवड प्रक्रियाही खूप व्यापक आहे.

आपल्याकडे ज्ञानपीठ, सरस्वती सन्मान वगैरे पुरस्कारांसाठीही खूप दक्षता घेतली जाते. पण वाङ्मयप्रकारांची विविधता, भाषावैचित्र्य, अनुवादांचा अभाव वगैरे कारणांनी पारदर्शकतेपेक्षा एकमेकांची सोय बघण्यावर भर दिला जातो. त्यामुळे या पुरस्कारांचे महत्त्व कमी होत नाही. परंतु त्याचे निखळ वाङ्मयीन स्वरूप मात्र गौण ठरते.



## सभासदांना सूचना

सध्या पोस्टातून अंक न मिळाल्याच्या किंवा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आमचे पोस्टिंग दर महिन्याच्या ११ तारखेला नियमित होत असते. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. तरीही अंक न मिळाल्यास फोन किंवा पत्र आल्याबरोबर आम्ही लगेच दुसरा अंक पाठवतो. कृपया वाचकांनी ही वस्तुस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे ही विनंती. गैरसमज नसावा.

**संपादक**

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. ही विनंती.

# दिवाळी अंक २०१०

## रसिक वाचकांसाठी स्पर्धा
## एक हजार रुपयांची पुस्तके बक्षिस मिळवा

**वाचक मित्रांनो,**

- या दिवाळी अंकासाठीही एक स्पर्धा जाहीर करत आहोत.

- ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. फक्त अट एवढीच की इ.स. २००९-२०१०मध्ये तुम्ही एका पेक्षा जास्त पुस्तके विकत घेऊन वाचलेली असावीत.

- किमान दोन पुस्तके तरी दोन वर्षात विकत घेतलेली असणे आवश्यक. त्यासाठी बिल वगैरे पुरावा देण्याची गरज नाही. तुमच्या शब्दावर आमचा विश्वास आहे.

- आपण खरेदी केलेल्या पुस्तकांची नावे **(जास्तीत जास्त दहा)** पोस्टकार्डावर लिहून कळवा.

- त्यातील तुम्हाला सर्वात जास्त आवडलेल्या पुस्तकाबद्दल तीनचार ओळीत माहिती द्या.

- या स्पर्धेत भाग घेणाऱ्यांची नावे दिवाळी अंकात छापण्यात येतील.

- लॉट टाकून यशस्वी ठरणाऱ्या दोन स्पर्धकांना प्रत्येकी १००० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील

**पत्र पोचण्याची अंतिम मुदत ५ सप्टेंबर २०१०**

**आमचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४

# दिवाळी अंक २०१०

## बालमित्रांसाठी स्पर्धा
## गमतीदार बातमी कळवा
## बक्षीस मिळवा

**बालमित्रांनो,**

यावर्षी तुमच्यासाठी एक मजेदार स्पर्धा घेणार आहोत. अगदी सोपी आणि मस्त. बारावी पर्यंतच्या मुलामुलींना या स्पर्धेत भाग घेता येईल.

- तुमच्या घरी रोज सकाळ, लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स यासारखे एखादे दैनिक येतच असेल, ते तुम्ही वाचतही असाल. त्यातली एखादी बातमी तुम्हाला मजेदार वाटत असेल, ती वाचून तुम्हाला हसू आले असेल, मित्रांना ती बातमी सांगाविशी वाटली असेल.
- आमची स्पर्धा अशा मजेदार बातमीबद्दलचीच आहे.
- अशी मजेदार बातमी वाचनात आली तर ती कापून एका कोऱ्या कागदावर चिकटवा. त्या वर्तमानपत्राचे नाव, तारीख त्या बातमीखाली लिहा. ती बातमी तुम्हाला मजेदार का वाटली ते ४/५ ओळीत लिहा. खाली तुमचे नाव, इयत्ता, शाळा व घरचा पत्ता, फोन हे सर्व लिहा. आणि हा बातमी चिकटवलेला कागद आम्हाला पोस्टाने, कुरिअरने पाठवा.
- आम्हाला आवडलेल्या निवडक बातम्या दिवाळी अंकात छापू. पहिल्या तीन ठरणाऱ्या बातम्यांना प्रत्येकी ५०० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून देऊ.
- तर मग आजपासूनच दैनिकातील मजेशीर बातम्या शोधायला लागा.
- **जुलै-ऑगस्ट** या दोन महिन्यातील बातम्यांतून गमतीदार बातम्या निवडा. पाठवा. आहे की नाही मज्जा?
- **अंतिम मुदत ५ सप्टेंबर २०१०**

**आमचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०. फोन – ०२०-२४४७६९२४

## धुलाईयंत्रात जाऊनही मांजर सुखरूप

सिडनी : मांजरांना उगाच लुडबूड करण्याची खोड असते आणि अनेकदा ती त्यांच्या जीवावरही बेतू शकते. असाच एक प्रसंग येथील एका मांजराच्या बाबतीत घडला. किंबा नावाचे हे मांजर मालकाच्या नकळत आराम करण्यासाठी घरातल्या धुलाई यंत्रात शिरले. पण, त्याचा आराम फार काळ टिकला नाही. कारण, काही वेळातच मालक लिंडसे रॉगर यांनी धुलाई यंत्र सुरू केले. अर्ध्या तासाने त्यांनी धुलाई यंत्र उघडले, तेव्हा त्यांना आतून 'म्याव' आवाज आला. त्यांनी नीट तपासले, तेव्हा त्यांना धक्काच बसला. आत किंबाबाई होत्या. कपड्यांबरोबरच त्यांचीही चांगलीच धुलाई झालेली होती. त्यानंतर रॉगर यांनी तातडीने किंबाला जवळच्या पशुरुग्णालयात नेले. वेळीच उपचार केले म्हणून मांजर वाचले.

## चोरानेच बोलावले पोलिसांना

बोस्टन (अमेरिका) : येथील एक चोर एका दुकानात चोरी करण्यासाठी गेला, पण तो स्वतःच अडचणीत सापडल्याने त्याच्यावर पोलिसांना फोन करण्याची वेळ आली. त्याचे झाले असे; दक्षिण बोस्टनमधील एका दुकानात सर्व तयारीनिशी हा चोर पोचला. त्याला एका खिडकीतून आत घुसण्याची युक्ती सुचली. खिडकीला लोखंडी जाळी बसवलेली होती, तिचे गज वाकवून आत घुसण्याचे त्याने ठरवले. त्याप्रमाणे गज वाकवला आणि गजातून तो आत शिरला; पण हाय! येथेच त्याचा अंदाज चुकला. त्या जाळीत तो अशा पद्धतीने अडकला, की त्याला अजिबात हलता येत नव्हते. शेवटी मदतीसाठी त्याने आपल्या मोबाईलवरून पोलिसांना फोन केला. पोलिसांनी तातडीने येऊन त्याची सुटका केली आणि नंतर त्याला रीतसर अटकही केली.

## जन्म आणि लग्नही साथ साथ

बुशकिल (अमेरिका) : काही लोकांच्या बाबतीत बरेच योगायोग जुळून येतात. पेनसिल्वानिया प्रांतातल्या ॲमी सिंगले आणि स्टीव्हन स्मिथ त्यापैकी एक. ते दोघेही एकाच दिवशी, एकाच रुग्णालयात, जन्माला आले. त्यांच्या जन्मानंतर दोघांच्याही माता रुग्णालयाच्या एकाच खोलीमध्ये राहिल्या. आता ते दोघेही एकमेकांशी लग्न करणार आहेत. याचे कारण त्यांच्या आयांनी बाळंतपणाच्या वेळेस झालेली मैत्री शेवटपर्यंत टिकवली. त्यांच्या मैत्रीचा हा वारसा त्यांची मुले, ॲमी आणि स्टीव्हन यांनी पुढे चालवला आणि एकमेकांशी मैत्री केली. त्यातूनच स्टीव्हनने ॲमीला लग्नाची मागणी घातली आणि तिनेही होकार दिला. आता लवकरच ते विवाहबद्ध होणार आहेत.

**आगामी**




# चिकन सूप फॉर द कपल्स सोल

■

**लेखन व संकलन**

जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन / मार्क ॲण्ड क्रिसी डोनेली आणि बार्बरा डी एन्जेलिस

अनुवाद

**अवंती महाजन**

■

**१६०रु. पोस्टेज २५रु.**

देवाने गाठी जरी स्वर्गात बांधल्या, तरी विवाह साजरे होतात इथे पृथ्वीवरच!
ते निभवावेही लागतात आपल्या तुपल्यालाच!
कसं निभावतो आपण हे नातं? - त्याच्या या कथा!
एकांड्या आयुष्यात दुसऱ्याचा प्रवेश झाला, की जीवनाचे आयाम बदलतात. मग प्रेमाच्या बहरात सप्तरंगी स्वप्नं फुलतात. रोमान्स, स्फूर्ती, उत्साहाची कारंजी उडतात. जबाबदारी वाढली की संघर्ष आला - संकटं आली!
एकमेकांच्या मदतीनं त्यांनाही तोंड देण्याची हिंमत येते.
प्रेम कार्यप्रवण बनवतं - प्रेम व्यक्तीला स्वतंत्र करतं.
कधी भानावर आणायचं कर्तव्य पार पाडतं - कधी आत्मभान जागृत करतं!
एकमेकाला गृहीत धरलं तरी एकमेकाचा आदर करायला शिकवतं.
मुरलेले प्रेम जन्मोजन्मीची साथ करतं. हळुवार प्रेम तितकंच कणखरही असतं. कुटुंब-समाज अशा अवघ्या पसाऱ्यात स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घ्यायला प्रवृत्त करतं. पती-पत्नीच्या सहजीवनाच्या अशा या कथा आपल्या प्रत्येक भावनेला स्पर्श करतात. काही कथा जुन्या - पण आजही तितक्याच ताज्या वाटणाऱ्या - कालातीत! देशातीतही. फरक फक्त संस्कृतीचा आहे.
पाश्चात्य संस्कृतीच्या चष्म्यातून कथा वाचल्या, की लक्षात येतं, अरे या तर आपल्याच कथा - आपल्या आयुष्यात आपल्या आसपास घडणाऱ्या! कपल्ससाठी असणारं हे 'चिकन सूप', 'तुमचं - आमचं सेम असतं' याची प्रचीती देणाऱ्या!

**आगामी**




# चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल

■

जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन पॅटी आणि नॅन्सी मिचेल / हेदर आणि केटी मॅकनमारा

अनुवाद
**सुनीति काणे**

■

**२५०रु. पोस्टेज ३०रु.**

आपल्याला बहीण असणं आणि आपण कुणाची तरी बहीण असणं किती भाग्याचं आहे याचा साक्षात्कार घडवणाऱ्या हृद्य कथा!
''ती नेहमीच माझ्या पाठीशी उभी असते.''
''तिच्याविना मी सैरभैर होईन!''
''मी तिला काहीही सांगू शकते.''
''मी तिच्याशी दिवसा-रात्री कधीही बोलू शकते.''
'चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल' मधल्या कथांमधून वारंवार येणारी ही वाक्यं खूपच बोलकी आहेत.
हे पुस्तक म्हणजे ह्या अनोख्या नात्याची थोरवी मानण्याचा एक उत्सवच आहे!
बहिणी असतात आपल्या अत्यंत मौल्यवान अनुभवांच्या खजिनदार.
आपली सुख-दु:ख वाटून घेणाऱ्या साक्षीदार. कुटुंबाच्या वाट्याला आलेले काळेकुट्ट क्षण जोडीनं भोगणाऱ्या सख्या.
आपल्याला सर्वाधिक ओळखणाऱ्या आपल्या मैत्रिणी.
विविध अनुभवांद्वारे या कोमल नात्याचे अनेक तलम पदर उलगडून दाखवणाऱ्या ह्या प्रेरणादायी कथा आपल्या मनाच्या सहसंवेदनेची तार झंकारत ठेवतात!

**आगामी**

# मीरेच्या प्रेमतीर्थावर




**ओशो**

अनु. **स्वाती चांदोरकर**

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

मीरा

मीरा म्हणजे भक्ती.

भक्तीने परमात्मा साध्य करणारे अनेक आहेत आणि तरीही मीरा वेगळी आहे.

का?

ओशो सांगतात की भक्तिसाराची इतकी पारदर्शकता मीरामध्ये आहे,

की ही पारदर्शकताच तिचं वेगळेपण सिद्ध करते.

मीरा कृष्णमय आहे हे कुणी नव्याने सांगायला नको.

पण आपण तिची भक्ती बघून मीरामय होऊन जातो हे निश्चित.

भक्तिमार्ग हा सर्वांत कठीण मार्ग. न दिसणाऱ्या परमात्म्यावर तन, मन, भान विसरून प्रेम करणं, स्वत:ला त्याच्यावर सोपवून देणं हे कठीणच. आणि म्हणूनच मीराचं कृष्णासाठी केलेलं समर्पण अनमोल आहे.

यमक जुळतंय की नाही याची विवंचना न करता जे हृदयातून उमटत गेलं असं ते काव्य, गीत, भजन आजही आपल्या हृदयाला भिडतात आणि मीरा म्हणते 'मैं तो प्रेम दीवानी'.

हा तिचा भाव, ही तिची भावदशा आपल्यालाही भारावून टाकते.

आगामी

# ज्याचं करावं भलं...




**निरंजन घाटे**

१००रु. पोस्टेज २०रु.

'निरंजन'च्या लेखनातला सूक्ष्म विनोद मला फार आवडतो, असं श्री. घाटे यांचे बरेच लेखकमित्र आणि वाचकमित्र म्हणतात. श्री. घाटे यांनी उमेदीच्या काळात 'मनोहर'मध्ये 'मेरी गो राऊंड' हे हलकं फुलकं, विनोदाची झाक असलेलं सदर चालवलं होतं. याशिवाय 'वटवट' नावाच्या विनोदाला वाहिलेल्या मासिकाची बरीच जबाबदारी – विशेषत: पानं भरायची जबाबदारी घाटे यांच्यावर असे.

घाटे यांना जवळून ओळखणाऱ्यांना घाटे यांच्याकडे असलेल्या विनोदांचा साठा किती मोठा आहे याची कल्पना आहेच; पण त्यांच्या बोलण्यातला मिस्कीलतेचा भावही ते विसरू शकत नाहीत.

घाटे यांच्या मूळ स्वभावाचा परिचय करून देणाऱ्या या एक प्रकारे गप्पाच आहेत.

ते विज्ञानलेखनाकडे वळले आणि त्यांचं असं हलकं फुलकं लेखन मागं पडलं.

'ज्याचं करावं भलं' द्वारा या त्यांच्या कथांना पुन्हा उजाळा मिळतोय, ही एक चांगली गोष्ट आहे.या कथांमुळे तत्कालीन तरुणाईचंही दर्शन आजच्या वाचकाला होईल.

कै. विष्णु सखाराम तथा भाऊसाहेब खांडेकर यांच्या एकूण साहित्यकृतींच्या रत्नमाळेतील ‘ययाति’चे स्थान मेरुमण्यासारखे आहे.




# ययाति

## वि. स. खांडेकर

**२००रु. पोस्टेज २५रु.**

एका पौराणिक कथेच्या आधाराने एक सर्वोत्तम ललितकृती कशी निर्माण करता येते, याचा आदर्श वस्तुपाठच ‘ययाति’च्या रूपाने वि. स. खांडेकरांनी वाचकांपुढे ठेवला आहे.

कामुक, लंपट, सप्नातही ज्याला संयम ठाऊक नाही, असा ययाति; अहंकारी, महत्त्वाकांक्षी; मनात दंश धरणारी आणि प्रेमभंगाने अंतरंगात द्विधा झालेली देवयानी; स्वत:च्या सुखाच्यापलीकडे सहज पाहणारी आणि ययातिवर शरीरसुखाच्या, वासनातृप्तीच्या पलीकडच्या प्रेमाचा वर्षाव करणारी शर्मिष्ठा आणि निरपेक्ष प्रेम हाच ज्याचा स्वभावधर्म होऊन बसला आहे, असा विचारी, संयमी व ध्येयवादी कच या चार प्रमुख पात्रांमधील परस्परप्रेमाची विविध स्वरूपे या कादंबरीत समर्थपणे चित्रित झाली आहेत.

‘ही कादंबरी ययातीची कामकथा आहे, देवयानीची संसारकथा आहे. शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्तिगाथा आहे, हे लक्षात घेऊन वाचकांनी ती वाचावी,’ अशी अपेक्षा स्वत: खांडेकरांनीच प्रकटपणे व्यक्त केली आहे.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

प्रीती म्हणजे उदात्त करूणा आणि आपुलकीच्या शिंपणानं
बहरलेली अमृतवेल

# अमृतवेल

## वि. स. खांडेकर




**१००रु. पोस्टेज २०रु.**

'...या चित्रातल्या वेलीवर नाना रंगांची फुलं उमलली आहेत. प्रीतीही या वेलीसारखीच आहे, बाळ. प्रीती म्हणजे केवळ यौवनाच्या प्रेरणेतून उद्भवणारी वासना नव्हे! त्या वासनेची किंमत मी कमी मानत नाही. साऱ्या संसाराचा आधार आहे ती! पण या वासनेला जेव्हा खोल भावनेची जोड मिळते, तेव्हाच प्रीती ही अमृतवेल होते. मग या वेलीवर करूणा उमटते, मैत्री फुलते. मनुष्य जेव्हा - जेव्हा आत्मप्रेमाचे कवच फोडून बाहेरच्या विश्वाशी एकरूप होतो, तेव्हा -- प्रीतीचा खरा अर्थ जाणवतो. या बाहेरच्या विश्वात रौद्र - रम्य निसर्ग आहे, सुष्टदुष्ट माणसं आहेत, साहित्यापासून संगीतापर्यंतच्या कला आहेत, आणि महारोग्याच्या सेवेपासून विज्ञानातल्या संशोधनापर्यंतची आत्म्याची तीर्थक्षेत्रं आहेत.

'पण हीच नुसती आत्मकेंद्रित झाली, आत्मपूजेशिवाय तिला दुसरं काही सुचेनासं झालं, म्हणजे मनुष्य केवळ इतरांचा शत्रू होत नाही; तो स्वत:चाही वैरी बनतो! मग या वेलीवर विषारी फुलांचे झुबके लटकू लागतात...'

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## वि. स. खांडेकर यांच्या कादंबऱ्या




### पहिले प्रेम

माणसाच्या पहिल्या प्रेमाबद्दल...

**१००रु. पोस्टेज २०रु.**




### हिरवा चाफा

विसाव्या शतकाच्या सुरवातीच्या काळातील जीवनपद्धतीतील बदलांचा पट मांडणारी कादंबरी

**१५०रु. पोस्टेज २५रु.**




### रिकामा देव्हारा

कला, धर्म आणि संस्कृती यांच्या नावाखाली समाजात निर्माण झालेल्या भीषण विषमतेचं दर्शन घडवणारी कादंबरी

**१००रु. पोस्टेज २५रु.**




### क्रौंचवध

उत्तररामायणातील काव्याचा आधार घेऊन वि. स. खांडेकरांनी या कादंबरीची निर्मिती केली

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

## वि. स. खांडेकर यांचे कथासंग्रह

### भाऊबीज




कादंबरीची प्रकरणे शोभावीत, अशा ह्या
वि. स. खांडेकरांच्या पहिल्या-वहिल्या कथा

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

---

### विद्युत-प्रकाश




मनात विचारांची विलयं निर्माण
करणाऱ्या कथा

**९०रु. पोस्टेज २०रु.**

---

### ढगाआडचे चांदणे



कथांच्या अनुषंगाने चिंतनाचे, विचारसौंदर्याचे,
भावसौंदर्याचे होणारे मनोरम दर्शन

**६०रु. पोस्टेज २०रु.**

---

### अबोली



वि. स. खांडेकरांची सर्व लेखन वैशिष्ट्ये
व्यक्त करणाऱ्या कथा

**८०रु. पोस्टेज २०रु.**

# साहित्यवार्ता



*** 'समग्र सेतुमाधवराव' प्रकाशित होणार**

विद्याव्यासंग, संशोधनासाठी सतत भ्रमंती आणि परिश्रम, लेखन आणि अफाट लोकसंग्रह यांच्या आधारे सुमारे साठ वर्षे सलगपणे संशोधनात्मक अभ्यासात रमलेल्या सेतुमाधवराव पगडी यांच्या संपूर्ण लेखनकार्याचा मागोवा घेणारा 'समग्र माधवराव पगडी' हा ग्रंथराज लवकरच प्रकाशित होत आहे. आंध्र प्रदेश मराठी साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी हा महत्त्वाकांक्षी ग्रंथप्रकल्प सिद्ध केला आहे. २७ ऑगस्ट २०१० रोजी पगडी यांच्या जन्मशताब्दीच्या सांगतेला हा ग्रंथ प्रकाशित होणार आहे.

हैदराबाद येथील ज्येष्ठ अभ्यासक द. प. जोशी आणि उषा जोशी यांनी या ग्रंथाच्या संपादनाचे काम केले असून, डॉ. विद्या देवधर आणि प्रा. धनंजय कुलकर्णी हे सहायक संपादक आहेत. याशिवाय एकूण सहा खंडांत हा ग्रंथराज विभागण्यात आला आहे. पगडी यांचे लेखन मराठीप्रमाणेच इंग्रजीतही असल्याने दोन खंड इंग्रजीत प्रकाशित होणार आहेत. मराठी खंडांमध्ये पहिल्या खंडात पगडी यांचे आत्मचरित्र व ललित गद्य, दुसऱ्या आणि तिसऱ्या खंडात इतिहास, चौथ्या खंडात संस्कृती विचार व अन्य विषय, पाचव्या खंडात 'उर्दू साहित्य रंग-१', तर सहाव्या खंडात 'उर्दू साहित्य रंग-२' असा विस्तार आहे.

खंडांची संपादने डॉ. उषा जोशी, डॉ. राजा दीक्षित, प्रा. निशिकांत ठकार, डॉ. अब्दुल सत्तार दळवी यांनी केली आहेत. इंग्रजी खंडात 'कम्प्लीट वर्क्स ऑफ सेतुमाधवराव पगडी' भाग-१ आणि भाग-२ यांचा समावेश आहे. संपादन डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी केले आहे. संपूर्ण हयात इतिहास संशोधनात व्यतीत करून देशाच्या, महाराष्ट्राच्या संशोधन संचितात मोलाची भर घालणारे सेतुमाधवराव पगडी यांचे हे समग्र वाङ्मयीन कर्तृत्व संग्रही ठेवण्यासाठी प्रकाशनपूर्व नोंदणी करता येणार आहे. अधिक माहितीसाठी ०४०-२४६५७०६३, ०४०-२४६०२६५५ किंवा ०९४४०३७३७७७, ०९२९०५६०४८२ येथे संपर्क करता येईल.

*** किंडल इलेक्ट्रॉनिक बुक रीडर**

ॲमेझॉनच्या किंडलला आता ॲपलच्या आयपॅडने मात देण्यास सुरुवात केली

असली, तरी किंडलचा भर यापुढेही इलेक्ट्रॉनिक बुक रीडर म्हणूनच राहणार आहे. त्याचे कलर मॉडेल लगेच निघणार नाही; कारण त्याचा वाचनासाठी उपयोग नाही, असे ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझॉस यांनी सांगितले.

ते म्हणाले की, किंडलचा वापर वाचनासाठी आहे. जगातील सर्वोत्तम इलेक्ट्रॉनिक रीडर म्हणून त्याने नाव कमावले आहे. कॅमेरा ऑन फोन व डेडिकेटेड कॅमेरा यापेक्षा किंडल वेगळे आहे. माझ्याकडे स्मार्टफोनमध्ये कॅमेरा आहे. तो मला आवडतो. तो नेहमीच माझ्याबरोबर असतो. पण माझ्याकडे त्याशिवाय छोटा कॉम्पॅक्ट तसेच एसएलआर कॅमेरा आहे. किंडल निश्चितच एलसीडी यंत्रांशी स्पर्धा करील. त्यात आयपॅड आहे. काही लोकांना एखादी विशिष्ट गोष्टच आवडते, ज्यांना वाचनाची आवड आहे ते किंडल वापरतीलच. ॲपलने आयपॅड आणले असले व त्यात इ रीडरची सोय असली तरी त्यात व्हिडिओ, संगीत, प्ले-गेम, वेब सर्फिंग या इतर सुविधा आहेत, त्यामुळे ग्राहकाचे लक्ष विचलित होते. आयपॅडला कलर एलसीडी डिस्प्ले आहे तर किंडलला कृष्ण-धवल डिस्प्ले आहे त्यात, इलेक्ट्रॉनिक इंक तंत्रज्ञान वापरले आहे. एलसीडी डिस्प्ले हा दीर्घकाळ वाचनासाठी उपयुक्त नाही. त्याने डोळ्यांवर ताण येतो. ॲमेझॉनची सर्वाधिक गुंतवणूक ही चीनमध्ये असेल व तेथे मोठी बाजारपेठ आहे असे ते म्हणाले.

*** कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे पुण्यात 'ग्रंथ तुमच्या दारी'**

वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी नाशिक शहरातील यशानंतर 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'तर्फे आता पुण्यामध्ये 'ग्रंथ तुमच्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. केसरीवाडा येथील लोकमान्य सभागृह येथे १२ जून रोजी प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, कार्यवाह ॲड. विलास लोणारी आणि कुसुमाग्रज स्मारकाचे अध्यक्ष आमदार हेमंत टकले यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

मराठी भाषेला मान-सन्मान, प्रतिष्ठा लाभावी म्हणून आयुष्यभर ध्यास घेतलेले कवी कुसुमाग्रज यांनी वाचन संस्कृती वाढवावी म्हणून, सतत प्रयत्न केले. त्यांच्या या प्रेरणेनेच कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे नाशिक येथे 'ग्रंथ तुमच्या दारी' हा उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. जवळपास ग्रंथालय नाही अशा ठिकाणच्या एखाद्या संस्थेच्या माध्यमातून किंवा सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या माध्यमातून ही योजना राबविली जाते. अशा इच्छुक व्यक्ती किंवा संस्थेस प्रतिष्ठानतर्फे शंभर वाचनीय पुस्तकांची पेटी विनामूल्य सुपूर्द केली जाते. या पेटीतील पुस्तके त्या भागातील नागरिकांना वाचनासाठी द्यायची, अशा रितीने सर्व पुस्तके वाचून झाल्यावर प्रतिष्ठानला कळवायचे. त्यानंतर प्रतिष्ठानतर्फे कोणतेही

शुल्क न आकारता जुनी पेटी परत घेऊन शंभर पुस्तकांची नवीन पेटी दिली जाते.

या योजनेतंर्गत दिल्या जाणाऱ्या एका पुस्तक पेटीची किंमत अंदाजे १५ हजार रुपये असते. नाशिकमध्ये असे तीस, तर पुण्यासाठी पंधरा प्रायोजक आहेत. या योजनेसाठी प्रायोजक मिळवण्याचे कार्य प्रतिष्ठानच्या वाचनालय समितीचे सहकार्यवाह विनायक रानडे करीत असून, त्यांनी कुसुमाग्रज स्मारकातील वाचनालय उभारणीसाठीदेखील देणगी मिळवली आहे. 'ग्रंथ तुमच्या दारी' या योजनेचे पुण्यातील समन्वयक म्हणून रुपेंद्र मोरे काम करणार असून, त्यांना श्याम पाडेकर यांचे सहकार्य आहे. इच्छुक व्यक्ती किंवा संस्थेस शंभर वाचनीय पुस्तकांची पेटी हवी असल्यास त्यांनी श्री. मोरे यांच्याशी ९४२३१४८०४८ किंवा rupendramore5@yahoo.com या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

*** डॉ. पांडे यांच्या 'पक्षी लोणावळा-खंडाळ्याचे' पुस्तक प्रकाशन**

लोणावळा आणि खंडाळ्यात आढळणारे पक्षी, फुलपाखरे आणि सरपटणाऱ्या प्राण्यांची सोप्या शब्दांत शास्त्रीय माहिती निसर्गप्रेमींना आता 'लोणावळा-खंडाळ्याचे पक्षी' या पुस्तकातून मिळणार आहे. विद्यार्थी, तसेच सर्वसामान्यांमध्ये पक्षिजीवनाविषयी कुतूहल वाढावे, या हेतूने पक्षितज्ज्ञ डॉ. सतीश पांडे, निरंजन संत, प्रमोद देशपांडे आणि 'टाटा मोटर्स'चे विवेक विश्वासराव यांनी हे पुस्तक लिहिले असून, टाटा मोटर्स कंपनीने ते प्रकाशित केले आहे.

पॉप्युलर बुक हाऊसतर्फे आयोजित 'मॉन्सून सेल'मध्ये केंद्रीय वन्यजीव मंडळाचे माजी संचालक डॉ. व्ही. बी. सावरकर आणि 'झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया' संस्थेचे अतिरिक्त संचालक डॉ. अनिल महाबळ यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी डॉ. सतीश पांडे, निरंजन संत, विवेक विश्वासराव, पॉप्युलर बुक स्टॉलचे माधव गाडगीळ उपस्थित होते.

महाबळ म्हणाले, ''पक्षी, वनस्पती, सस्तन प्राण्यांविषयी तरुणांमध्ये आवड निर्माण होण्यासाठी माहितीपूर्ण पुस्तके प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. विशेषत: मराठीत ती प्रसिद्ध झाली, तर विद्यार्थ्यांना हे ज्ञान सहज आत्मसात करता येईल.''





**तुकयाची आवली** **३री आवृत्ती**

मंजुश्री गोखले

आकाशाएवढ्या तुकारामांची पत्नी असूनही जमिनीवर ठाम उभी राहून नियतीशी एकटीनं झुंज देणारी

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

सावरकर यांनीही पुस्तकातील विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. डॉ. पांडे म्हणाले, ''पक्ष्यांविषयी मराठीतून माहिती देणारे 'फिल्ड गाइड' आतापर्यंत उपलब्ध नव्हते. या पुस्तकात लोणावळा-खंडाळ्यात आढळणारे पक्षी, सरपटणारे प्राणी, फुलपाखरे यांची मराठीतून माहिती दिली असून, ज्या पशु-पक्ष्यांची मराठीत नावे उपलब्ध नाहीत, अशांना लॅटिन नावांच्या आधारे नव्याने काही नावे देण्याचा प्रयत्न केला आहे.''

*** लक्ष्मण माने यांचा एकसष्टीनिमित्त सत्कार**

''जातिव्यवस्थेचा अंत हेच आमचे ध्येय आहे आणि यापुढेही आम्ही त्याच वाटेने जाणार! आजवर ज्या भटक्या-विमुक्तांसाठी काम केले, त्यांच्यासाठीच उरलेले आयुष्य खर्च व्हावे,'' अशी मनीषा 'उपरा'कार लक्ष्मण माने यांनी व्यक्त केली.

माने यांच्या एकसष्टीनिमित्त ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. माने यांच्या पत्नी शशीताई, रिपब्लिकन पक्षाचे नेते रामदास आठवले, नामदेव ढसाळ, खासदार सुप्रिया सुळे, महापौर मोहनसिंग राजपाल, तसेच विलास वाघ आणि परशुराम वाडेकर या वेळी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना माने म्हणाले, ''भटक्या विमुक्त समाजाचे कोणी नावही घेत नव्हते, तेव्हा आम्ही त्यांच्यासाठी कामास सुरुवात केली आणि आज हा समाज बुद्धाच्या मार्गाने निघाला आहे. अनेक जणांनी भीक मागण्याची परंपरा सोडून दिली आहे. सार्वजनिक जीवन आणि व्यक्तिगत जीवन वेगळे, ही शिकवण दिवंगत नेते यशवंतराव चव्हाण आणि एस. एम. जोशी यांनी दिली. त्यामुळेच वैयक्तिक जीवनात अनेकांशी ऋणानुबंध जुळले.''

ते म्हणाले, ''राजकारणात राहण्यासाठी सध्या ज्या पात्रता आवश्यक आहेत, त्या माझ्यात कधीच नव्हत्या. तोंडाने शाहू-फुले-आंबेडकर यांचे नाव घ्यायचे आणि प्रत्यक्षात वेगळेच वागायचे, ही सध्याची रीत आहे. आज कार्यकर्त्यांमध्ये चिंतनाचा अभाव आहे, मग संघटना कशा उभ्या राहणार? प्रस्थापितांना हेच हवे आहे. आज देशात विचारसरणी असलेली एकही राजकीय पक्ष नाही, पैसे कमावणे हाच त्यांचा विचार आहे. अस्पृश्य सोडून इतरांची जातीनिहाय जनगणना केल्यास भविष्यात देशात जातीय कलह उभे राहतील. हे घटना मोडण्याचे डावपेच आहेत.''

वैद्य म्हणाले, ''जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी घटनेच्या सरनाम्यात 'जातीविहीन' हा शब्द समाविष्ट करण्यासाठी आग्रह धरला पाहिजे. माने यांनीच भटक्या विमुक्तांचा 'बंद दरवाजा' उघडला, आयुष्यभर ते झुंजत असून सर्वांनी त्यांना साथ दिली पाहिजे.''

आठवले म्हणाले, ''शाहू-फुले-आंबेडकरांचा विचार मांडणाऱ्या माने यांनी

जातिव्यवस्थेच्या विरोधात कायम लढा दिला आहे.''

नामदेव ढसाळे म्हणाले, ''आज रणांगण रणछोडदासांनी भरले आहे. अशा काळात जिद्दीने झुंज देणाऱ्यांमध्ये लक्ष्मण माने यांचा सिंहाचा वाटा आहे. स्वातंत्र्यानंतर ६२ वर्षांनीही जाती जिवंत आहेत, हे देशाचे दुर्दैव आहे. अजूनही जातीनिहाय जनगणनेची गरज भासते. आपला हा प्रवास कोठे चालला आहे? भांडवली लोकशाहीने आपल्या पदरात काय टाकले, हे पाहिले पाहिजे.''

*** प्रेस इन्स्टिट्यूटतर्फे उत्कृष्ट लेख स्पर्धा**

मानवतावादी मुद्यांसंबंधीच्या लेखांसाठी प्रेस इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (पीआयआय), चेन्नई यांनी नवी दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीच्या सहकार्याने भारतीय मुद्रित प्रसारमाध्यमांसाठी उत्कृष्ट लेख स्पर्धा आयोजित केली आहे.

'सशस्त्र हिंसाचाराच्या परिस्थितीत हिंसाचारग्रस्तांचे भवितव्य' या विषयावरील मानवतावादी भूमिकेतून केलेले लेखन या स्पर्धेसाठी ग्राह्य धरले जाणार आहे. त्यासाठी पहिले पारितोषिक ५० हजार, दुसरे ३० हजार, तर तिसरे २० हजार रुपयांचे आहे. सशस्त्र हिंसाचाराच्या परिस्थितीत मानवतावादी मुद्यांवर आधारित पत्रकारांनी केलेले लेखन, आपले नाव, संस्थेचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि ई-मेलसह editor.pii@gmail.com या पत्त्यावर ई-मेलने किंवा प्रेस इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, आरआयएनडी प्रिमायसेस, सेकंड मेन रोड, तारामणी सीपीटी कॅम्पस, चेन्नई ६००११३ या पत्त्यावर पोस्टाने पाठवायचे आहे. लेख पाठविण्याची अंतिम मुदत १५ जुलै २०१० असून, ऑक्टोबर महिन्यात निकाल जाहीर होणार आहेत. भारतीय राष्ट्रीय किंवा प्रादेशिक वृत्तपत्रात किंवा नियतकालिकात जानेवारी २००९ ते एप्रिल २०१० या काळात प्रसिद्ध झालेला कोणत्याही भारतीय भाषेतील किंवा इंग्रजीतील लेख स्पर्धेसाठी पाठविता येईल. भारतीय भाषेतील लेखासोबत त्याचे नेमके इंग्रजी भाषांतर आणि लेखाच्या प्रसिद्धीचा पुरावाही आवश्यक आहे. एका पत्रकाराला एकच लेख पाठविता येणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क -०४४२२५४२३४४

*** 'वाईज ॲण्ड अदरवाईज' आता संस्कृतमध्ये**

सर्व स्तरातील वाचकांना आवडेल अशा प्रकारे लेखन करणाऱ्या आणि अनेक वाचकांच्या चाहत्या असणाऱ्या ज्येष्ठ लेखिका सुधा मूर्ती. 'गोष्टी माणसांच्या', 'डॉलर बहू', 'महाश्वेता' त्यांची आदी पुस्तके वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतरित झालेली आहेत. त्यांचे 'वाईज ॲण्ड अदरवाईज' या पुस्तकाचे तर संस्कृत भाषेतही उपलब्ध करण्यात आले आहे.

सात-आठ महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात आलेले हे पुस्तक व्याकरणदृष्ट्या योग्य असेल याची काळजी घेण्यात आली आहे, तसेच यासाठी डॉ. दे. खं. खरवंडीकर

यांनी मोलाची कामगिरी पार पाडली असल्याचे, डॉ. आशा गुर्जर म्हणाल्या. आता हे संस्कृतमध्ये भाषांतरित केलेले पुस्तक वाचणार कोण, हा प्रश्न ओघाने आलाच. हा प्रश्न सुधा मूर्ती यांनीदेखील डॉ. गुर्जर यांना विचारला होता आणि या प्रश्नाला त्यांचे उत्तर होते सुधाप्रेमी आणि संस्कृतप्रेमी.

*** 'महाराष्ट्राचे मानबिंदू' पुस्तक प्रकाशित**

'राजकारणी, सेलिब्रेटीच नव्हे तर विविध क्षेत्रांत मराठी माणसांनी स्वकर्तृत्वाने आपला ठसा उमटवला आहे. अशा सर्वांचाच महाराष्ट्राला मोठे करण्यात महत्त्वाचा वाटा आहे', अशा शब्दांत कृषि आणि शालेय शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी कर्तबगार मराठी माणसांची मुक्तकंठाने स्तुती केली.

नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये 'मानबिंदू महाराष्ट्राचे - यशोगाथा १०० मराठी आयडॉल्सची' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'मराठी माणसांच्या अंगभूत गुणांना वाव मिळाला, तर तो किती मोठे नाव कमावू शकतो याचा प्रत्यय या पुस्तकातून येतो. हीच मंडळी भविष्यात महाराष्ट्राला पुढे नेतील, असे थोरात म्हणाले. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर आणि 'द संडे इंडियन'चे प्रमुख अरिंदम चौधरी हेही उपस्थित होते.

पुस्तकात ज्यांची यशोगाथा आहे. अशापैकी अशोक हांडे, केदार शिंदे, अमृता पत्की, नीलेश लिमये, अच्युत गोडबोले, डॉ. संजय ओक आदींचा सन्मान करण्यात आला. अशोक हांडे यांनी आपले मनोगत मांडले. देवदास मटाले यांनी पुस्तकाच्या निर्मितीमागची भूमिका स्पष्ट केली. अभिनेत्री शिल्पा तुळसकर हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

*** मुकादम यांच्या पुस्तकाचे प्रकाशन**

ज्येष्ठ अभ्यासक व लेखक अब्दुल कादर मुकादम यांच्या भारतीय मुस्लिमांच्या विविध प्रश्नांचे विश्लेषण करणाऱ्या 'चंद्रकोरीच्या छायेत' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.





**अमरगीत :** बाबा आमटे यांचं जीवनचरित्र

अनु. लीना सोहोनी

दुर्दम्य इच्छाशक्ती व निरपेक्ष बुद्धीने केलेली समाजसेवा यांचा अनोखा संगम असणारा प्रवास

**२००रु. पोस्टेज २५रु.**

सुगावा प्रकाशन, पुणे आणि प्रगतिशील भारतीय मुस्लिम आंदोलन या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या समारंभात कम्युनिस्ट नेते कॉ. गोविंद पानसरे, ज्ञानसाधना महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. दाऊद दळवी, राम पुनियानी आणि प्रकाश बाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

*** प. स. देसाई : एक अलक्षित साहित्यिक**

''समाजाची आध्यात्मिक प्रकृती खालावल्यामुळे आत्महत्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे,'' असे मत डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी व्यक्त केले.

डॉ. शशिकला देसाई लिखित 'श्री. प. स. देसाई : एक अलक्षित साहित्यिक' या पुस्तकाचे प्रकाशन पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले यांच्या हस्ते झाले. स्नेहवर्धन प्रकाशनाने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. प्रकाशिका स्नेहल तावरे, डॉ. शशिकला देसाई यावेळी उपस्थित होत्या.

डॉ. ताकवले म्हणाले, ''डॉ. शशिकला देसाई यांनी वयाच्या ७६ व्या वर्षी लॅपटॉप शिकून या पुस्तकाचे लिखाण केले ही अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे. त्यांचे सासरे प. स. देसाई यांच्या कार्यातून प्रेरणा घेत त्यांनी डॉक्टरेट मिळवली. त्यांची जिद्द मोठी आहे. प. स. देसाई यांना साहित्यिक म्हणून ओळख मिळाली नाही; पण या पुस्तकामुळे त्यांचे कार्य लोकांपुढे येईल.''

*** राष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सव**

'गेल्या काही वर्षांपासून सुरू झालेल्या संकुचित प्रांतवादामुळे देश विभक्त होण्याच्या मार्गावर आहे. ही संकुचितता संपुष्टात आणून देशाला एकसंध ठेवण्याचे सामर्थ्य केवळ सांस्कृतिक क्षेत्रातच आहे.' असे मत ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर पणशीकर यांनी 'राष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सव २०१०'च्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. अध्यक्षा रत्ना वाघ, सचिव हेमंत वाघ, अतुल कुलकर्णी, श्याम भुर्के, गीता ठकार व्यासपीठावर उपस्थित होते.

पणशीकर म्हणाले की, 'एक भाषा-एक राष्ट्र' या परकीय विचाराच्या प्रभावाखाली भारतीयांमधील स्वार्थी व आत्मकेंद्री वृत्ती वाढल्याने भारतात लबाडी आणि भ्रष्टाचार वाढला आहे. आपल्या देशाच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी या सांस्कृतिक महोत्सवासारखे कार्यक्रम देशभरात होणे आवश्यक आहे. समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी संस्कृतीचे जतन आवश्यक आहे.

महापौर राजपाल म्हणाले, हा महोत्सव म्हणजे सांस्कृतिक एकात्मतेची एक झलकच आहे. ऐतिहासिक वारसा जतन करण्याबाबत विदेशात आढळणारी सजगता भारतीयांनीही आत्मसात करायला हवी.

एकूण चार हजार स्पर्धकांनी आपली कला सादर केली.

**∗ अजब आकाराचे पुस्तक**

एखाद्या पुस्तकाचा आकार असून असून किती मोठा असू शकेल? कुणाला कल्पनाही करता येणार नाही, अशा आकाराचे पुस्तक चेल्याबिन्स्क (रशिया) या शहरातील लोकांनी तयार केले आहे.

पुस्तकाची लांबी सहा मीटर, तर रुंदी तीन मीटर इतकी आहे. म्हणजेच हे पुस्तक वाचण्यासाठी उभे धरले, तर एखाद्या इमारतीच्या पहिल्या दुसऱ्या मजल्यापर्यंत त्याची उंची सहज होईल. हे पुस्तक थोडेसे हलवायचे असले, तरी त्यासाठी एखादी क्रेनच आणावी लागेल. कारण पुस्तकाचे वजन सहाशे किलोग्रॅम आहे. दुसऱ्या महायुद्धात रशियासाठी लढलेल्या आणि हुतात्मा झालेल्या वीरांच्या कथांचा आणि छायाचित्रांचा या पुस्तकात समावेश करण्यात आला आहे. लोकांनी या वीरांच्या कर्तृत्वाबद्दल जाणून घ्यावे, यासाठीच या भल्यामोठ्या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

**∗ 'हेमामालिनी जीवनकथा' तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन**

''रसिकांचे प्रेम हीच आम्हा कलावंतांची कमाई असते. 'हेमामालिनी अधिकृत जीवनकथा' या पुस्तकाचे यश म्हणजे मराठी रसिकांनी हेमाचा केलेला गौरव आहे.'' अशी भावना प्रसिद्ध अभिनेते धर्मेंद्र यांनी व्यक्त केली. हेमामालिनी यांच्या मुंबईतील जुहू येथील बंगल्यात अमेय प्रकाशनच्या 'हेमामालिनी अधिकृत जीवनकथा' या मराठी पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन धर्मेंद्र यांच्या हस्ते झाले. यावेळी मूळ इंग्रजी आवृत्तीच्या लेखिका भावना सोमय्या, अनुवादिका अरुणा अंतरकर, प्रकाशक उल्हास लाटकर, हेमामालिनी, त्यांची कन्या आहना देओल उपस्थित होत्या. 'ड्रीमगर्ल' हेमामालिनी आणि 'ही-मॅन' धर्मेंद्र यांची पडद्यावरील जोडीप्रमाणेच पडद्यामागच्या जोडीबद्दल रसिकांना नेहमीच उत्सुकता वाटत राहिली.

हेमामालिनी म्हणाल्या, ''या पुस्तकाची तिसरी आवृत्ती एवढ्या कमी कालावधीत प्रकाशित होणे, ही मराठी रसिकांच्या माझ्यावरच्या प्रेमाची पावती आहे. माझ्या मनात त्याबद्दल आदर आणि कृतज्ञता आहे.''

**∗ विज्ञानकथा कुतूहल, प्रेरणा निर्माण करतात**

''विज्ञानकथा हा साहित्य प्रकार केवळ विज्ञानाच्या प्रसारासाठी नाही. तर त्या कथा वाचकाला विज्ञानाकडे वळवितात आणि त्या विषयी कुतूहल, तसेच प्रेरणा निर्माण करतात, असे मत प्रसिद्ध विज्ञानकथा लेखक सुबोध जावडेकर यांनी व्यक्त केले.

'महाराष्ट्र साहित्य परिषद युवा मुक्त मंच' आणि 'मराठी विज्ञान परिषद' यांच्या वैज्ञानिक कथालेखन स्पर्धेत यशश्री पुणेकर, वैष्णवी निवसरकर, श्रीकांत जगताप,

बी. आर. माडगूळकर आणि मेघना परांजपे यांनी आपल्या कथा सादर केल्या. परिषदेच्या प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य, विज्ञान परिषदेचे प्रा. विनय र.र., युवा मुक्त मंचचे समन्वयक महेंद्र मुंजाळ या वेळी उपस्थित होते.

जावडेकर म्हणाले, ''विज्ञानकथांचे लेखन करणे अवघड असते. कारण त्यामध्ये कुठेही विज्ञानाचा संदर्भ बदलणार नाही, याची दक्षता घ्यावी लागते. विज्ञान सत्याची मोडतोड करीत नाही. विज्ञानकथेत केवळ चंद्र, तारे, रॉकेट यांचाच नाही, तर त्यामध्ये पृथ्वीवर घडणाऱ्या नव्या प्रयोगांचाही समावेश असावा. विज्ञानकथेमध्ये काय होईल हे सांगणाऱ्या 'तर' ला अधिक महत्त्व असते.

*** स्वा. सावरकर जयंती**

'हिंदुस्थानला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांची, तर जगाला महात्मा गांधींच्या विचारांची गरज आहे,' असे मत डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. सावरकर जयंतीनिमित्त नगरसेविका मेधा कुलकर्णी यांनी 'संन्यस्त खड्ग' या संगीत नाट्याचा प्रयोग आयोजित केला होता. यावेळी श्रीकांत मोघे, सूर्यकांत पाठक, राहुल सोलापूरकर, नाना गोडसे उपस्थित होते. या कार्यक्रमात सैनिक शिक्षणाच्या प्रसारासाठी कार्य करणाऱ्या अनुराधा प्रभुदेसाई, धर्मांतरित तरुणांसाठी काम करणारे राजेश पाटील, अभिनव निर्माणचे चंद्रकांत जोशी, समाजशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. शांतिश्री पंडित यांचा सत्कार करण्यात आला.

*** विज्ञानावर आधारित बालचित्रपट : 'तारे आसमाँ के'**

'साई प्रॉडक्शन' निर्मित 'तारे आसमाँ के' हा अवकाशविज्ञानावर आधारित चित्रपट बालप्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी'फेम बालकलाकार अथर्व कर्वे याची प्रमुख भूमिका आहे.

आकाशगंगा, ग्रह-तारे, अवकाशयान हे विषय आणि आइन्स्टाईन, डॉ. जयंत नारळीकर यांच्यासारखे शास्त्रज्ञ यांच्यासाठी मुलांना कुतूहल वाटते. मुलांच्या या छंदाचा करिअर म्हणून पालक विचार करीत नाहीत, हे लक्षात घेऊन मुलांच्या प्रश्नांना 'तारे आसमाँ के' या माहितीपटात उत्तरे देण्यात आली आहेत.

संपत मेमाणे आणि सोमनाथ ढगे यांनी शाळकरी मुलांमध्ये लपलेला शास्त्रज्ञ शोधण्याचे काम केले आहे. शास्त्रज्ञांच्या प्रेमात पडलेला आकाश हा शालेय विद्यार्थी भूगोल, विज्ञान या विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवतो, तर अन्य विषयात जेमतेम उत्तीर्ण होतो. तो वैज्ञानिक स्पर्धा जिंकतो आणि पालकांसह सर्वांनाच त्याचा अभिमान वाटू लागतो. ही कथा साकारताना ॲनिमेशनचा वापर केला आहे.

### * ‘देशी वृक्ष’चे प्रकाशन

मनुष्य वस्तीच्या अवतीभोवती तसेच जंगलामध्ये आढळणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण वृक्षांची माहिती सहज उपलब्ध व्हावी, या हेतूने ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ प्रा. श्री. द. महाजन यांनी लिहिलेल्या ‘देशी वृक्ष’ पुस्तकाचे प्रकाशन झाले.

महाराष्ट्रातील वृक्षसंपदा तीन भागांत पुस्तकबद्ध करण्याचा संकल्प महाजन यांनी केला असून, ‘देशी वृक्ष’ हा याचा दुसरा भाग आहे.

याबद्दल पुस्तकाचे प्रकाशक ‘नेचर वॉक’ संस्थेचे अनुज खरे म्हणाले, ‘‘महाराष्ट्रात मानवी वस्तीत, तसेच जंगल परिसरात आढळून येणाऱ्या अजान वृक्ष, आइन, आपटा, नागचाफा, वारस, जायफळ, कुसुंब, टेमरू अशा ६१ झाडांची माहिती आहे. फुले, फळे, पानांचे वर्णन; तसेच वृक्षाचे शास्त्रीय नाव, स्थानिक नाव, वनस्पती वर्गीकरण शास्त्र, संस्कृत वाङ्मयातील संदर्भ यांचीही जोड आणि छायाचित्रे यात आहेत.’’

### * कोत्तापल्ले गौरवग्रंथाचे प्रकाशन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या गौरव समारंभाच्या निमित्ताने ‘समकालीन साहित्यचर्चा’ या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे.

२ जून रोजी औरंगाबाद येथे डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन झाले. ॲड. भगवानराव देशपांडे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रसिद्ध लेखक दत्ता भगत आणि प्रा. अविनाश डोळस प्रमुख वक्ते होते.

अरुण पारगावकर यांच्या प्रतिमा प्रकाशनाच्या वतीने हा ग्रंथ तयार करण्यात आला असून, त्याचे संपादन मनोहर जाधव आणि श्रीकांत देशमुख यांनी केले आहे. डॉ. कोत्तापल्ले यांच्याविषयीचे लेख आणि साहित्य, संगीत, नाटक यातील घडामोडींचा वेध घेणारे लेख अशा दोन विभागांत या ग्रंथाची रचना करण्यात आली आहे.

डॉ. वाघमारे म्हणाले, ‘‘डॉ. कोत्तापल्ले फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार मानतात. विद्यापीठाच्या प्रशासनाला नवी दिशा देण्याचे काम त्यांनी केले आहे.




**स्वप्नाकडून सत्याकडे** **७वी आवृत्ती**

अनु. माधुरी शानभाग

कल्पना चावलाची आणि आपल्या उच्च ध्येयासाठी तिने केलेल्या संघर्षाची मार्गदर्शक कहाणी

**५०रु. पोस्टेज २०रु.**

परीक्षा विभाग सुधारण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे काम केले. असे काम व्हिजन असल्याशिवाय होत नाही. नेत्याजवळच व्हिजन असते. कुलगुरू हा शिक्षण क्षेत्रातला नेता असतो. विद्यापीठाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी डॉ. कोत्तापल्ले यांनी धडपड केली, विद्यापीठाला नेतृत्व दिले. संशोधनासाठी विद्यापीठांमध्ये सामुदायिक नेतृत्व उभे करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.''

सत्काराला उत्तर देताना डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''विद्यापीठ म्हणजे शांतपणे अभ्यास करण्याचे ठिकाण, अशी माझी धारणा होती. याच पद्धतीने काम करण्याचा मी प्रयत्न केला. कुठलेही विद्यापीठ ज्ञाननिर्मितीचे केंद्र असावे, असे मला वाटत होते. विद्यापीठात असे वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांचेच सहाकार्य लाभले.''

*** दौंड-पुणे शटल**

''दु:खामध्ये माणसाची ओळख होते. सुख माणसाला सवय लावते व आपत्ती शिकायला लावते. प्रवासामुळे मन संवेदनशील होते. प्रवासात सर्व स्तरांतील लोक पाहावयास मिळतात. भारतीय रेल्वे समाजदर्शन घडवणारी असे प्रतिपादन डॉ. अनिल अवचट यांनी केले.

डॉ. अमित बिडवे यांनी लिहिलेल्या 'दौंड-पुणे शटल' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. अवचट म्हणाले की, नितळ पाण्याच्या प्रवाहासारखे अमितचे बोलणे आहे. मन खसखशीसारखे होऊ शकते व आभाळाएवढे मोठे होऊ शकते. भिकाऱ्यांच्या जीवनात हास्य आहे, ते प्रवासात दिसते. आपण आपली मने बंदिस्त केलेली आहेत. संवेदनाहीन झालेल्या लोकांचे कारखाने आपण निर्माण करीत आहोत. निसर्गाची निरागसता लेखक शिकवतो. मने जोडलेली असणे खूप महत्त्वाचे.

*** सांस्कृतिक धोरणात शासनाचा हस्तक्षेप नको**

राज्याच्या सांस्कृतिक धोरणामध्ये शासनाचा हस्तक्षेप नको, असे स्पष्ट मत ज्येष्ठ साहित्यिक ह. मो. मराठे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १०४ व्या वर्धापन दिन सोहळ्यात व्यक्त केले. परिषदेचे कार्याध्यक्ष वि. भा. देशपांडे, कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे, प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य, विश्वस्त मंडळाचे सदस्य आमदार उल्हास पवार तसेच सु. प्र. कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते.

'लोकसत्ता'चे सहायक संपादक अरविंद गोखले यांना 'मंडालेचा राजबंदी' या ग्रंथासाठी 'शरच्चंद्र मनोहर भालेराव पारितोषिक' देऊन गौरविण्यात आले.

'लोकसत्ता'च्या नागपूर आवृत्तीचे निवासी संपादक प्रवीण बर्दापूरकर यांना 'डायरी' या पुस्तकासाठी 'अंबादास माडगूळकर पारितोषिक' देण्यात आले. त्याचप्रमाणे रत्नाकर मतकरी, डॉ. राजा दीक्षित, अरुण म्हात्रे, जयदेव डोळे, डॉ. वि. ना. श्रीखंडे आदींसह २६ लेखकांना विविध पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

मराठे म्हणाले, शासनाने साहित्य व सांस्कृतिक उपक्रमांना मदत करावी, मात्र राज्याच्या सांस्कृतिक धोरणामध्ये शासनाचा हस्तक्षेप नको. शासनाने हे धोरण ठरविल्यास त्यात त्याचा थेट हस्तक्षेप होणे हे या धोरणाच्या दृष्टीने योग्य नाही. केवळ मोठ्या शहरांपुरते मर्यादित असणारे साहित्याचे क्षेत्र आता ग्रामीण भागामध्ये विस्तारित होत आहे. त्यातून साहित्य निर्मिती व विक्री पद्धतीमध्ये मोठा बदल झाला आहे. महाराष्ट्रामध्ये सुमारे २० हजार ग्रंथालये आहेत. मराठी पुस्तकांसाठी ही मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे प्रकाशकांनी केवळ हजाराची आवृत्ती संपली, म्हणून समाधान न मानता ही मोठी बाजारपेठ काबीज केली पाहिजे. ही बाजारपेठ काबीज करणारा क्रांती घडवून आणू शकेल. मराठी भाषेबाबत सध्या सुरू असलेल्या राजकारणातून भाषेला काहीतरी फायदाच होईल, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

मतकरी म्हणाले की, निरनिराळ्या व्यवसायातून साहित्यिक घडले पाहिजेत. शक्य त्या प्रमाणात त्या-त्या व्यवसायातील मंडळींनी आपले अकल्पित अनुभव लोकांपर्यंत पोचवले पाहिजेत. त्यातून साहित्य समृद्धच होत जाईल. समाजातील विविध प्रश्नांची सर्व जबाबदारी केवळ साहित्यिकांवरच नसून ती प्रत्येक घटकेवर आहे, असेही ते म्हणाले.

पुण्यात झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून एक लाख रुपयांची रक्कम साहित्य परिषदेला देण्यात आली.

*** पहिले बालमित्र साहित्य संमेलन**

सकाळ माध्यम समूह, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था आणि 'कऱ्हाड तालुका शैक्षणिक व्यासपीठ'तर्फे २६ आणि २७ जून रोजी कऱ्हाड येथे पहिले बालमित्र विभागीय मराठी साहित्य संमेलन झाले. अध्यक्षपदी बालसाहित्यकार सुभाष कवडे होते.

सुभाष कवडे भिलवडी येथील सेकंडरी स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज येथे माध्यमिक शिक्षक आहेत. यांच्या 'शिवारमाती' या कवितासंग्रहास पाच पुरस्कार मिळाले आहेत.




## थॉट लीडर्स

**४थी आवृत्ती**

अनु. सुप्रिया वकील / विलास वाडकर

'अपवादात्मक' ठरलेल्या बावीस यशस्वी उद्योजकांची रसरशीत शब्दचित्रे

**३००रु. पोस्टेज ३०रु.**

२६ जून रोजी या संमेलनाचे उद्‌घाटन प्रसिद्ध अभिनेत्री आणि बालसाहित्यकार डॉ. निशिगंधा वाड यांच्या हस्ते झाले. समारोपासाठी ज्येष्ठ कवी-गीतकार सुधीर मोघे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुलांवर मातृभाषेच्या माध्यमातूनच चांगले संस्कार होऊ शकतात, हे ध्यानात घेऊन 'सकाळ माध्यम समूहा'ने अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या सहकार्याने विविध भागांत विभागीय बालमित्र साहित्य संमेलने भरविण्याचा निर्णय घेतला आहे. या संमेलनांमध्ये पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे.

पहिल्या बालमित्र विभागीय साहित्य संमेलनासाठी इयत्ता पाचवी ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी अशा दोन गटांसाठी कथा, कविता आणि निबंधलेखनाच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

संमेलनात ग्रंथदिडी, ग्रंथप्रदर्शन, मुलांचे विविध गुणदर्शन, कथाकथन, कविसंमेलन, पालक-शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी परिसंवाद, विज्ञानातील मनोरंजन, पपेट शो अशा स्वरूपाचे कार्यक्रम झाले.

*** संजय सोनवणी लिखित '... आणि पानिपत'चे प्रकाशन**

'प्राजक्त प्रकाशन'तर्फे संजय सोनवणी लिखित '... आणि पानिपत' या कादंबरीचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा, डॉ. आनंद पाटील, प्रकाशक जालिंदर चांदगुडे, 'वसुंधरा मित्रपरिवार'चे अध्यक्ष अण्णा राऊत आणि सचिव धनंजय झुरुंगे उपस्थित होते.

सारडा म्हणाले, ''या कादंबरीने पानिपतकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन दिला आहे. ऐतिहासिक कादंबरी ही त्यातील नायकाभोवती फिरत असते. '... आणि पानिपत' ही कादंबरी याला अपवाद आहे. १६८० ते १७६० हा कालखंड हाच या कादंबरीचा नायक आहे. या कालखंडातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घडामोडींचा सामान्य माणसांवर काय परिणाम झाला, हे दलित महार कुटुंबाच्या माध्यमातून समजते.''

डॉ.सबनीस म्हणाले, ''या कादंबरीमध्ये वास्तवाला भिडण्याची क्षमता आहे.''

*** पुण्यात मोबाइल क्लाइंबिंग वॉल**

क्रीडानगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आता आणखी एका नव्या खेळाची सुरुवात होत आहे. मुला-मुलींना स्पोर्ट्स क्लाइंबिंगची (कृत्रिम भिंतीवर चढाई) गोडी लावण्यासाठी, साहसी खेळांना चालना देणाऱ्या 'एक्सलिमिट्स' या कंपनीने मोबाईल क्लाइंबिंग वॉल पुण्यात आणली आहे. देशातील ही अशा प्रकारची पहिलीच मोबाइल वॉल आहे.

सुरेंद्र शेळके, श्रीपाद सपकाळ, श्रीकृष्ण कडुसकर व शिल्पा जोशी यांनी

साहसी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नऊ वर्षांपूर्वी 'एक्सलिमिट्स'ची सुरुवात केली. तेव्हापासून या कंपनीने शालेय मुले, लष्करी अधिकारी, कॉर्पोरेट प्रोफेशनल्स, पोलिस कर्मचारी व इतर हौशी क्रीडाप्रेमींसाठी साहस खेळांचे आयोजन केले आहे.

देशात १९९३ मध्ये स्पोर्ट्स क्लाइंबिंगला सुरुवात झाली. या खेळाला इंडियन ऑलिंपिक असो.ची मान्यता आहे, असे 'एक्सलिमिट्स'चे संस्थापक सुरेंद्र शेळके यांनी स्पष्ट केले. ही वॉल इंग्लंडमधून आयात केली जात आहे.

वॉलला बॅटरी बॅकअप असल्याने बाहेरून वीजप्रवाह जोडण्याची गरज भासत नाही. ही वॉल वापरण्यास अत्यंत सोईची असून, ती जास्तीतजास्त नऊ मीटर उंच उघडू शकते अशी माहिती श्री. श्रीकृष्ण कडुसकर यांनी दिली.

शाळांमध्ये स्पोर्ट्स क्लाइंबिंग वॉल उभी करणे अवघड आहे. या समस्येवर उत्तर म्हणून क्लाइंबिंग वॉल त्यांच्या दारापर्यंत नेण्याची आमची इच्छा आहे, असे श्रीपाद सपकाळ यांनी स्पष्ट केले. कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्तींनाही वैयक्तिक आनंदासाठी आणि संघभावना रुजवण्यासाठी स्पोर्ट्स क्लाइंबिंगचा खूप उपयोग होऊ शकतो, असे शिल्पा जोशी म्हणाल्या.

*** 'संभाजी महाराज-खंड ३' ग्रंथाचे प्रकाशन**

श्रीशंभू प्रकाशनाच्या वतीने 'अद्वितीय छत्रपती संभाजी महाराज-खंड ३' या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन १० जून रोजी झाले. ॲड. अनंत दारवटकर लिखित या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन राज्याच्या नियोजन मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी महापौर मोहनसिंग राजपाल, तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठा सेवक संघाचे अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर, स्थायी समितीचे अध्यक्ष अरविंद शिंदे, माजी आमदार अशोक टेकवडे, सर्जेराव जेधे, सतीश उरसळ, ॲड. सुरेशचंद्र भोसले, ॲड. हर्षद निंबाळकर व मिलिंद पवार उपस्थित होते. दारवटकर यांनी आपल्या पस्तीस वर्षांच्या संशोधनातून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर पाच हजारांहून अधिक हस्तलिखित पृष्ठे लिहिलेली असून, याचे पाच खंड वाचकांसाठी उपलब्ध आहेत.

*** दुःखातून मुक्त होण्यासाठी वाचन महत्त्वाचे**

जीवनातील दुःखातून मुक्त होण्यासाठी आणि स्वत:चा शोध घेण्यासाठी निर्मितीक्षम वाचन महत्त्वाचे असून वाचन हाच जीवनाचा शोध आहे, असे मत ज्येष्ठ व्यंगचित्रकार व साहित्यिक मनोहर सप्रे यांनी व्यक्त केले.

'अक्षर मानव' या संस्थेने आयोजित केलेल्या मनमोकळ्या गप्पांच्या कार्यक्रमांत ते बोलत होते. यावेळी प्रभाकर करंदीकर यांनी सप्रे यांच्याशी संवाद साधला. 'अक्षर

मानव'चे राजन खान यांनी प्रास्ताविक केले.

आजच्या शिक्षणात सृजनात्मकता नाही तर, माहिती आणि तंत्रज्ञान आहे. त्यात ज्ञान नाही, असे सांगून सप्रे म्हणाले, ''समाजाच्या काही चौकटी असतात. चुकणाऱ्या समाजाला सावरण्यासाठी आवश्यक तेथे ती चौकट फोडून बंडखोरी जरूर करावी. सध्याच्या पिढीत बंडखोरीचे जलद स्थित्यंतर होताना दिसत आहे.''

''सध्या मराठी व्यंगचित्रांची स्थिती अत्यंत दयनीय अशी आहे. त्यात कलात्मक राहिलेला नाही. नुसती वस्तुस्थिती सांगणे म्हणजे कला नव्हे. वाचन, सराव त्याबरोबरच त्यात सातत्य असणे गरजेचे आहे. ते आजच्या व्यंगचित्रात दिसत नाही.''

*** शास्त्रीय संगीत क्षेत्रासाठी 'चारूश्री क्रिएटिव्ह' स्थापन**

अभिजात शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातील उदयोन्मुख युवा कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशातून 'चारूश्री क्रिएटिव्ह व्हिजन्स' या संस्थेची स्थापना झाली आहे. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे १३ जून रोजी किराणा घराण्याचे युवा गायक चंद्रशेखर वझे यांच्या गायन मैफलीने या संस्थेचे औपचारिक उद्घाटन झाले. या संस्थेच्या अध्यक्षा अंजली वझे यांनी ही माहिती दिली.

या मैफलीत वझे यांनी सकाळचे राग सादर केले. किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. फिरोज दस्तूर यांचे शिष्य असलेले वझे हे आकाशवाणीचे 'अ' श्रेणीचे कलाकार आहेत. नुकत्याच झालेल्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवातील गायनाने त्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

*** 'लेट्स गो बॅक' या मराठी बालचित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण**

सूर्य एंटरटेनमेंटनिर्मित आणि प्रमोद गोरे दिग्दर्शित 'लेटस गो बॅक' या मराठी बालचित्रपटाचे चित्रीकरण कोकणच्या निसर्गरम्य परिसरात आणि कोल्हापूरमध्ये पूर्ण झाले. जंगलात हरविलेल्या पाच मुलांची ही कथा असून चित्रपटाचे ८० टक्के चित्रीकरण जंगलात करण्यात आले.

चित्रपटात अनेक नवोदित कलाकारांनी काम केले असून निलय गायकवाड, तेजस जाधव, रोनक लांडगे, उन्मेष पाध्ये व सत्या यादव या बालकलाकारांनी चांगले काम केल्याचे दिग्दर्शक प्रमोद गोरे यांनी सांगितले.

या चित्रपटात राजकुमार शेडगे, अनिल राबाडे, भाग्यश्री राणे, शिल्पा गोंजारी या कलाकारांनी काम केले आहे. जंगलात जास्तीतजास्त चित्रित झालेला हा मराठीतील पहिलाच चित्रपट असून चित्रीकरणादरम्यान अस्वल, साप, रानगवे, मोर अशा वन्यप्राण्यांनीही सेटवर हजेरी लावल्याचे गोरे यांनी सांगितले. या चित्रपटातून कोकणातील समुद्रकिनारे, आंबोलीचे जंगल आणि वन्यप्राण्यांचे दर्शन घेता येणार आहे.

चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद व गीते प्रमोद गोरे यांची असून प्रफुल्लचंद्र यांनी संगीत दिले आहे. छायालेखनाची जबाबदारी जितू आचरेकर यांनी सांभाळली असून नृत्यदिग्दर्शन अनिल सुतारे यांचे आहे.

*** वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २० शहरांमध्ये**

पुण्यात फेब्रुवारीमध्ये 'किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'च्या यशस्वी आयोजनानंतर आता हा महोत्सव महाराष्ट्रासह दुसऱ्या राज्यातील २० शहरामध्ये आयोजित केला गेला, ही माहिती महोत्सवाच्या संयोजिका आरती किर्लोस्कर व अध्यक्ष विजय वर्मा यांनी सांगितली. पुढच्या पिढीसाठी वसुंधराचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचा संदेश देण्यासाठी हा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजित केला जातो. निसर्गाशी संबंधित पर्यावरण, वन्यजीव, ऊर्जा, वायू, जल यावर तयार करण्यात आलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपटांचे प्रदर्शन महोत्सवात केले जाते. यंदा हा महोत्सव 'अमरावती' येथे पार पडला.

जुलै ते सप्टेंबरदरम्यान पहिल्या टप्प्यात अमरावतीसह सांगली, मिरज, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, होस्पेट, कोप्पल (कर्नाटक), इंदूर (मध्य प्रदेश), बारामती, नागपूर येथे, तर दुसऱ्या टप्प्यात ऑक्टोबर ते डिसेंबरदरम्यान कराड, संभाजीनगर, रत्नागिरी, जळगाव, सातारा, गोवा, ठाणे, मुंबई, नगर येथे महोत्सव घेण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

*** 'मनाची कवाडं बंद करून घेता घेता'या कवितासंग्रहाचे प्रकाशन**

डॉ. मधुसूदन घाणेकर यांच्या 'मनाची कवाडं बंद करून घेता घेता' या कवितासंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मुख्य कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांच्या हस्ते नुकतेच झाले. या वेळी डॉ. घाणेकर यांच्या 'ध्यानयोग', 'कर्तृत्ववान पुरुषांच्या कुंडल्या', 'कर्तृत्ववान महिलांच्या कुंडल्या', या पुस्तकांची तसेच ऋचा घाणेकर-थत्ते यांच्या 'हस्तमुद्रा', 'वास्तुशास्त्र आपल्या सर्वांसाठी' ही पुस्तके आणि 'डहाळी' विश्वजोडी अभियान विशेषांकांचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. तसेच





## आरोग्यासाठी योग

**मंगेश कश्यप**

शास्त्रशुद्ध योगसाधनेचे रहस्य सुलभपणे
उलगडून दाखवणारा ग्रंथ

**८०रु. पोस्टेज २०रु.**

व्ही-आर्टस्'तर्फे 'साद मनाची' या कार्यक्रमात स्वाती सामक यांनी डॉ. मधुसूदन घाणेकर आणि ॠचा घाणेकर-थत्ते यांची मुलाखत घेतली. यावेळी चित्रकार सिद्धार्थ जोशी यांचा डॉ. घाणेकर यांच्या हस्ते कलागौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

*** नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या कार्याची झलक दाखविणारी ग्रंथसूची**

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या कार्याविषयी अभ्यास आणि संशोधन करणाऱ्यांनाच नव्हे; तर जिज्ञासूंनाही मार्गदर्शक ठरेल, अशी ग्रंथसूची प्रथमच तयार करण्यात आली आहे. त्यातील विस्तृत नोंदीमुळे या देशसेवकांविषयी उपलब्ध साहित्याची नेमकी माहिती तर मिळतेच; परंतु गोखल्यांच्या देशव्यापी कार्याची एक झलकही पाहायला मिळते. आशा गद्रे आणि प्रभास रथ या ग्रंथपालांनी या सूचीचे काम केले आहे.

गोखले यांनी देशातील विविध नेत्यांना लिहिलेल्या आणि त्यांना आलेल्या अशा मिळून तीन हजार पत्रांच्या नोंदी सूचीत आहेत. आपल्या राजकीय गुरुला गांधीजींनी लिहिलेल्या आरंभीच्या तीन पत्रांचाही त्यात समावेश आहे, असे श्रीमती गद्रे यांनी सांगितले.

नवी दिल्ली, पाटणा, कोलकाता, पुणे, मुंबई, नागपूर, कोल्हापूर इत्यादी ठिकाणच्या प्रमुख ग्रंथालयाशी संपर्क साधून तयार करण्यात आलेल्या या सूचीत गोखल्यांच्या आणि त्यांच्याविषयीच्या ३२९ ग्रंथांची माहिती मिळते. गोखल्यांवर चार अभ्यासकांनी पीएचडी केली असून, त्यात स्टॅनले वॉलपर्ट या प्रसिद्ध लेखकाचाही समावेश आहे. इतर तीन अभ्यासक आग्रा, इंदूर व दिल्ली येथील आहेत.

इंग्रजी, मराठी, हिंदी, तामिळ, तेलगु, उर्दू, कन्नड व आसामी या भाषांमध्ये गोखल्यांविषयीचे साहित्य किंवा पत्रे या सूचीत उपलब्ध आहे. तसेच उपलब्ध असलेल्या मायक्रोफिल्मची यादीही या सूचीत समाविष्ट आहे.

'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी'च्या ग्रंथालयाच्या शताब्दीच्या निमित्ताने पाच वर्षांपूर्वी या इंग्रजी सूचीचे काम सुरु झाले. त्याचे प्रकाशक डायमंड पब्लिकेशन असून, पुण्यात शुक्रवारी डॉ. पद्माकर दुभाषी यांच्या हस्ते औपचारिकरित्या तिचे प्रकाशन झाले.

*** इंदुमती लांडगे यांच्या 'संध्यावेला'चे प्रकाशन**

"काव्य निर्मितीसाठी जेवढी प्रतिभा लागते, तेवढीच प्रतिभा कवितेच्या आस्वादासाठी आवश्यक असते. आस्वाद घेताना वाचकाच्या मनात त्या कवितेची पुनर्निर्मिती होत असते." असे मत साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

पृथ्वीराज प्रकाशनतर्फे इंदुमती लांडगे लिखित 'संध्यावेला' या कवितासंग्रहाचे प्रकाशन डॉ. कुलकर्णी त्यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ दीपक शिकारपूर आणि प्रसिद्ध कवी म.भा. चव्हाण या वेळी उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''संवेदना, भावना याबरोबरच ज्ञान आणि मूल्य या घटकांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य कवितेत असते. प्रांजळपणा आणि कल्पनांचा मेळ असलेली कविता म्हणजे भावनांची चौकट नव्हे, तर आयुष्याचे अंतरंग दाखविणारी खिडकी असते.''

या वेळी शिकारपूर, चव्हाण आणि लांडगे यांनी मनोगत व्यक्त केले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

## * कुठला श्रावण, कुठल्या सरी या कवितासग्रंहाचे प्रकाशन

'आर. पी. आयडियाज'तर्फे रवी पाईकलिखित 'कुठला श्रावण कुठल्या सरी' या कवितासंग्रहाचे प्रकाशन उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार यांच्या हस्ते झाले.

उल्हास पवार म्हणाले, ''पाईक यांच्या कवितेमध्ये सामाजिक जाणिवा आणि गावगाड्यातील माणसांच्या व्यथा-वेदना आहेत. लोकसंस्कृतीतील शब्दांचा वापर केल्यामुळे कविता अस्सल झाली आहे.''

''काव्य म्हणजे केवळ व्याकरण नाही, तर भावनांचे अलगूज असते. त्यातून निर्माण होणारे सूर मनात रेंगाळतात. रेंगाळणारे सूर विचाराला चालना देतात आणि त्यांचे प्रतिबिंब आचरणात पडते.'' असे मत 'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

त्या प्रसंगी सुरेशचंद्र पाध्ये म्हणाले, ''कविता एकदा लिहिली, की ती कवीची न राहता वाचकांची होते. वाचक आपल्या परीने त्यांचा अर्थ लावतात. कित्येकदा वाचकाने लावलेला अर्थ कवीलादेखील अभिप्रेत नसतो, याची उदाहरणे आपल्याला पाहावयास मिळतात.''

कृष्णकांत कुदळे म्हणाले, ''पाईक यांच्या कवितांमध्ये कल्पनारम्यता नाही; तर त्यामध्ये वास्तवाचे भान दिसते. 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे म्हणतात. इथे रवी हाच कवी आहे.''

## * 'कनेक्टिंग'ला गरज मराठी संवादकांची

मानसिक तणावग्रस्तांसाठी काम करणाऱ्या, त्यांना आत्महत्त्येपासून परावृत्त करण्यासाठी हेल्पलाइन चालविणाऱ्या 'कनेक्टिंग' या स्वयंसेवी संस्थेला उत्तमरित्या मराठीत संवाद साधू शकणाऱ्या स्वयंसेवकाची गरज असल्याची माहिती संस्थेच्या विश्वस्त अर्नवाज दमानिया यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.

या संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या १८००२०९४३५३ या टोल फ्री दूरध्वनी क्रमांकावर आजपर्यंत साडेपंधराशे दूरध्वनी आले आहेत. परंतु, मराठीतून संवाद साधू शकणाऱ्या स्वयंसेवकाची संख्या कमी असल्याने काही वेळा अडचणी येतात. त्यामुळे उत्तम मराठीत संवाद साधू शकणाऱ्या आणि संस्थेसोबत काम करू इच्छिणाऱ्यांनी २६३३३०४४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.

*** साने गुरुजींच्या साहित्यावरील 'कॉपीराइट' संपुष्टात!**

साने गुरुजी यांच्या साहित्यावरील 'कॉपीराइट' (स्वामित्त्वहक्क) कायदा आता संपुष्टात आला आहे त्यामुळे कोणीही प्रकाशक किंवा व्यक्ती त्यांचे साहित्य प्रकाशित करु शकेल. सध्याच्या कॉपीराइट कायद्यानुसार त्या लेखकाच्या मृत्यूनंतर साठ वर्षांनी संबंधित लेखकाच्या साहित्यावरील कॉपीराइट कायदा संपुष्टात येतो.

साने गुरुजी यांचे ११ जून १९५० रोजी निधन झाले होते. गेल्या महिन्यात ११ जून रोजी त्यांच्या निधनाला साठ वर्षे पूर्ण झाली असल्याने, कॉपीराइट कायद्यानुसार साने गुरुजी यांच्या साहित्यावरील 'स्वामित्त्वहक्क' आपोआपच संपुष्टात आला.

कॉपीराइट कायद्यानुसार लेखकाने आपल्या लेखनाचे हक्क जी व्यक्ती किंवा संस्थेकडे दिले असतील, त्यांनाच ते साहित्य प्रकाशित करता येऊ शकते. अन्य कोणीही ते प्रकाशित केले तर कॉपीराइट कायद्याचा भंग केल्याच्या आरोपावरून संबंधिताना भारतीय दंड विधानानुसार शिक्षा होऊ शकते. कॉपीराइट संपुष्टात आल्यामुळे त्या लेखकाचे साहित्य ही सार्वजनिक संपत्ती होते, त्यामुळे कोणा एकाची मक्तेदारी त्या साहित्यावर राहत नाही.

*** 'अंधारयुगाचा प्रकाशयात्री' या आत्मचरित्राचे प्रकाशन**

'पार्टनर पब्लिकेशन'तर्फे श्री अक्षरधन त्रैमासिकाचे संपादक डॉ. रामदास गुजराथी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या सोहळ्यात ते म्हणाले, सुरेश चाळके यांनी ज्या भयानक अपंगत्वाचा अनुभव घेतला आहे त्यामुळे हे आत्मचरित्र वाचकांच्या काळजाचा ठाव घेणारे ठरले आहे. बाळ राणे यांच्या एड्स वरील कादंबरीत उद्रेक आणि उदात्तता यांचा हृद्य मिलाफ झाल्याचं त्यांनी प्रतिपादन केलं. विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो यांनी या कादंबरीत दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून दुःखी, पीडित झालेल्या माणसांच्या मनात आशावाद निर्माण करणारे अनुभव संवेदनशील माणसाला चटका लावणारे व साक्षात्कार घडवणारे आहेत.

अपंगाच्या आयुष्यात अजूनही अंधारच दाटून राहिलेला असून त्यांना समाजाकडून केवळ सहानुभूतीच मिळत आली आहे. अपंगांच्या साहित्यिक व इतर क्षेत्रातील कर्तृत्वाकडे समाज व शासनाचे दुर्लक्षच होत आहे. राज्याचा सुवर्णमहोत्सव साजरा

होत असताना अपंगांची देखभाल करणारा एकही वृद्धांश्रम महाराष्ट्रात नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे, अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक बाळ राणे यांनी व्यक्त केली आहे.

समारंभात बाळ राणे यांच्या '२६/११ चं अग्निदिव्य' या पुस्तकाला 'अंकुर साहित्य संघ अकोला यांच्या तर्फे 'राज्यस्तरीय स्व. शंकरराव सोनखासगावकर ऐतिहासिक ग्रंथ पुरस्कार' मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

*** चरित्रकोश तिसऱ्या खंडाचे प्रकाशन**

'आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण : शिल्पकार चरित्रकोश' या बारा खंडाच्या प्रकल्पातील 'विज्ञान व तंत्रज्ञान आणि शिक्षण' या तिसऱ्या खंडाचे प्रकाशन झाले. प्रकाशन सोहळ्यास राज्याचे शालेय शिक्षण व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात, अणुउर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, पुणे विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. रघउनाथ शेवगावकर व सारस्वत बँकेचे अध्यक्ष एजनाथ ठाकूर यांच्या हस्ते झाले. प्रकाशनानंतर डॉ. काकोडकर यांचे 'जागतिक व राष्ट्रीय परिप्रेक्ष्यात महाराष्ट्रीय वैज्ञानिक' या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वशांती केंद्राचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, तर प्रमुख पाहुणे म्हणून निर्माण ग्रुपचे संचालक अजित मराठे व 'पिनॅकल' चे संचालक गजेंद्र पवार उपस्थित होते.

*** डॉ. घैसास यांच्या 'कॅलिडोस्कोप' पुस्तकाचे प्रकाशन**

डॉ. नीलिमा घैसास यांच्या 'कॅलिडोस्कोप' या पुस्तकाचे प्रकाशन सकाळचे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते झाले.

या पुस्तकात छोट्या छोट्या लेखांचे संकलन करण्यात आलेले आहे. गेल्या तीस वर्षात वैद्यकिय व्यवसाय करताना आलेले अनुभव, मानवी मनाचे दर्शन, त्यातील चिंतन या पुस्तकामध्ये आहे. यापूर्वी 'प्लस अँड मायनस' या त्यांचा पुस्तकाचे प्रकाशन झाले आहे.

*** फाळके महोत्सवात 'प्रतिसाद'चा गौरव**

मुंबईत नुकत्याच झालेल्या दादासाहेब फाळके मराठी चित्रपट महोत्सवात अमर-आदित्य प्रॉडक्शनच्या 'प्रतिसाद - द रिस्पॉन्स' या चित्रपटाला विशेष लक्षवेधक सामाजिक चित्रपट म्हणून गौरविण्यात आले. सुमारे पन्नास चित्रपटांनी या महोत्सवात भाग घेतला होता. पिंपरी येथील प्रसिद्ध होमिओपॅथी डॉ. विजयसिंह निकम यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, संदीप कुलकर्णी व किशोर कदम यांच्या त्यात प्रमुख भूमिका आहेत. समाजातील डॉक्टर व रुग्ण यांच्यात सुसंवाद निर्माण व्हावा, यासाठी व होमिओपॅथीविषयीचे गैरसमज दूर करण्यासाठी या चित्रपटाची निर्मिती केली, असे डॉ. निकम यांनी सांगितले.

❒

# विशेषवार्ता




*** डॉ. अनिल गांधी यांच्या 'मना-सर्जना' पुस्तकाचे प्रकाशन**

''सुसंस्कृत होणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे. या दृष्टीने 'मना सर्जना'हे पुस्तक एक चिंतन, स्मरण आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ हॉ. ह. वि. सरदेसाई यांनी केले.

प्रख्यात शल्यचिकित्सक डॉ. अनिल गांधी लिखित 'मना सर्जना' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. ह. वि. सरदेसाई यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे होते.

ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. के. एच. संचेती, डॉ. शैलेश गुजर, 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे अनिल मेहता आणि सुनील मेहता उपस्थित होते.

'मना सर्जना'या पुस्तकाचे शब्दांकन चित्रलेखा पुरंदरे यांनी केले आहे.

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''संवेदनक्षम असणे ही देवाने दिलेली देणगी आहे. त्यामुळे मानव सुसंस्कृत होतो. हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे.'' हे पुस्तक समाज प्रबोधन करणारे आहे.

बाबासाहेब पुरंदरे म्हणाजे, ''शल्यचिकित्सेतही भारत मागे नव्हता, हे प्राचीन भारताच्या इतिहासातून स्पष्ट होते. येथील वैद्यकीय ज्ञान आत्मसात करण्यासाठी वेगवेगळ्या देशांतील वैद्य भारतात येत होते.''

डॉ. संचेती म्हणाले, ''जीवनात शिक्षणाचा ध्यास आणि समर्पण हे डॉ. गांधींमध्ये दिसते. नवीन पिढी खूप हुशार आहे, पण त्यांना मार्गदर्शनाची गरज आहे. या पुस्तकातून हे मार्गदर्शन होईल.''

'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे अनिल मेहता यांनी प्रास्ताविक केले, सुनील मेहता यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन प्रसिद्ध अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी केले.

**नवे कोरे**




# मना सर्जना

**डॉ. अनिल गांधी**

**२००रु. पोस्टेज २५रु.**

मानवी जीवन 'त्रिमित' आहे. जीवनाला लांबी (वय), रुंदी (प्रकृती) आणि खोली (इतरांसाठी तुम्ही काय केले) आहे. माणसाचे खरे मोठेपण या तिसऱ्या मितीवर ठरते. अशा व्यक्ती समाजात चारित्र्यसंपन्न आणि आदर्श ठरतात. त्याग, साधेपणा, इतरांच्या गरजांची जाणीव अशा अनेक पैलूंचे दर्शन ज्यांच्या व्यक्तिमत्त्वातून घडते, त्यापैकी डॉ. अनिल गांधी 'कनिष्ठिकधिष्ठित' आहेत.

त्यांच्या या पुस्तकाकत त्यांनी आपल्या वैद्यकीय विषयाखेरीज, आर्थिक गुंतवणूक, व्यावसायिक नीतिमत्ता, पृथ्वीची व्युत्पत्ती, आदिवासींसाठी आश्रमशाळा, महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अशा इतरही विषयांवरील आपले चिंतन व्यक्त केले आहे.

एकूणच ही आत्मकथा मननीय, चिंतनीय आणि वाचनीय अशी आहे.

**– डॉ. ह. वि. सरदेसाई**

*** जसवंतसिंह लिखित 'जिना'या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन**

''दंगली, सामाजिक पातळीवरचे समज-अपसमज यांचे मूळ म्हणजे समाजातील ज्ञानतृष्णेबाबत आपण पंगू आहोत. इतिहासातून आपण बोध घेत नसल्यामुळे सामाजिक असहिष्णुता वाढीस लागली आहे. त्यामुळे भविष्याचा विचार करताना सुजाण होऊन इतिहासाचे संदर्भ घेत त्याची वर्तमानाशी सांगड घालणे आवश्यक आहे,'' असे मत 'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

पॉप्युलर बुक हाऊसतर्फे आयोजित 'मॉन्सून सेल'मध्ये जसवंतसिंह लिखित 'जिना' या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन पाध्ये यांच्या हस्ते झाले. पुस्तकाचे अनुवादक अशोक पाध्ये, पुस्तकाचे प्रकाशक मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता, पॉप्युलर बुक हाऊसचे माधव गाडगीळ आणि सुनील गाडगीळ उपस्थित होते.

पाध्ये म्हणाले, ''शिक्षण आणि ज्ञानतृष्णेच्या पातळीवर आपण आज कित्येक शतके मागे आहोत. कोणत्याही घटनेमागील तथ्य जाणून न घेता प्रतिक्रिया न देणे, सामाजिक पातळीवरचे समज-अपसमज पसरविणे यामुळे प्रक्षोभक घटना घडतात. राजकीय पातळीवरही ही परिस्थिती आढळून येते. यामुळे सामाजिक असहिष्णुता वाढीस लागली आहे. इतिहासातील संदर्भ घेत भविष्याचे नियोजन होणे गरजेचे आहे.''

अशोक पाध्ये म्हणाले, ''जिना या पुस्तकासाठी जसवंतसिंह यांच्याकरिता तीस लोकांच्या तुकडीने पाच वर्षांहून अधिक काम केले आहे. पुस्तकाच्या नावामुळे राजकीय व्यक्तींना ते जिनांच्या बाजूने लिहिले आहे, असे वाटले. पण प्रत्यक्षात मात्र यात आत्तापर्यंत प्रकाशात न आलेला स्वातंत्र्यपूर्व इतिहास उलगडण्यात आला आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पं. नेहरू यांसह अनेक क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यासाठी केलेले संघर्ष संदर्भासह यात मांडले आहेत.'' असेही पाध्ये यांनी नमूद केले.

नवे कोरे

# जिना

हिंदुस्थान फाळणी स्वातंत्र्य




**जसवंत सिंग**

अनुवाद
**अशोक पाध्ये**

**५००रु. पोस्टेज ३०रु.**

१९०६ ते १९४७ या कालखंडातील भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील फारच थोडा भाग आपल्या समोर ठेवला गेला होता. टिळक, गांधी, सत्याग्रह, चलेजाव चळवळ, क्रांतिकारकांचे प्रयत्न... बस्स. एवढेच आपल्याला ठाऊक आहे.

परंतु याखेरीज असलेला ९० टक्के इतिहास हा श्री. जसवंतसिंग यांनी संशोधन करून बाहेर काढला. जिनांचे चरित्र अभ्यासताना हे सारे त्यांच्या हातात येत गेले. पाच वर्षे ३० माणसांची तुकडी हे काम करत होती. सुमारे ५००० संदर्भ गोळा केले गेले. त्यातील सार या पुस्तकात एकवटले आहे.

"खादीने कुठे स्वातंत्र्य मिळते?" नेहरूंचा महात्मा गांधींना सवाल.

जिनांनी ठरवून कोलकात्यात दंगल करवली व ६००० हिंदूंची कत्तल घडवली.

'हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दूत' असे प्रमाणपत्र गोपाळ कृष्ण गोखले यांच्याकडून घेणारे जिना शेवटी हिंदूंचे कर्दनकाळ बनले.

आपल्या कौशल्याने, काँग्रेसच्या नेत्यांना भोंगळपणाचा फायदा उठवत, धमकी देत जिनांनी पाकिस्तान निर्माण केले. पुन्हा एकदा दाहीर राजाचा पराभव ८०० वर्षांनी जीना नावाच्या महंमद कासिम याने केला.

अत्यंत खळबळजनक माहितीने भरलेले पुस्तक.

# दखल



*** अमिताव घोष : सव्वा दोन कोटींचा पुरस्कार**

इंग्रजीत लिहिणाऱ्या भारतीय लेखकांची सध्या मोठी चलती आहे. लाखालाखाचे पुरस्कार त्यांना मिळतात. कोटीकोटीचे आगाऊ मानधन त्यांना मिळते. आंतरराष्ट्रीय ग्रंथजत्रांमध्ये त्यांना मानाने बोलावले जाते. भारतीय चर्चासत्रांमध्ये त्यांचे बोलणे ऐकायला रसिकांची गर्दी होते. इंग्रजीत सफाईदारपणे लिहिता येणे जमले, तर असा भाग्ययोग वाट्याला येण्याचा एक राजमार्गच जणू खुला होतो. केवळ प्रादेशिक भाषांमध्ये लेखन करणाऱ्यांना असे आंतरराष्ट्रीय नव्हे तर, भारतीय पातळीवरही आपले अस्तित्व दाखवणे अवघड जाते.

९ मे रोजी इस्त्राएलमधील तेल अवीव येथील भारतीय लेखक अमिताव घोष यांना डॅन डेव्हिड हा १० लाख डॉलर्सचा (४.५० कोटी रुपयांचा) पुरस्कार ब्रिटिश लेखिका मार्गरिट ॲटवूड यांच्याबरोबर विभागून देण्यात आला. विभागल्यामुळे अमिताव घोष यांना सव्वादोन कोटी रुपयेच मिळाले; पण ही रक्कम देखील काही कमी नाही. आपल्या ज्ञानपीठ पुरस्काराची रक्कम आहे पाच लाख... सव्वा दोन कोटींपुढे पाच लाखांची रक्कम म्हणजे हत्तीपुढे शेळी– अशातला प्रकार. या पाच लाखात सध्या एका खोलीचा गाळा मिळणेही मुश्किल. ज्ञानपीठ पुरस्काराची रक्कम ४० वर्षांपूर्वी एक लाख होती. त्यावेळी लाखाला किंमत होती. ज्ञानपीठची रक्कम आज ५ लाख झाली; ती रुपयाच्या अवमूल्यनाच्या मानाने फारच तोकडी ठरते. किमान एक कोटीचा तरी ज्ञानपीठ पुरस्कार हवा. असो.

आश्चर्य म्हणजे अमिताव घोष यांनी हा पुरस्कार स्वीकारू नये, म्हणून त्यांच्यावर दडपण आणले गेले. का? तर हा पुरस्कार तेल अवीव विद्यापीठाने प्रायोजित केला आहे. इस्त्राएलने कब्जा केलेल्या पॅलेस्टाईनच्या भूमीवर उभे राहिलेले तेल अवीव विद्यापीठ जर प्रायोजक असेल, तर पॅलेस्टाइन मुक्तिलढ्याला पाठिंबा देणाऱ्या संघटनांनी याला विरोध करायला हवा. वसाहतवादाच्या विरोधी भूमिका घ्यायला हवी, असा युक्तिवाद केला गेला. हा युक्तिवाद खोडून काढणाऱ्यांचे म्हणणे असे की, हा पुरस्कार काही इस्त्राएल सरकारने दिलेला नाही. विसाव्या शतकाचे वास्तववादी

चित्रण करणाऱ्या कलाकृतीला डॅन डेव्हिड पुरस्कार देण्यात येतो. त्याची निवड करण्यासाठी स्वतंत्र समिती असते.

अमिताव घोष यांनी या तथाकथित विरोधकांच्या आग्रहाला न जुमानता या पुरस्काराचा स्वीकार केला. ते सध्या न्यूयॉर्कमधील क्वीन्स कॉलेजमध्ये तौलनिक साहित्याचे प्राध्यापक आहेत. न्यूयॉर्कपासून ३०० किलोमीटरवर असणाऱ्या हार्वर्ड युनिव्हर्सिटीतही व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून ते काही कोर्सेस घेतात.

द सर्कल ऑफ रीझन (१९८६), द शॅडो ऑफ लाइन्स (१९९०), द कलकत्ता क्रोमोझोम (१९९५), द ग्लास पॅलेस (२०००) द हंग्री टाइड (२००४) या त्यांच्या कादंबऱ्या गाजल्या. विविध पुरस्कारांच्या मानकरी ठरल्या.

'द सी ऑफ पॉपीज' या कादंबरीचे प्रकाशन इ. स. २००८ मध्ये झाले. डॅन डेव्हिड पुरस्कारासाठी अमिताव घोषची निवड करताना या कादंबरीचा विचार मुख्यत: झाला.

१९५६ मध्ये कोलकत्ता येथे जन्मलेल्या अमिताव घोष यांनी साहित्यक्षेत्रातील बंगालची श्रेष्ठत्वाची परंपरा टिकवून धरली आहे.

*** महाराष्ट्रात २५० हास्य संघांचे जाळे**

डॉ. नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्टतर्फे 'उतिष्ठत जाग्रत' हे मासिक निघते. त्याचा मे-जून अंक हास्यअंक विशेषांक म्हणून निघाला आहे. हास्याचे महत्त्व आणि हास्यसंघांची उपयुक्तता. या दृष्टीने बहुमोल सामग्री देणारा, संपूर्ण आर्टपेपरवर बहुरंगी छपाई असलेला हा अंक अत्यंत संग्राह्य ठरला आहे. संपादक- चंद्रशेखर हरी जोशी, विजया अरविंद जोशी यांनी घेतलेले परिश्रम वाखाणण्याजोगे आहेत.

हास्य म्हणजे मानवी जीवनातील एक अमोघ वरदान. हास्याने ताणतणाव दूर होतो. माणसामाणसांत मैत्र आणि मोकळेपणा निर्माण होतो. ''ज्या दिवशी आपण खळखळून असलो नाही तो दिवस वाया गेला असे समजावे.'' असे म्हटले जाते. 'हसण्यासाठी जन्म आपला' असे आपण मानले पाहिजे आणि हसण्याचा, हसवण्याचा क्षण शोधत राहिले पाहिजे. अनोळखी व्यक्तीलाही हसतमुखाने सामोरे गेलो तर परकेपणा गळून पडतो आणि व्यक्तीच्या चेहऱ्यावरही स्मित झळकते. माणसालाही खरे म्हणजे हास्य आवडते. विनोद आवडतो. विनोदी नाटक आवडते. विनोदी चित्रपट आवडतो. विनोदी किस्से आवडतात. विनोदी नकला आवडतात. सदासर्वकाळ गंभीर मुद्रेने साऱ्या जगाचे ओझे आपल्या खांद्यावर आहे, या भ्रामक समजाखाली कपाळावर आठ्यांचे जाळे वागवणारे 'चिंतातुर जंतू' सर्वांनाच वैताग आणतात. शोकांतिकेपेक्षा सुखात्मिका बघण्यासाठी गर्दी जात होते. हास्य मी मानवाला मिळालेली एक देणगी आहे. म्हणून माणसाची व्याख्या करताना ''ज्याला हसता येते, असा

प्राणी'' अशी केली जाते. बहुसंख्य प्राण्यांना हसता येत नाही.

हसू मनापासून येणे ही तर आनंददायकच गोष्ट असते. पण काही जणांना ते जमत नाही.

कृत्रिमरीत्या 'हा हा हा' करीत हसले, तरी त्यामुळे मानसिक शारीरिक ताण कमी होतात असे प्रयोगांवरून सिद्ध झाले आहे, या निष्कर्षाचा आधार घेऊन परदेशात 'लाफ्टर क्लब्ज'ची कल्पना लोकप्रिय झाली.

१९९५ साली मुंबईचे डॉ. मदन कटारिया यांनी जुहूमधील एका उद्यानात भारतवर्षातील पहिला हास्य क्लब सुरू केला. मुंबईपाठोपाठ पुण्यातही हास्यक्लबांची लाट आली. पुण्यात श्री. विठ्ठलराव लक्ष्मण काटे यांनी संभाजी उद्यानात सकाळी व्यायाम-प्राणायामाचे वर्ग सुरू केले. त्याला येणाऱ्या लोकांचे आरोग्य सुधारले. रक्तदाब, मधुमेह, अपचन, निद्रानाश, दमा, स्थूलपणा वगैरे तक्रारी कमी होऊ लागल्या. या वर्गात एका सदस्याने जुहूतील हास्य क्लबची माहिती दिली. ती ऐकून आपणही व्यायामाबरोबर हास्य प्रकार सुरू करावे, असे श्री. काटे आणि त्यांच्या मित्रांनी ठरवले. हास्याचे नवनवे प्रकार सुचविण्याची स्पर्धाच सदस्यांमध्ये लागली. हास्य क्लबचा फायदा सदस्यांना दिसू लागला. इतर ठिकाणचे लोक हास्य क्लबचे कामकाज बघायला येऊ लागले. पुण्यातही बऱ्याच भागात हास्य क्लब निघाले. 'चैतन्य हास्य योग' मंडळाची स्थापना झाली. त्यातर्फे जागोजाग हास्य क्लबांची स्थापना होऊ लागली. आज चैतन्यच्या १३० शाखा आहेत.

त्याचबरोबर 'लोकमान्य हास्ययोग' संघाची स्थापना झाली. त्याच्या २० शाखा निघाल्या.

विवेकानंद हास्ययोग परिवाराच्या आठदहा शाखा काम करीत आहेत.

'उत्तिष्ठत जाग्रत' मासिकाच्या हास्यसंघ विशेषांकात या सर्व शाखांची माहिती देण्यात आली आहे. प्रत्येक शाखेचे प्रमुख-उपप्रमुख, त्यांचे पत्ते, फोटो, स्थळ, वेळ यांचे तपशील, सदस्यांचा समूह फोटो यांचे तपशील त्यात आहेत. ही सर्व माहिती एकत्र अशी प्रथमच उपलब्ध होत आहे.

हास्य संघातील उपक्रम, दैनंदिन कार्यक्रम, हास्याचे प्रकार, हास्याचे फायदे, हास्ययोग आणि आहार याबद्दलचे लेखही या अंकात आहेत. डॉ. ह. वि. सरदेसाई यांचा हास्य-निरामय प्रकृतीचा राजमार्ग हा लेख, डॉ. धनंजय गुंडे यांचा 'हास्यामृत' हा लेख, डॉ. सुभाष देसाई यांनी विविध हास्यप्रकारांमध्ये दिलेली ८९ प्रकारांची यादी यांचा विशेष उल्लेख करायला हवा. हा अंक वाचून आपल्या गावातही हास्य क्लब सुरू करण्याची प्रेरणा जागरूक कार्यकर्त्यांना मिळेल. (सकाळ चॅरिटी ट्रस्ट, २७ ब, बुधवार पेठ, सिद्धार्थ चेंबर्स, पुणे २. फोन - २४४८ १०५५ अंक मूल्य - ३० रुपये.)

### * पारधी लेखकाचे आत्मकथन

दलित आत्मकथनांनी १९८०नंतरच्या दोन दशकात मराठी साहित्यक्षेत्रात चैतन्य आणले. उपरा, उचल्या यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. 'बलुतं' आणि 'उपरा' यांचे फ्रेंच वगैरे भाषांत अनुवाद झाले. फोर्ड फौंडेशनने दया पवार आणि लक्ष्मण माने यांना अमेरिकेच्या भेटीची संधी दिली. त्यामुळे एकूणच मराठीतील दलित लेखनाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. प्रत्येक दलित जाती जमातीबद्दलची अस्मिता जागृत झाली. त्या त्या जाती जमातीच्या लेखकांकडून समाजचित्रणाचे प्रयत्न होऊ लागले. प्रकाशकही या लेखनाला अग्रक्रम देऊ लागले. विद्यापीठांच्या पाठ्यपुस्तकात दलित आत्मकथनांना स्थान मिळू लागले. त्यामुळे त्यांच्यावर समीक्षात्मक लेखन होऊ लागले. त्याची भाषांतरे होऊ लागली. मराठीतून दलित वाङ्मयाची चळवळ दक्षिणेकडील राज्यात पोचली. दलित साहित्य संमेलने भरू लागली. दलित लेखकांना एकूण प्रसिद्धी व मान्यता मिळू लागली. खूप दिवस दडपले गेलेले प्रवाह खुले होऊ लागले.

गेल्या काही वर्षात दलित आत्मकथनांमध्ये एकसुरीपणा जाणवू लागल्याची तक्रार येऊ लागली. परंतु 'राघव वेळ' (नामदेव कांबळे) कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आणि दलित लेखकांना नवा उत्साह आला. शरणकुमार लिंबाळे यांच्या १५ पुस्तकांचे एकाच वेळी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. नामदेव ढसाळ यांची प्रकट मुलाखत सोलापूर साहित्य संमेलनात झाली. त्यांना अलीकडे अनेक पुरस्कारही मिळाले.

काही दिवसांपूर्वी पुण्यात 'मनोविकास'तर्फे अशोक पवार यांच्या 'बिराड' या आत्मकथनाच्या आवृत्तीचे प्रकाशन झाले. 'इळनमाळ' आणि 'दर कोस दर मुक्काम' या कादंबऱ्याही प्रसिद्ध झाल्या. त्यावेळी त्यांची जीवनकहाणी त्यांनी आपल्या भाषणातून आणि मुलाखतीतून मांडली. सध्या अशोक पवार हे चंद्रपूरच्या मध्यवर्ती सहकारी बँकेत लिपिक म्हणून काम करतात. पण पारधी समाजातील अशोक पवार यांना पूर्वायुष्यात खूप हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. ते म्हणाले, ''पूर्वी मी चोऱ्या करायचो. पोलिसांनी पकडल्यामुळे तुरुंगातही गेलो. शाळकरी वयात गाढवं वळायचो. मुलं चोर म्हणून चिडवायची. कसाबसा दहावी पास झालो. डीएडला ॲडमिशन घेतली, पण दहा दिवसातच ते सोडलं. एका प्राध्यापकाचा खिसा कापला. पाकिटातले पैसे संपल्यावर एसटी स्टँडवर बसलो होतो. तेव्हा ते प्राध्यापक समोर दिसले. 'मला पोलिसाच्या हाती देऊ नका' अशी करुणा भाकली. तर ते मला घरी घेऊन गेले. मला त्यांनी पोटभर खाऊ घातले. त्यांच्या घरातली बलुतं, अक्करमाशी वगैरे पुस्तकं वाचली. मग मी माझीच स्वत:ची कहाणी वहीत लिहून काढली. ती लिंबाळे यांना

पाठवली. त्यांनी प्रकाशक गाठून दिला. 'बिराड'चं प्रकाशन अस्मितादर्श संमेलनात झालं. लेखक म्हणून पेपरात नाव आलं. त्यामुळं पोलिस मला मानानं वागवू लागले. पारधी लोक माझ्याकडे सल्ल्यासाठी, मदतीसाठी येऊ लागले. त्यांना पोलिस चौकीतून सोडवण्याच्या वेळी पोलीस माझं बोलणं ऐकू लागले. माझ्या नव्या नोकरीमुळे परिस्थिती बदलली. पैसा मिळू लागला. भटक्या विमुक्तांच्या जीवनात परिवर्तन व्हायला हवे. आमचे नेते संघटनेपेक्षा मोठे झाले आहेत. त्यामुळे प्रश्न सुटत नाहीत.''

अशोक पवार यांच्या पुस्तकांना चांगला प्रतिसाद मिळतो आहे. त्यांना भावी लेखनासाठी शुभेच्छा.

**शंकर सारडा**
मो. ९८२३२६१०२३


**सर्व वाचक, सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा**

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी
मंडपाजवळ, कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९ ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

**www.mehtapublishinghouse.com**

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

**नवे कोरे**



# नष्ट नीड

**रवींद्रनाथ टागोर**
अनु. नीलिमा भावे

**१४०रु. पोस्टेज २०रु.**

चारू, आदित्य आणि शशांक हे आपापल्या जागी एका विशिष्ट परिस्थितीत सापडले आहेत. त्यामुळं त्यांचा मानसिक कोंडमारा होतो आहे. या कोंडमाऱ्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांना जवळच्या व्यक्तीतच सापडतो.

हा मार्ग आपल्याला नक्की कुठे नेणार आहे, याची कल्पना येण्याआधीच ते त्या मार्गावर चालायला सुरुवातही करतात.

आपापल्या स्वभावधर्मानुसार पुढे जाणाऱ्या त्यांच्या या वाटचालीतचे टप्पे कादंबरीकार टागोर या कथानकांमधून चित्रित करतात. त्यांच्या स्वभावधर्मानुसार ही कथानकेही वेगवेगळी होतात आणि त्यांचे शेवटही वेगवेगळे होतात.

कादंबरीकार टागोरांचा या विषयाचा शोध चालूच राहतो.

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

# पुस्तक परिचय

**नारायण मूर्ती यांच्या स्वप्नातला**
**समर्थ संपन्न भारत**

# अ बेटर इंडिया, अ बेटर वर्ल्ड




**एन. आर. नारायण मूर्ती** अनु. चित्रा वाळिंबे

इन्फोसिसचे संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांना एक आदर्श व्यावसायिक म्हणून जागतिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

'द इकॉनॉमिक टाइम्स'ने नारायण मूर्ती यांना भारतातील सर्वांत अधिक प्रभावशाली मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून इ. स. २००४ ते २००६ अशा तीन वर्षात गौरविले.

'द इकॉनॉमिस्ट'ने जगातील सर्वाधिक आदरणीय अशा अग्रगण्य दहा व्यावसायिकात नारायण मूर्ती यांचा समावेश केला आहे.

'अर्न्स्ट अँड यंग'ने वर्ल्ड 'आंत्रप्रेन्युअर ऑफ दि इयर' म्हणून त्यांची निवड केली. मॅक्स स्किमिधेनी लिबर्टी पुरस्काराचे ते एकमेव भारतीय मानकरी आहेत. इंडिया टुडे, फोर्बेस, टाइम, बिझनेस वीक, फॉर्च्युन वगैरे नियतकालिकांनी आदर्श व्यावसायिक आणि प्रवर्तक (इनोव्हेटर) म्हणून नारायण मूर्ती यांची निवड केली आहे.

भारत सरकारने 'पद्मविभूषण' ही पदवी देऊन त्यांच्या कार्याचे महत्त्व मान्य केले आहे. फ्रान्स आणि ब्रिटिश सरकारनेही त्यांना सर्वोच्च सन्मान देऊन त्यांच्या आंतरराष्ट्रीय कर्तृत्वावर शिक्कामोर्तब केले आहे.

१९८१ साली केवळ २५० डॉलर्सच्या भांडवलावर स्थापन केलेल्या 'इन्फोसिस' या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीने २००७ मध्ये तीन अब्ज डॉलर्सचा फायदा मिळवण्यापर्यंत उत्तुंग झेप घेतली आहे. बाजारपेठेतील तिचे भांडवली मूल्य २७ अब्ज डॉलर्सपेक्षाही जास्त आहे.

मानांकित कंपनी, उत्तम नोकरी देणारी कंपनी, सर्वोत्तम व्यवस्थापन असणारी कंपनी, उत्तम कॉर्पोरेट गव्हर्नन्स असणारी कंपनी अशी इन्फोसिसची जनमानसातील प्रतिमा आज सर्वदूर पसरलेली आहे.

एन. आर. नारायण मूर्ती यांनी व्यावसायिक नेतृत्वाचा एक उच्चतम आदर्शच निर्माण केला आहे आणि भारतीय आयटी क्षेत्राचा महिमा उंचावला आहे.

गेल्या काही वर्षात जगभरातील वेगवेगळ्या संस्थांच्या व परिषदांच्या व्यासपीठावरून त्यांनी दीडशेवर व्याख्याने दिली. त्यात व्यवस्थापन, तंत्रज्ञान, उद्योग, आरेखन, कायदा, विदेशी व्यापार, मुक्त कला, शिस्त, टीमवर्क, धर्मनिरपेक्षता, प्रामाणिकपणा, करारांचे पालन, समाजहिताला प्राधान्य, सक्षमीकरण, सांस्कृतिक वारसा वगैरे विषयांवरील आपले अनुभवसिद्ध चिंतन त्यांनी मांडले. आर्थिक सुधारणा, लोकसंख्या, भारतीय राजकारण, नोकरशाही, शहरीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्था, दारिद्र्य निर्मूलनासाठी तंत्रज्ञानाचा वापर, उच्च शिक्षण, व्यावसायिक नेतृत्व, कॉर्पोरेट गव्हर्नन्स, उद्योजकता, नव्या बाजारपेठा आणि संधी अशा अनेक प्रश्नांची ऊहापोह त्यांनी केली आहे. या

दीडशे प्लस व्याख्यानांतून ३८ व्याख्याने निवडून 'अ बेटर इंडिया, अ बेटर वर्ल्ड' हे पुस्तक पेंग्विनने प्रकाशित केले आहे. इन्फोसिसची स्थापना, त्यामागची भूमिका, मूल्यप्रणाली यांचीही चर्चा अधूनमधून होते. ही व्याख्याने जाणूनबुजून सोपी, साधी ठेवली आहेत. युवा पिढीला ती उद्‌बोधक वाटावीत, प्रेरणादायक ठरावीत अशी तळमळ त्यामागे आहे. त्यामुळे या पुस्तकातील विचारांचा पाठपुरावा करायला हवा.

'इन्फोसिस'ची स्थापना, आरंभीची वाटचाल, अडचणी व आव्हाने, व्यावसायिक मूल्ये याबद्दलचे संदर्भ या व्याख्यानात अनेकदा आलेले आहेत.

इन्फोसिस या संस्थेने माहिती-तंत्रज्ञान सेवाक्षेत्रातील आउटसोर्सिंगची कल्पना राबवून, 'ग्लोबल डिलिव्हरी मॉडेल'ला जगभर मान्यता मिळवून दिली.

१९८१ मध्ये सात सॉफ्टवेअर व्यावसायिकांनी इन्फोसिसची ही कंपनी स्थापन केली. भांडवल होते २५० डॉलर्स. १९८२ ते १९९२ या दहा वर्षांत इन्फोसिसचा महसूल १३०,००० डॉलर्सवरून पंधरा लाख डॉलर्स एवढा वाढला.

१९९१ नंतर भारतात राजीव गांधी यांच्या प्रेरणेने, आर्थिक सुधारणांचे आणि उदारीकरणाचे पर्व सुरू झाले. 'इन्फोसिस'च्या प्रगतीला खरा वेग आला.

१९९२ ते २००८ या १६ वर्षांत इन्फोसिसचा महसूल ४.१ अब्ज डॉलर्स झाला.

'इन्फोसिस'मध्ये ८८ हजार कर्मचारी आज काम करतात. या कर्मचाऱ्यांमध्ये केवळ भारतातलेच नव्हे तर जगातल्या ९० देशांमधले नागरिक आहेत. इन्फोसिसचे बाजारपेठेतील भांडवली मूल्य २७ अब्ज डॉलर्सवर आहे.

भारतातल्या माहिती-तंत्रज्ञान उद्योगाचा नफा इ. स. २००८ मध्ये ४० अब्ज डॉलर्सच्या घरात पोचला आहे.

१९९१ मध्ये भारताकडे परकीय चलनाची गंगाजळी जेमतेम १५ दिवस पुरेल एवढी असे. आज ती २०८ अब्ज डॉलर्स आहे.

परकीय गुंतवणुकीवरचे निर्बंध सैल केल्याने भारतीय कंपन्या मोठमोठ्या परदेशी गुंतवणूकदारांना भारतात गुंतवणूक करायला भाग पाडत आहेत. या आंतरराष्ट्रीय कंपन्यांमुळे भारतीय उद्योगांनी प्रचंड भरारी घेतली आहे.

भारतात कायदेशीर आणि न्याय्य मार्गाने व्यवसाय करता येतो, आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर स्पर्धा करून भारत आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतो, भारतीय कंपन्यांचं व्यवस्थापन जागतिक दर्जाचं आहे आणि भारतीय बाजारपेठ मूल्य-भांडवल वृद्धिंगत करण्यास सक्षम आहे हे गेल्या दोन दशकात भारताने संपूर्ण जगाला दाखवून दिले आहे.

कसबी, कुशल आणि स्वस्त मनुष्यबळ हा भारताच्या आर्थिक विकासाला चालना देणारा प्रमुख घटक आहे.

भारताच्या इतिहासात प्रथमच सॉफ्टवेअर उद्योगाने ५० अब्ज डॉलर्सच्या निर्यातीचे लक्ष्य गाठले आहे.

विमानतळ, रस्ते हॉटेल, वीज आणि दूरसंचार या मूलभूत सेवा विकसित झाल्या, तर माहिती तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर उद्योगाची आणखीही वेगाने भरभराट होईल. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये इंटरनेटला मोठे स्थान राहणार आहे. सॉफ्टवेअर निर्यातीसाठी जागतिक दर्जाच्या संज्ञापन सुविधा आवश्यक आहेत. यासारखी निरीक्षणे भावी प्रगतीच्या दृष्टीने खरोखरच मार्गदर्शक ठरतील.

इन्फोसिसची उभारणी ज्या तीन तत्त्वांवर झाली ती तीन तत्त्वे अशी :

१. गुंतागुंतीची सॉफ्टवेअर्स ग्राहकांच्या गरजांनुसार तयार करून, जागतिक स्पर्धात्मक पातळीवर अव्वल स्थान मिळवणे.

२. बाजारपेठेमध्ये आपले निराळे स्थान निर्माण करणे. कार्यप्रणाली व धोरण, नीतिनियम कंपनीच्या माहितीयंत्रणेत अंतर्भूत करणे.

३. ग्राहक समाधानात भर टाकणे, किंमती कमी करणे, उत्पादकता वाढवणे, ग्राहकांची संख्या वाढवणे.

या कल्पनेला योग्य अशी बाजारपेठ भारतात उपलब्ध नव्हती. त्यामुळे जागतिक बाजारपेठ शोधणे आवश्यक ठरले. जी-७ देशांमधील कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर निर्माण करण्याचा प्रयत्न इन्फोसिसने आरंभापासून केला. इन्फोसिसची स्थापना करण्याआधी नारायण मूर्ती यांनी कानपूरच्या आयआयटीत शिक्षण पूर्ण करून फ्रान्समध्ये माहिती तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षण घेतले.

नारायण मूर्ती हे एकेकाळी स्वत:ला पक्के कम्युनिस्ट मानत. परदेशात शिक्षणासाठी ते गेले. कानपूरच्या आयआयटीमध्ये कंट्रोल थिअरीचा अभ्यास त्यांनी केला. त्यावेळी अमेरिकेतील एका विद्यापीठातील एका संगणक अभियंत्याचे भाषण ऐकून नारायण मूर्ती प्रभावित झाले. कॉम्प्युटर सायन्समधील भावी प्रगतीची दिशा त्या अभियंत्याने स्पष्ट केली. पुढचा काळ संगणकाचा आहे असे ते म्हणाले. त्यांनी काही संशोधनपर लेख वाचण्याचीही शिफारस केली. ते लेख वाचल्यावर नारायण मूर्ती यांनी कॉम्प्युटर सायन्स शिकायचे ठरवले. त्यासाठी परदेशात गेले. फ्रान्समध्ये संगणक शास्त्राचे शिक्षण घेतले. नंतर भारतात परतण्यापूर्वी बल्गेरिया, युगोस्लाव्हिया वगैरे कम्युनिस्ट देशांना त्यांनी भेटी दिल्या. बल्गेरिया-युगोस्लाव्हियाच्या सीमेवरच्या 'नीस' या गावी आल्यावर रविवारी बँका बंद असल्याने आणि जवळ स्थानिक चलन नसल्याने नारायण मूर्तींना दिवसभर उपाशी राहावे लागले. रेल्वे स्टेशनवरच बसून राहावे लागले. नंतर रेल्वेत एका तरुणीबरोबर फ्रेंचमध्ये गप्पा मारत असताना बल्गेरियातील साम्यवादी सरकारवर टीका केल्याचा आरोप करून तेथील पोलिसांनी

त्यांना रेल्वेतून उतरवले. आठ बाय आठच्या थंडगार खोलीत त्यांना डांबून ठेवले. बहात्तर तास त्या खोलीत काहीही न खातापिता त्यांना राहावे लागले. नंतर बाहेर काढून इस्तंबूलच्या मालगाडीच्या गार्डच्या डब्यात बंदिस्त करण्यात आले. परत २४ तास उपाशी. सुरक्षारक्षकाने त्यांना म्हटले, ''भारताचे बल्गेरियाशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत, म्हणून तुम्हाला सोडून देत आहोत. नाहीतर तुरुंगातच खितपत पडला असता.'' १०८ तास कडकडीत उपास आणि थंडीतला प्रवास यामुळे नारायण मूर्ती यांचा कम्युनिस्ट देशांच्या मानवतावादी कॉमरेडशिपबद्दलचा भ्रमाचा भोपळा फुटला. माणूस म्हणूनही सौजन्याची वागणूक न देणाऱ्या साम्यवादी देशांच्या मनोवृत्तीचा त्यांना उबग आला. डाव्या विचारसरणीबद्दलचा उरलासुरला कळवळाही लुप्त झाला. साम्यवादाने समाजातील गरिबी दूर होत नाही, सर्वांना समान वागणूक मिळत नाही, हे लक्षात आले. 'संभ्रमित डावा ते कट्टर मानवतावादी भांडवलशाहीवाला'असे नारायण मूर्ती यांचे त्या एका अनुभवाने परिवर्तन झाले. गरिबी दूर करण्यासाठी मोठ्या संख्येने नोकऱ्या निर्माण करणारे उद्योगधंदेच हवेत, अशी त्यांची खात्री पटली. १९७४ मधील ही घटना. तिचा नारायण मूर्ती यांच्यावर खूप प्रभाव पडला.

१९८१ मध्ये इन्फोसिस ही कंपनी सुरू केली. नऊ वर्षात धीम्या गतीने धंदा होत राहिला. दहा लाख रुपयांना 'इन्फोसिस' विकत घेण्याची तयारी एका उद्योजकाने दाखवली.

नारायण मूर्ती यांनी या ऑफरला नकार दिला. कंपनी विकायचीच असेल तर मी घेतो असे ते म्हणाले. दहा लाखांची ऑफर आलेल्या इन्फोसिसचे आजचे भांडवल मूल्य २८ अब्ज डॉलर्स आहे.

इन्फोसिसचा व्याप वाढत गेला. स्पर्धेच्या नावावर भाव पाडून मागणाऱ्या ग्राहकांचा दबाव इन्फोसिसने धुडकावून लावला. भारतीय आध्यात्मिक परंपरेचा प्रभाव, आत्मबळ वाढवतो. अनुभवातून शिकण्याचा बाणा व विश्वास, विकास प्रगतीची मनोधारणा यामुळे आजवरची नेत्रदीपक वाढ झाली.

या जगात आपली यशाची मुद्रा उमटवायची आहे हा निर्धार हवा.

त्याचबरोबर आपण निर्माण केलेल्या संपत्तीचे आपण केवळ काही कालापुरते रखवालदार आहोत हे कधी विसरता कामा नये.

नारायण मूर्ती हे तीन गोष्टींना प्रमाण मानतात. त्या गोष्टींनी त्यांचा दृष्टिकोन बनलेला आहे.

एक - मॅक्स वेबरचे दि प्रॉटेस्टंट एथिक अँड दि स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम हे पुस्तक. वैयक्तिक तसेच समाजाच्या विकासासाठी उद्योजकता हवी. कष्ट, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम यांना पर्याय नाही.

दोन - महात्मा गांधी यांच्या नेतृत्व गुणांचा प्रभाव. बोले तैसा चाले ही नेतृत्वशैली. उदाहरणातून आदर्श घालून देणे. लोकांची नाडी अचूक ओळखलेला गांधींसारखा दुसरा नेता नाही.

तीन - वसाहतवादानंतरच्या प्रस्थापित समाजाची वसाहतवादी मनोधारणा उलगडून दाखवणारे फ्रॅझ फॅननचे पुस्तक. वसाहतवादानंतरच्या समाजाचा गोऱ्या मुखवट्यामागचा काळा चेहरा.

इन्फोसिसने या धोरणात्मक सूत्रांचा प्रामाणिकपणे अवलंब केला. कुठलेही आडमार्ग वा सोपे मार्ग स्वीकारण्याचे टाळले. त्यामुळे परदेशी कंपन्यांचा विश्वास संपादन करण्यात इन्फोसिसला यश लाभले. गतवर्षी अमेरिकेला आर्थिक मंदीचा तडाखा बसला; पण इन्फोसिसचे ग्राहक कायम राहिले. अमेरिकन कंपन्यांनी आउटसोर्सिंग कमी करावे, असे राष्ट्राध्यक्ष ओबामा यांनी जाहीर करूनही इन्फोसिससारख्या आयटी क्षेत्रातील कंपन्यांची सेवा घेण्यावाचून गत्यंतर नसल्याने इन्फोसिसच्या उलाढालीवर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाही.

नारायण मूर्ती केवळ इन्फोसिसचे हित कशात आहे एवढाच विचार करून थांबत नाहीत. आर्थिक व सामाजिक विकासाच्या मुख्य प्रवाहाचा लाभ भारतातील सर्वच क्षेत्रांना व्हावा, अशी कळकळ त्यांना कार्यप्रवण ठेवत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषत: १९९१ नंतर खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यावर भारताची जी सर्वांगीण प्रगती झाली, तिचा त्यांना अभिमान वाटतो.

१९६५ मध्ये सुरू झालेल्या डॉ. स्वामीनाथनप्रणीत हरितक्रांतीमुळे बारमाही धान्याची आयात करणारा भारत हा अन्नधान्याची निर्यात करणारा देश झाला.

डॉ. कुरियन यांनी 'धवलक्रांती' घडवून आणली आणि भारत हा देश जगातला सर्वांत मोठा दूध उत्पादक देश बनला. ११९१ साली भारताजवळ फक्त दीड अब्ज डॉलर्सची परकीय गंगाजळी होती. आर्थिक सुधारणानंतर आज ही गंगाजळी २२० अब्ज डॉलर्सवर जाऊन पोचली आहे.

सॅम पित्रोदा यांनी ५०० लाइन्स एपीएबीएक्स डिझाइन करून शहरी आणि ग्रामीण भागातील जनतेला जवळ आणले. दूरसंचार क्षेत्रात क्रांती घडवून आणली. अवकाश तंत्रज्ञान, उपग्रह दूरचित्रवाणी, अणुशक्ती, सॉफ्टवेअर क्रांती, दूरचित्रवाणी व संज्ञापन क्षेत्रातील स्वायत्तता या आठ उपक्रमांनी स्पर्धात्मक जागतिक बाजारपेठेत भारताला मानाचे स्थान मिळवून दिले. या पुढच्या दशकात भारतातील प्रत्येक मुलाला किमान शिक्षण, आरोग्य सुविधा, पोषण, निवारा उपलब्ध व्हावा, प्रामाणिकपणा आणि परिश्रम यांच्या जोरावर यश मिळू शकते, असा प्रत्येक मुलाला विश्वास वाटावा, शांतिप्रिय, कार्यक्षम, न्याय्य, बहुलमतवादी, आदरशील, विश्वासार्ह अशी

आपली ओळख निर्माण व्हावी असे स्वप्न नारायण मूर्ती बघत आहेत.

सॉफ्टवेअर उद्योगाला नारायण मूर्ती आधुनिक भारताचे मंदिर असे मानतात.

जागतिक बाजारपेठेत आपल्या वस्तू आणि सेवा यांचा विस्तार करण्याची जी संधी आज लाभली आहे तिचा उपयोग करून भारतात रोजगार निर्माण करणे, स्पर्धात्मक वातावरणात काम करून जगाच्या कानाकोपऱ्यातून उत्तम वस्तू व सेवा वाजवी किंमतीत आयात करणे सुलभ जावे इतके परकीय चलन आपल्या गाठीशी असणे, निर्यात आणि देशांतर्गत विनियोग यांच्या प्रमाणात समतोल साधणे, निर्यातीवर लक्ष ठेवून उत्पादन आणि दर्जा टिकवून जागतिक बाजारपेठेत टिकून राहणे या चार सूत्रांचा नारायण मूर्ती आग्रह धरतात.

भारतातील सॉफ्टवेअर कंपन्यांनी उत्पादनापेक्षा सॉफ्टवेअर सेवांवर जास्त भर दिला आहे, याबद्दल काही लोक टीका करतात. पण ती टीका नारायण मूर्ती यांना मान्य नाही. भारताची आजच्या घडीची ही गरज आहे; आणि आर्थिकदृष्ट्या उत्तम स्थैर्य देणारे रोजगार सॉफ्टवेअर सेवा कंपन्या निर्माण करीत आहेत याबद्दल आज तरी समाधान वाटायला हवे असे ते म्हणतात.

आपल्याकडील राजकीय नेतृत्व, नोकरशाही, कॉर्पोरेट लीडर्स आणि शिक्षणसंस्था या सर्व घटकांनी उत्साहाने काम करून पंडित नेहरूंनी बघितलेले 'हायटेक'चे स्वप्न प्रत्यक्षात आणायला हवे असे नारायण मूर्ती म्हणतात.

दीडशेपैकी ३८ व्याख्यानांचीच निवड करून 'अ बेटर इंडिया, अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. इन्फोसिस, जागतिकीकरण, उद्योजकता, औद्योगिक सामाजिक जबाबदारी, कॉर्पोरेट व सार्वजनिक व्यवस्थापन, नेतृत्वासमोरील आव्हाने, शिक्षण, महत्त्वाचे राष्ट्रीय प्रश्न (आर्थिक सुधारणा, लोकसंख्या, शहरीकरणाचा वेग), सामर्थ्यवान भारताच्या उभारणीची जिद्द आणि युवापिढीपुढची आव्हाने अशा दहा ढोबळ विषयांच्या अनुषंगाने या व्याख्यानांचे गट वा वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यात अनेक विषय साहजिकच आलेले आहेत. नारायण मूर्ती यांची त्यावरची मते व्यावहारिक तरीही आदर्शवादी आहेत. ही मते गुणवत्ता, सचोटी, न्याय, समान संधी यावर भर देणारी आहेत.

सामर्थ्यशाली प्रगतिशील भारताची उभारणी करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येक चिंतनशील भारतीयाने या पुस्तकाची पारायणे करायला हवीत.

तरुण वर्गाने आपण उद्याचे भावी नेते म्हणून नारायण मूर्ती यांच्या विचारांचे मन:पूर्वक अध्ययन करून आपल्या कार्यकर्तृत्वाची क्षितिजे रुंदावण्याची जिद्द बाळगायला हवी.

**किंमत : २५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

**नवे कोरे**

**संवेदनशील वयाचं मुक्त आत्मकथन**

# उधाण वारा

**(माझं कुवारपण भाग २)**

**तसलिमा नासरिन**

अनुवाद

**विलास गीते**

**४००रु. पोस्टेज ३०रु.**




१९९९ साली प्रकाशित झालेल्या तसलिमा नासरिन यांच्या 'आमार मेयेबेला' (माझं कुवारपण) या आत्मकथनाने बंगाली साहित्यविश्वात खळबळ माजली. एक अविस्मरणीय आत्मकथन म्हणून आता ते पुस्तक मान्यता पावले आहे. 'उतोल हवा' (उधाण वारा) हा त्याच आत्मकथनाचा दुसरा भाग आहे.

या भागात तसलिमांच्या सोळा ते सव्वीस वर्षापर्यंतची कहाणी आहे. या पुस्तकातही त्यांच्या रोखठोकपणाचे व करुणेचे दर्शन होते. पण त्यांची भोवतालाकडे पाहण्याची दृष्टी आणखी तीक्ष्ण झाली आहे. अनुभवांचा परीघ विस्तृत झाला आहे. त्यामुळे तसलिमांची जडणघडण कशी झाली हे या पुस्तकात आणखी तपशीलवारपणे समजते. एका मागासलेल्या समाजात आणि कुटुंबात मोठ्या झालेल्या युवतीने पुराणमतवादाची बंधने कशा प्रकारे तोडून टाकली हे या पुस्तकात दिसते. त्यांचे प्रेमप्रकरण, त्यामधील आनंद-वेदना, संबंधामधले चढउतार आणि शेवटी त्यातून बाहेर पडणे– हे सारे सांगताना तसलिमांचे गद्य काव्याच्या तेजाने झळाळते.

या धारदार आत्मकथनाचा मराठी अनुवाद समर्थ अनुवादक विलास गीते यांनी तितक्याच प्रत्ययकारीपणे केला आहे.

# पुस्तक परिचय

**सौदी अरेबियामधील चार तरुणींच्या जीवनातील सुखदुःखांचा ई-मेलच्या माध्यमातला लेखाजोखा**

# गर्ल्स ऑफ रियाध




**रजा अल्सानिया** अनु. स्नेहल जोशी

मध्यपूर्वेतील मुस्लीम समाज हा आजही स्त्रियांना मोकळेपण, स्वातंत्र्य द्यायला तयार नाही. इराण वगैरे देशात काही काळ स्त्रियांना शिक्षण, कलांची आराधना, नोकरीव्यवसायानिमित्त स्वतंत्र आणि एकटे राहण्याची मुभा वगैरे सुधारणावादी पर्व येऊन गेले; परंतु खोमेनीच्या अमदानीत पुन्हा जुने मूलतत्त्ववादी वातावरणच नव्याने स्त्रियांना घरातच बंदिस्त करण्याच्या दिशेने अधिकाधिक कडवे व कडक बनत गेले. अशा परिस्थितीत एखाद्या महिलेने पुस्तक लिहून आपल्या व्यथावेदना मांडल्या, तर सौदी अरेबियातील सनातनी लोक खवळून उठले तर नवल नाही.

'गर्ल्स ऑफ रियाध' या अरेबिक भाषेत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद २००७ मध्ये प्रसिद्ध झाला आणि आता त्याचा मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे बाजारात आला आहे.

हे पुस्तक रजा अल्सानिया या महिलेने लिहिले आहे. ''जाणूनबुजून सौदी स्त्रियांची प्रतिमा डागाळण्याचा आरोप तिच्यावर करण्यात आला होता. पण तिने त्याला भीक घातली नाही. तिचा बोल्डनेस थक्क करणारा आहे.''

जिथे दाढीवाले शेख आपल्या तंबूत जनान्यातील सुंदर स्त्रियांच्या घोळक्यात शृंगार करत बसलेले असतात असा देश म्हणजे सौदी अरेबिया; अरेबियन नाइट्सचा देश, पेट्रोलच्या प्रचंड साठ्यामुळे श्रीमंत झालेला देश अशी सौदी अरेबियाची प्रतिमा पाश्चात्य माणसाच्या मनात घट्ट स्थिरावलेली आहे.

बिन लादेनच्या दहशतवादाने ही प्रतिमा काहीशी डळमळली खरी; पण स्त्रियांच्या बाबतीत कायमच राहावी अशीच सद्य:स्थिती आहे. परंतु या सनातनी, कर्मठ, राजवटीला आता खिंडार पडत आहे हेही खरे आहे. रुढीवादी समाजातल्या मुली आता उच्च शिक्षणासाठी कॉलेज वसतिगृहात राहतात. गोषा वगैरे न पाळता तरुण मुलांबरोबर मोकळेपणाने वावरतात. नोकरी व्यवसाय करतात. पुरुषांच्या अधिपत्याखाली राहूनही आपली अस्मिता जपतात, प्रेमात पडू शकतात आणि प्रेमभंगाचाही सामना करू शकतात. नवरा बुळ्यासारखा टाळाटाळ करू लागला, तर त्याच्या तोंडातही ठेवून देतात.

'गर्ल्स ऑफ रियाध' या कादंबरीतील गामराह, मिचैल्ली, सादीम आणि लामीस या श्रीमंत इस्लामी घराण्यातील चार तरुणी रियाध विद्यापीठात पाठ्यपुस्तकाबरोबर प्रेमाचे पाठही गिरवतात आणि आपल्या पालकांनाही चकवतात. हे करताना काही फासे उलट पडतात आणि अनर्थही घडतात. परंतु पालकांच्या मनमानीपणाला आव्हान देण्याची आणि आपण केलेल्या कर्माची जबाबदारी घेण्याची प्रगल्भ परिपक्वताही दाखवतात. अरब राष्ट्रातील या बंडखोर तरुणी आपल्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा आपल्या जीवनाच्या आणि कृतीच्या माध्यमातूनच प्रकट करतात. इस्लाममध्ये

परिवर्तन होत आहे, असा निष्कर्ष या कादंबरीवरून काढणे योग्य ठरेल असे नाही, पण ते होत आहे हे लक्षात येते एवढे खरे!

या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिचे इंटरनेटयुगाला साजेसे तंत्र.

ई-मेलच्या रूपात पाठवलेल्या ५० पत्रांचे संकलन म्हणजे ही कादंबरी. दर शुक्रवारी एक ई-मेल ऑनलाइन नेटवर्कवर सदस्यांना पाठवण्यात येते.

या ई-मेल्स सीरेह वेनफदाने सीरेहवेनफदा७इटी या याहू ग्रुपला १३ फेब्रुवारी २००४ ते १८ फेब्रुवारी २००५ या दरम्यान पाठवल्या आहेत. या ५० पत्रांतून चार मैत्रिणींच्या एका वर्षातील बऱ्यावाईट घटनांची नोंद घेतली गेली आहे. सर्वांची लफडी उघड करायचा इरादा प्रथमच दिसतो.

निझार या तरुणावर लामीस प्रेम करीत होती. त्याच्याशी निकाह करून ती कॅनडामध्ये छोट्या बाळासह पदवीपरीक्षेची तयारी करीत आहे.

मिचैली बीएमडब्ल्यू कार दिमाखात चालवते. लामीसबरोबर शॅम्पेनची मजा लुटते. ती संगणक तज्ज्ञ आहे.

पहिल्याच पत्रात गामराहच्या विवाहाचं वर्णन येतं. लग्नानंतर चुंबन घेण्याचा आग्रह होतो. इटलीत हनीमून. हनीमूनला जाण्याआधी तिची आई 'पुरुषांची आसक्ती पेटवण्याचा' कानमंत्र तिला देते. नवरा शिकागोला डॉक्टरेट करणारा.

सादीम बिझनेस मॅनेजमेंटची पदवीधर. दिसायला सुंदर. वालीदशी तिचं लग्न होतं. नवऱ्याला सुख देण्यासाठी काहीही करण्याची प्रतिज्ञाच तिने केलेली असते. आणि विद्यापीठाच्या परीक्षेत चक्क नापास होते.

या ई-मेल पत्रांच्या विषयांवरून या चौघी मैत्रिणींच्या जीवनातील घडामोडींची कल्पना येते. पहिल्याच पत्रात "मी माझ्या मित्रांबद्दल लिहिणार आहे" असे स्पष्ट करून, "हे संकेत स्थळ उघडंनागडं सत्य वाचण्याचं धैर्य असणाऱ्या आणि ह्या वेडेपणाच्या साहसात टिकून राहण्याची चिकाटी असणाऱ्या सहनशील सदस्यांसाठी आहे" असे स्पष्ट केले आहे.

मैत्रिणींचा सल्ला न घेता आपण या ई-मेल लिहिण्यास आरंभ केला आहे, कारण या मैत्रिणी पुरुषांच्या छायेत दबकून, घाबरून कशाबशा जगत आहेत, कारागृहातल्या बंदिनीसारखं त्यांचं आयुष्य शुष्क झालेले आहे, कुलूप लावून बंद केलेल्या जनानखान्यातल्या झगझगीत कपड्यात नटलेल्या बाहुल्यांप्रमाणे वावरत आहेत. स्फटिकपात्रात मरणाऱ्या फुलपाखरांसारख्या गुदमरत आहेत. त्यांच्या घोट्यांभोवती रक्ताळलेल्या साखळ्या बांधलेल्या आहेत. रात्री पुरुषी विनवण्यांना इच्छेविरुद्ध देखील सामोरे जावे लागते. त्या सर्वांबद्दल या ई-मेलमध्ये मोकळेपणाने लिहिण्याचा इरादा पहिल्याच पत्रात स्पष्ट केला आहे. विनोदी, तिरकस, उपरोधपूर्ण शेरेबाजी

करण्यात तिचा हातखंडा आहे. उदाहरणार्थ,

* ''ती मुलगी पहा. तिच्याकडे शारीरिक सौंदर्य नक्कीच आहे.''
  ''कोणतं सौंदर्य - पुढची बाजू की मागची बाजू?''
  ''तू काय चकणी वगैरे आहेस का? अर्थातच मागची बाजू.''
  ''ती जरा जास्तच आहे. तिच्या मागच्या बाजूचा थोडा गोळा काढून पुढं जोडायला हवा.'' (८)
* प्रत्येक पुरुषाने जितक्या स्त्रियांचे चेहरे आपल्या मेंदूच्या पटलावर साठवता येतील तेवढे साठवण्याचा प्रयत्न केला (९)
* गामराहचा चेहरा आणि लाल अंगप्रत्यंग गुलाबी दिसत होते. ती मोरक्कन हम्माम करून, शरीराला मालिश करून, चेहऱ्यावरचे सर्व केस दोऱ्याने ओढून आणि साखरेच्या चिकट हल्लावाच्या मिश्रणाने अंगावरचे नको असलेले केस उपटून आलेली होती. (१४)
* भरपूर उंची आणि कमावलेले शरीर यामुळे लामीस पुरुषासारखी वाटत होती. तिनं पुरुषी पद्धतीचा ढिलाढाला थोब (सैलसर पांढरा चोळणा) घातला होता. (१४)
* आपला नवरा रशीद याचा बर्फासारखा थंडपणा रोजच्यारोज बघून गामराहला वाटे, आपल्याला यानं शेकडो वेळा भोसकून ठार केलेलं आहे. सिंह राशीच्या माणसाचा हट्टीपणा आणि चुकारपणा यांचा रशीद हा उत्तम नमुना होता. (५०)
  गामराह मिथुन राशीची होती. आकर्षक, उत्साही, आनंदी, भावनाप्रधान, लोकांना पागल करणारी. गुंतागुंतीच्या स्वभावाची.

तिसऱ्याच ई-मेलमध्ये स्कूल इन्स्पेक्टर उम नुवाय्यिर या कुवेती स्त्रीच्या 'नुरी' या मुलाची हकीकत आली आहे. बारा-तेरा वर्षांचा झाल्यावर तो मुलगा मुलीसारखे कपडे घालणे, उंच टाचेचे बूट घालणे, मेकअप करणे, लिपस्टिक लावणे, केस लांब वाढवणे वगैरे गोष्टीत रस घेऊ लागला. मुलगा असून मुलीसारखी लक्षणं दाखवणाऱ्या या मुलाला त्याचा बाप एकदा खूप मारतो आणि मुलाचे हे अनैसर्गिक वागणे बघून, त्याचा व त्याच्या आईचा त्याग करून दुसऱ्या बायकोशी संसार थाटतो. 'नुरी'ला सगळेजण 'नुवाय्यिर' अशा स्त्रीलिंगी नावानेच ओळखू लागतात. इम नुवाय्यिर आपल्या मुलाचे वर्तन सहजपणे स्वीकारते आणि स्वत:लाही ती 'मुलीची आई' असे म्हणवून घेऊ लागते. आपल्या मुलीच्या मैत्रिणी घरी याव्यात म्हणून ती प्रयत्न करते आणि घरी येणाऱ्या तरुण मुलींना मोकळेपणाने वागू देते.

सौदी पुरुषांचे वेगवेगळे नमुने रजा अल्सानिया अर्थातच पेश करते.

सादीमच्या प्रेमात पागल झालेला वालीद लग्नाचा करारनामा झाल्यावर तिला वेळीअवेळी भेटून वा फोनवरून सारखा तिच्या संपर्कात राहतो. ती म्हणालेल्या वस्तू तिला आणून देतो. त्याला अधिक खूष करण्यासाठी एके रात्री सादीम त्याला कौमार्याची मर्यादा ओलांडू देते. नंतर वालीद तिला भेटायचे टाळतो. आठ दिवसांनी घटस्फोटाचे कागद पाठवून देतो. बिचारी सादीम. विद्यापीठाच्या पहिल्या परीक्षेत बऱ्याच विषयात नापास होते.

सादीमच्या वर्गातली एक विवाहित मुलगी आपल्या नवऱ्यासाठी बायको शोधायच्या मोहिमेवर बाहेर पडते. तिच्या लग्नाला एक वर्ष होणार होते. लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाची भेट म्हणून नवऱ्याला नवी बायको देण्याचा तिचा बेत होता. का? तर ती म्हणे, नवरा दुसऱ्या बायकोबरोबर असेल तेव्हा घर स्वच्छ करणे, केसांना रंग लावणे, हाताला मेंदी लावणे, त्याच्यासाठी नट्टापट्टा करणे यासाठी वेळ काढणे तिला शक्य होईल. नवरा क्षणभरही नजरेआड होऊ देत नसेल तर एकट्या बाईने करायचे तरी काय? (४२)

शिकागोमध्ये रशीदची उपेक्षेची थंड वागणूक बघून गामराह उद्विग्न व्हायची... बऱ्याच दिवसांनी तिला रशीदच्या वागण्याचे कोडे उलगडते. गामराहशी लग्न होण्याआधीच त्याचे कारी नावाच्या फिलिपिनो मुलीवर प्रेम होते. ते अजूनही एकमेकांना भेटतात. कारी हॉटेलमध्ये राहात असते. त्या बदफैली बाईचा गळा दाबून तिला ठार मारायचा विचार गामराहच्या मनात घोळत असतो. कारी तिला भेटल्यावर म्हणते, ''तुला भेटून आनंद वाटला. रशीद तुझ्याबद्दल बोलत असतो. तू भेटलीस म्हणून बरं वाटलं. तुझा नवरा कुणावर प्रेम करतोय हे तुझ्या ध्यानात आता येईल. त्यानं फार सहन केलंय आजवर. त्याला वाटलं होतं, तू इथं आल्यावर सुधारशील. त्याच्या स्त्रीबद्दलच्या आदर्श कल्पनेपर्यंत पोचशील. माझ्यासारखी होशील. पण तू तुझं सौदी बेंगरुळपण सोडायला तयारच नाहीस.''

कारी इंग्रजीत काय बोलली ते सगळंच गामराहला समजलं नाही.

गामराहनं आपल्या अरेबिकमध्ये तिला भरपूर शिव्याशाप दिले.

चिडलेल्या कारीने मोबाईलवरून रशीदला फैलावर घेतले.

रशीद गामराहला सांगतो - कारीची क्षमा माग. मला तुझं तोंडही बघायची इच्छा नाही.

गामराह त्याला म्हणते, ''त्या एशियन नोकराणीसाठी मला फसवणारा तू....''

रशीद तिच्या गालावर थप्पड मारतो.

गामराह म्हणते, ''मला का मारतोस? मी गरोदर आहे याचा तरी विचार कर.

मी एका चांगल्या घराण्यातली मुलगी आहे. एका फालतू रांडेशी धंदा करणारा तू, जरा तरी लाज ठेव.''

रशीद तिला रियाधला तिच्या माहेरी पाठवतो.

बाळंतपणासाठी लेक आली म्हणून तिची आई हर्षभरित होते.

पण काही दिवसांनी घटस्फोटाचे कागद येतात. त्यातील मजकूर वाचून गामराह हैराण होते.

गामराहची आई रशीदच्या नावाने बोटे मोडते, ''जसं तू माझ्या मुलीसाठी माझं हृदय जाळलंस, तसं रशीद, अल्ला तुझ्या हृदयाची राख करील. तुझ्या आईच्या हृदयाची ही–''

घटस्फोटामुळे गामराहला फार दु:ख झाले.

प्रसूतीसाठी गामराह जाते तेव्हा ती म्हणत असते, ''मला मरावंसं वाटतंय. मला हे मूल नको.''

छत्तीस तास कळा काढल्यावर मुलगा झाल्याचे तिला कळते.

सालेह असे त्याचे नाव ठेवण्यात येते. रशीदच्या वडिलांचे नाव.

रशीदची आई आपल्या नातवाला पहायला रोजरोज येते.

सालेह नाव ठेवल्याने रशीदचे कुटुंबीय तिच्यावर खूष होतात.

गामराहला तिची आई एकदा लेबाननला घेऊन जाते. कॉस्मेटिक सर्जरीने तिचे नाक सरळ करण्यात येते. चेहरा रासायनिक द्रव्याने स्वच्छ केला जातो. केशरचनेत बदल केला जातो. ती आता सुंदर दिसते. कॉस्मेटिक सर्जरी इस्लामच्या कायद्याविरुद्ध म्हणून अपघातात नाक मोडल्याचे कारण सांगण्यात येते.

गामराहची इंटरनेट चॅटिंगमध्ये सुलतानशी मैत्री होते. तिचं इंटरनेटवरचं नाव प्राइड. आपण सायन्सच्या डिग्रीसाठी अभ्यास करतोय असे ती खोटेच सांगते. सुलतानला आपला फोटो म्हणून ती आपली बहीण घादाह हिचा फोटो गंमत म्हणून पाठवते. त्यातूनही गुंतागुंत निर्माण होते. ती निस्तरण्यासाठी बरीच यातायात करावी लागते.

चौघींच्या चार तऱ्हा... नियतीचा खेळ बघताना मुस्लीम देशातील स्त्रीजीवनाचे वेगळेपणही मनावर ठसते.

एक सांस्कृतिक दस्तऐवज, नीतिविषयक दृष्टिकोन या दृष्टीनेही हा ई-मेलवरचा पत्र-खेळ खूप नवे सामाजिक भान देईल. तो मुळातूनच वाचणे सोयीचे.

**किंमत : २६०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

# पुस्तक परिचय

**सत्पुरुषांच्या जनकल्याणाच्या नाना कळा, माणसाला मदत करण्याची देवाची रीत**

# द फकीर




**रुझबेह एन. भरूचा** अनु. सुनीति काणे

आजन्म मौनव्रत धारण करणारे मेहेरबाबा हे एक सत्पुरुष. त्यांचे शिष्यत्व वा माहात्म्य याचा अनुभव आध्यात्मिक आनंददायक.

'रुझबेह भरुचा' या पार्शी गृहस्थाने लिहिलेली 'द फकीर' ही कहाणी. मेहेरबाबा यांच्यासारख्या गुरूचा लाभ झाला, तर जीवनातील अनेक समस्यांचा सहजपणे निरास होऊ शकतो अशी जनसामान्यांची श्रद्धा आहे. एखाद्याची व्याधी दूर करण्याबद्दलही काही साधुसंतांची ख्याती असते. त्याबाबत असेही म्हणतात की त्या व्यक्तीला बरे करताना त्या व्यक्तीची व्याधी साधुसंत स्वत:कडे घेतात. म्हणजे स्वत: त्या व्याधीचा स्वीकार करतात. त्यांची आत्मिक ऊर्जा त्या व्याधीमुळे होणाऱ्या यातना-वेदना सहन करण्याएवढी सामर्थ्यशाली असते.

या आध्यात्मिक प्रक्रियेचे निर्देश किंवा उल्लेख वेगवेगळ्या साधुपुरुषांच्या संदर्भात ऐकायला/वाचायला मिळतात. अशा व्यक्ती शिष्यांच्या माध्यमातूनही हे कार्य करतात.

'द फकीर' ही कादंबरी मेहेरबाबांसारख्याच एका सिद्धसमर्थ गुरूचे आणि त्याने 'रुद्र'सारख्या संसारतापाने पोळलेल्या पस्तिशीतल्या एका तरुणाला शिष्यत्व देऊन माध्यम म्हणून त्यांचे दृढ होत जाणारे भावनिक वा आध्यात्मिक संबंध यांचा आलेख पेश करते.

गुरू एकेक संकल्पना स्पष्ट करीत जातो आणि या विश्वाचे, देवाचे, गुरूचे स्वरूप, प्रार्थना, दया, करुणा, प्रेम, मन, हृदय, आत्मा, कर्म, जन्म-मृत्यू, दु:ख व वेदना, अतृप्त आशा आकांक्षांमुळे पृथ्वीवरच घुटमळणाऱ्या मृताच्या आत्म्याला किंवा एखाद्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूचा स्वीकार न करणाऱ्या व्यक्तींमुळे मृताच्या आत्म्याला परलोकातही शांतीचा लाभ न झाल्याने होणारा त्रास वगैरे बाबींचा गुंता उलगडून दाखवतो. 'द फकीर' असे शीर्षक असल्यामुळे एखादा सुफी अवलिया नायक अभिप्रेत असावा असा ग्रह होतो. परंतु त्याला बाबा हे नाव दिल्याने हा सिद्धपुरुष सुफी अवलियाची फारशी काही लक्षणे दाखवत नाही, याचे आश्चर्य करावे लागत नाही. रुद्र हा हिप्पीटाइप तरुण आणि त्याला भेटलेला अजब विनोदबुद्धी असलेला बाबा - या दोघांचा प्रवास आणि ऋणानुबंध आपल्या आध्यात्मिक जिज्ञासेला बरीच चालना देतो.

'रुद्र' हा बाबांकडून एकेका संकल्पनेचा आशय ग्रहण करीत जातो आणि बाबांच्या अनुग्रहाने 'माध्यम' म्हणून स्वत:ची जडणघडण करीत 'सिद्धी' मिळवत जातो. दानधर्माने सत्प्रवृत्ती आणि सद्भावना यांच्यात 'अनिष्ट' गोष्टींचा प्रभाव क्षीण करण्याची क्षमता येते, असेही बाबा रुद्रच्या मनावर ठसवतात. माध्यमाचा प्रभाव लक्षात यावा यासाठी काही विलक्षण घटनाही या कहाणीत येतात.

आध्यात्मिक सिद्धींच्या जगात नेणारी ही कादंबरी कोणा एका संतपुरुषाच्या

जीवनरहस्याच्या गूढतरल गहराईचा प्रत्यय देते.

या सृष्टीत काही रहस्य दडलेली आहेत. सत्कर्माकडे मानवाची प्रवृत्ती वाढावी म्हणून संत सज्जनांचे आत्मे (ऐहिक मृत्यूनंतरही) कार्यरत असतात आणि आध्यात्मिक सत्यदर्शनाच्या दृष्टीने आत्मविकासासाठी गुरू म्हणून मार्गदर्शन करीत असतात. हे गुरूच योग्य शिष्याच्या शोधात असतात. अशा एका गुरू-शिष्याची कहाणी 'द फकीर'मध्ये आहे.

रुद्र– तिशीच्या आतला. परदेशात शिक्षण घेतलेला. दोन मुलांचा पिता, पण पत्नीशी विसंवाद झाल्याने घटस्फोट घेऊन घराबाहेर पडलेला. जिप्सीसारखा हिप्पी बनून सतत भ्रमंती करीत जगणारा. येईल त्या अनुभवाचं स्वागत करणारा. आपल्यातलं 'उरलंसुरलं' शहाणपण नष्ट करायला सिद्ध असणारा. पण प्रवास करताना त्याची तब्येत बिघडली.

त्याला हॉस्पिटलमध्ये तीन महिने बिछान्यावर पडून राहावे लागले.

त्याच्या व्याधीचे निदानच तेथील कुणाला होत नव्हते.

त्यामुळे उपचारही होत नव्हते. अशा अवस्थेत खितपत पडलेला.

अमृतसरजवळच्या खेड्यातल्या शेतावर बालपण गेलेला पण पगडीवाला साठीतला म्हातारा हॉटेलवाला, दारूविक्रेता सोडला तर जिप्सी तरुणाला कोणी मित्र नव्हता.

खेड्याच्या आठवणी सांगताना या शीख म्हाताऱ्याला अश्रू आवरत नव्हते.

रुद्र त्याला विचारत असे– एवढा आठवणींनी व्याकुळ होतोस, तर खेड्यात परत का जात नाहीस?

तो उत्तर देतो, ''चाळीस वर्षापूर्वी जाता आलं असतं. आता ते शक्य नाही. आता खूप उशीर झालाय. आता मी फार म्हातारा झालोय. माझा आत्मा तिथं आहे पण हे माझं शरीर या निष्ठुर नतद्रष्ट शहरातच राहण्याला सरावलं आहे. हे दैव मला बदलता येत नाही. मी एवढा मूर्ख– त्यावेळी जाण्याची संधी होती मी गमावली.''

जिप्सी रुद्र म्हणतो, ''तुझी काय गोची झालीय ते मला कळतंय. तुझं हृदय आणि आत्मा खेड्यात आहे, पण तुझं शरीर इथं शहरात. असं होतं तेव्हा मनाला नरकयातना भोगाव्या लागतात. नरक ही मनाचीच एक अवस्था असते.''

तो म्हातारा किंवा खरं तर जिप्सीच्याच हृदयातला एक तडफडणारा आवाज त्याला म्हणतो, ''मुला, तूही तुझा आत्मा जे सांगतोय ते कर. ते शक्य नसेल तर प्राप्त स्थितीचा निमूटपणे स्वीकार कर. शहाणपणाचा मार्ग स्वीकार. आयुष्यात आपलं सर्वस्व ओतून प्रयत्न कर. सकारात्मक वृत्तीने प्राक्तनाचा स्वीकार कर.''

त्याचवेळी रुद्रला आपल्या अंतर्यामी कोणीतरी बोलतंय असं वाटतं. ऐकू येतं.

''रुद्र, तू एक भिकारडा माणूस आहेस. गचाळ आयुष्य की सुखद स्मृती...

नाही. वर्तमानातच जगायला हवं. भूतकाळाच्या अपराधीपणाचं ओझं, यातना, दु:ख सगळं गाडून टाक. तू फक्त या क्षणापुरताच जग. हा क्षण आपला अंतिम क्षण आहे या भावनेने तू जोवर 'जगत' नाहीस तेव्हा नुसता जिवंत असशील; पण खरे सांगायचे तर निद्रिस्त, अचेतनच असशील. पुन्हा हा क्षण येणार नाही, पुन्हा आयुष्य नाही, असं समजून ह्या क्षणाचा, या अनुभवाचा आस्वाद घे. हा आंबा घे, हा शेवटचाच आंबा आहे असे समजून तो खा. आनंदाने खा. ईश्वराने केवळ तुझ्यासाठी हा निर्माण केलेला आहे या श्रद्धेने खा. त्याचा स्वाद मग अलौकिक, अविस्मरणीय ठरेल.'' तो आंबा खाल्ल्यावर पुन्हा त्याला कधी आंबा खावा असे वाटले नाही.

रुद्रला त्यावेळी जाणवलं, ''हे साधं तत्त्वज्ञान आपल्याला जिवंत ठेवेल. नकारात्मकता आणि द्वेषमत्सर यापासून दूर ठेवील,''

तो त्या हॉस्पिटलचा, आपल्या घरमालकाचा निरोप घेऊन ते गाव सोडतो.

त्याची एक व्हॅन होती. बाह्य जगाशी त्याला जोडणारी ती एकमेव गोष्ट त्याच्याजवळ होती. जेव्हा वाटेल आणि जिथं जावंसं वाटेल तिथं तो त्या व्हॅनद्वारे जाऊ शके. ती ॲम्ब्युलन्स व्हॅन हे त्याचं घर जणू फिरतं घरच.

त्या काळ्या व्हॅनच्या गर्भाशयात त्याला कमालीची सुरक्षितता अनुभवाला येई. एकटं असूनही एकाकी नसलेलं आयुष्य त्याला घालवता येई.

अर्थात् एक नक्की! आपले गुरू सतत आपल्या सांगाती आहेत ही जाणीव अखंड जागी असे. गुरूचे शब्द सतत मन:पटलावर उमटत.

*''बाबा, वेदना हीच देवाने बाळाला सर्वांत मोठी भेट आहे.''*

*करुणा आणि प्रेम यांच्याकडे जाणारी कवाडे उघडण्याचे काम वेदनाच करते.*

*सर्व प्राणिमात्रांबद्दल करुणा व प्रेम वाटणे,म्हणजेच स्वर्गाची प्रतीती.*

*वेदनाच आपल्याला सर्व प्राणिमात्रांजवळ आणि देवाजवळ नेते.*

*वेदनाच आपल्याला हळुवार बनवते.*

देह, मन आणि हृदय यांना वेदना होणे याचाच अर्थ तुमच्या आत्म्याची भूमी पीक काढण्याजोगी सुपीक झाली आहे.

दु:खाचा उपयोग आपल्यातल्या चांगुलपणाला वर आणण्यासाठी करणे म्हणजेच स्वर्गाची प्राप्ती. वेदनांमधून देवाची अनुभूती घेण्याची सिद्धी प्राप्त झाली पाहिजे.

रस्त्यात एक ट्रक आणि कार ओव्हरटेक करताना रुद्र ब्रेक दाबतो; ट्रक व्हॅनला काही इंचांच्या अंतराने ओलांडून पुढे जातो. अपघात टळतो.

पण रुद्रला रस्त्यावर एक वृद्ध दिसतो. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला.

रुद्र व्हॅनमधून उतरून या वृद्धाजवळ जातो. तो एक फकीर असतो. रुद्र त्याला उचलून व्हॅनमध्ये झोपवतो. तो वृद्ध डोळे उघडून एक क्षीण स्मित करतो तेव्हा रुद्र किती दचकतो! त्या फकीराच्या स्नेहमय दृष्टिक्षेपाने रुद्रला प्रथमच जाणवते की

आपली सगळी दु:खे, अपमान, आरोप, यातना आणि अस्तित्वाची निष्फळता या सर्व वेदनाशून्य झाल्या आहेत आणि त्यामागचा अर्थही उमगतो आहे. आपल्या आत्म्याने विनम्रभावाने आपला भूतकाळच नव्हे, तर वर्तमानकाळ आणि भविष्यकाळही स्वीकारला आहे असे जाणवते.

तो फकीर आपला हात उंचावून रुद्रच्या गालावरून फिरवतो. आपल्या उजव्या गालावर वृद्धाच्या हाताच्या तळव्यावरील रक्त लागलेले आहे, हे रुद्रच्या लक्षात येते. रुद्रच्या डोळ्यांतून आसवांची धार लागते. तो आपले मस्तक फकीराच्या छातीवर टेकतो. बालकाप्रमाणे हुंदके देऊ लागतो. फकीराचा हात त्याच्या पाठीवर हळुवार फिरतो.

तो स्वत:ला सावरतो.

''बाळा, तुझ्याजवळ फारसं आयुष्य शिल्लक नाही असं या फकीराला वाटतंय.''

ते ऐकून रुद्र अस्वस्थ होतो; पण प्रथमोपचाराची पेटी काढून तो फकिराच्या जखमांकडे लक्ष देतो. जखमा साफ करून तो त्यावर बँडेज बांधतो. एक वडाच्या झाडाखाली व्हॅन पार्क करून दोघे स्नॅक्स खाऊन विश्रांती घेतात. त्या फकीराला रुद्र 'बाबा' असे संबोधण्याचे ठरवतो. बाबांच्या अंगी दुसऱ्याच्या मनातील जाणून घेण्याची सिद्धी असते. आपले गुरू, मार्गदर्शक म्हणून रुद्र त्यांच्याकडे बघतो.

बाबा म्हणतात, ''आपण एकटे आहोत असे कधी समजू नकोस. आपले गुरू आणि मार्गदर्शक सतत आपल्या समवेत असतात. आपल्या आत्मिक आणि कर्माच्या क्षमतेवर आपल्याला आपले मार्गदर्शक शोधत येतात. आयुष्यात एका गुरूची सेवा व उपासना करा, तो तुमच्या प्रत्येक जन्मात तुमच्याबरोबर असेल. तो तुम्हाला मार्गदर्शन करील. तुम्हाला कदाचित ते जाणवणारही नाही.''

रुद्रला रात्री झोपताना अमेरिकेत घालवलेल्या दिवसांची वेगवेगळी दृश्ये दिसतात. सिंगापूर, श्रीलंका, दुबई आठवते.

सकाळी फकीर म्हणतो, ''रुद्र, तू झोपेत फार अस्वस्थ असतोस. तुझ्यासारख्या शांत, संतुलित दिसणाऱ्या माणसानं दु:खाचं एवढं ओझं वागवावं हे उचित नाही... तुला तुझ्या मुलांची आठवण येतेय. तू चांगला माणूस आहेस, पण तुला तुझ्या जिवलगांना दुखावतील असे निर्णय तुझ्या मनात नसतानाही घेऊन सगळी गुंता केलास... त्यांना तुझी अनुकंपा स्वत:च्या दुखण्यासाठी वापरण्याची सत्ता कधीही कोणालाही देऊ नकोस. ते नरकाला आमंत्रण ठरेल. तो हक्क फक्त तुझ्या देवाला आणि गुरूला दे. प्रेम सर्वांवर कर पण विश्वास गुरूवर आणि देवावर ठेव.''

फकीर त्याला श्रद्धेचे वेगवेगळे प्रकार स्पष्ट करून सांगतो. (२८-३२,४३-५०)

स्वर्ग खरोखरच आहे का? (२९-३३)

निसर्ग हा सर्वोत्कृष्ट हिशेबनीस आहे आणि आत्मा हे हिशेब सांभाळून ठेवतो. तुमच्या कृत्यांवर नियंत्रण ठेवणारं दुसरं कुणीच नसतं (३२)

प्रत्येक माणूस म्हणजेच एक जग असतं (३३)

बाबा रुद्रला एका बंदरावर घेऊन जातात.

त्यावेळी काही नियम रुद्रला सांगतात.

१. इतर लोक आजूबाजूला असताना रुद्रने बाबांशी बोलायचे नाही.

२. बाबांची ओळख रुद्रने कुणालाही करून द्यायची नाही. बाबा अन्य कोणाशीही बोलत नसत.

३. रुद्रने रोज एक जेवण बाबांशिवाय इतर लोकांबरोबर हॉटेलात घ्यायचे; घरी नाही.

४. रुद्रने घरातले काम स्वत:च करायचे. कोणाला मदतीला घ्यायचे नाही.

रुद्र हे सर्व नियम मान्य करतो.

पुढे बाबा म्हणतात, ''तुला बरेच प्रश्न विचारायचे आहेत हे मला ठाऊक आहे. योग्य वेळी मी उत्तरे देईन.''

रुद्रच्या पूर्वजीवनातील घटनांचे ओझे त्याला सतावत असते. रुद्रचे आणि त्याच्या पत्नीचे संबंध बिघडलेले होते. मुलांना त्याची झळ पोचू नये अशी काळजी त्याने घेतली होती. तो आपल्या तीन मुलांसाठी स्वयंपाक करीत असे. सूप, फ्रूट ज्युस, सॅलड, सँडविच बनवून त्या मुलांना देत असे.

बाबांचे वर्तन कधीकधी गूढ, अनाकलनीय असे. आध्यात्मिक विषयांवर त्यांची चर्चा होई.

## मदत करण्याची देवाची रीत

बाबा आणि रुद्र यांच्यात आध्यात्मिक विषयांवर ऐहिक समस्यांवर सतत चर्चा चालू असे. या चर्चेत अनेक विषय येत. देव आणि गुरू यांच्यावर श्रद्धा ठेव. मग चमत्कार न घडले तरच नवल, असे त्यांच्या बोलण्यात नेहमी येत असे. पृथ्वी जे देऊ शकते ते स्वर्गही देऊ शकत नाही असे ते म्हणतात.

अडचणीत असलेल्या सेठ नामक उद्योजकाची ही हकीकत.

एक उद्योगपती श्री. सेठ हॉटेलमध्ये गर्दी असल्याने रुद्रच्या टेबलावर विनंती करून बसतो. आधी ओळख नसलेला रुद्र सेठकडे नजर टाकतो आणि अंत:प्रेरणेने स्वत: होऊन सेठशी बोलणे सुरू करतो.

''काळजी करू नकोस. ते तुझी योजना मान्य करतील. बँक कर्ज देईल. शेअरमार्केटच्या नादी लागू नको. पुन्हा मागच्या चुका करू नकोस. मुलीचीही काळजी करू नकोस. तिचे त्या माणसाबरोबरचे लफडे लौकरच संपेल. सध्याची नोकरी सोडून ती अमेरिकेत तुझ्या व्यवसायाचे काम पाहील. आर्थिकदृष्ट्या सावरल्यावर

नफ्याची पाच टक्के रक्कम दानधर्मासाठी काढून ठेव. त्यात हयगय नको. एवढी अट मात्र पाळ.''

तो सेठ चकित होऊन दिङ्मूढ होऊन बघत राहतो. ''तुम्हाला हे कसं कळलं?''

''तुझ्याकडे बघून मला हे कळलं. तशी तुझी काहीही माहिती मला नाही. हे मी का बोललो तेही मला ठाऊक नाही.''

''तुम्ही सांगताय ते सगळं खरं आहे... मी पाच टक्के नफा दानधर्मासाठी देईन असे वचन देतो.''

''निव्वळ नफ्याचे पाच टक्के... देण्याचे टाळले तर पुन्हा रस्त्यावर येशील. लक्षात ठेव.''

''मी तसं करीन. शब्द देतो.''

''मग ठीक आहे. तुझ्या मुलीला परदेशात तुझं काम सांभाळायला पाठव. पंधरा दिवसात तुझ्या योजनेला मंजुरी येईल. ते तुझ्या नफ्याची पातळी कमी करू बघतील. पण तू ती मान्य करू नकोस. तुझी मागणी वाजवी आहे.''

''मी तुम्हाला कुठं भेटू शकेन?''

''मला ठाऊक नाही. मी तुझ्याशी का आणि काय बोललो हे मलाच कळत नाही. कदाचित तुला मदत करायची ही देवाची रीत असेल.''

वयस्कर सेठ तरुण रुद्रच्या पायावर त्या हॉटेलात सर्वांसमोर न संकोचता डोके ठेवतो. ''तुमचे खूप उपकार झाले माझ्यावर.''

घरी गेल्यावर रुद्र बाबांना विचारतो, ''हॉटेलात काय घडले ते सांगा.''

''मी तुला जे जे करायला सांगतोय ते सारं तू करतो आहेस. तुझ्या प्रश्नांची उत्तरं मी नंतर देईन.''

प्रार्थना आणि मंत्रघोष, नामस्मरण, क्षणाशी एकरूप होणं याबद्दलही बाबा काही बोलतात. देव अगदी सरळ-साधा आहे. बाकी सगळं काही गुंतागुंतीचं आहे. देवाला हवं असतं प्रेम, साधेपणा आणि प्रांजलपणा. फक्त आपल्या आत्म्यात स्पंदन पावायला हवं.

बाबा काही दिवसांसाठी बाहेर जायची तयारी करतात तेव्हा रुद्र खूप दु:खी होतो.

बाबा त्याची समजूत काढतात, ''अरे, मी तुला सोडून कधी जाणार नाही. माझे स्मरण कर. मी तुझ्याजवळ असेन. माझी ऊर्जा तुझ्याभोवती कायम असते.''

दोन आठवड्यांनी रुद्र दिसताच सेठ त्याला चरणस्पर्श करतात. ''सर, तुम्ही जे सांगितलं तसं सगळं होतंय. अमेरिकेत त्यांनी मंजुरी दिलीय. तिथे ऑफिस उघडायला सांगितले आहे. मुलगी तिथे काम करायला तयार झालीय. तुम्ही मला वाचवलंत. आता एक विनंती आहे. माझा पुतण्या इथे आलाय. त्यालाही तुम्ही मदत करा.''

सेठबरोबरच्या विशीतल्या जोडप्याकडे रुद्र पाहतो. त्याच्यात वेगळीच स्पदंने निर्माण होतात.

''माझ्याबरोबर माझ्या बंगल्यावर चला. तेथे आपण बोलू.''

ते त्या तरुणाला म्हणतात, ''तुझ्या आईचा तुमच्या दोघांच्या लग्नाला विरोध आहे. आईला जास्त हुंडा देणारी मुलगी हवीय... तू अक्कलकोट स्वामींचा भक्त आहेस, दररोज दोन तास प्रार्थना कर. नंदादीप लाव. गेल्या वर्षीच्या उत्पन्नाचा ५ टक्के भाग दानधर्मासाठी खर्च कर. चाळीस दिवसांच्या आत हे व्हायला हवे. तू वाचवलेली सगळी स्थावर जंगम मालमत्ता ४० दिवसाच्या आत या मुलीच्या नावावर कर. तसे केले तर चिरंतन काळ ही मुलगी तुझीच राहील.''

त्या मुलीला रुद्र म्हणतो, ''तू अडीच महिन्यानंतर येथे येशील. तुला यावेच लागेल.''

त्या दोघांना बाहेर पाठवून देऊन रुद्र सेठना एकट्याला सांगतो, ''हा मुलगा प्रार्थना, दानधर्म आणि सगळे पैसे मुलीच्या नावे करतोय यावर लक्ष ठेवा. ते फार महत्त्वाचे आहे. या दोघांसाठी.'' त्यावेळी त्याला पुढचे भविष्य सगळे स्पष्ट दिसते. तो ते सेठना सांगतो.

''हा मुलगा नऊ आठवड्यात मरण पावेल. अपघाताने. प्रार्थना, दानधर्मामुळे त्याच्या आत्म्याची उन्नती होईल. पैशांची मदत मुलीला होईल. ती कधीही लग्न करणार नाही. पन्नासाव्या वर्षी तिचे आयुष्य सरेल. तीस वर्षे तिची काळजी घेतली जावी अशी बाबांची इच्छा आहे.''

''त्याचे मरण टळू शकेल असे काही करता येणार नाही का?''

''त्याच्या कुंडलीत ७८ वर्षाचे आयुष्य आहे. पण ५० वर्षे तो अंथरुणावर काढील. त्या हालापेक्षा एकदाच मेलेलं बरं म्हणून अक्कलकोट स्वामी त्याचे प्राक्तन बदलून त्याला यातनांतून मुक्त करतील. प्रार्थना आणि दानधर्म यांचं बळ लाभलं तर त्या मुलाचा आत्मा वाचवता येईल.''

बाबा परगावाहून परत आल्यावर रुद्र विचारतो, ''बाबा, हे काय चाललंय? असं भविष्य वर्तविल्यामुळे दानधर्म-प्रार्थना यांचा उपयोग न झाला तर?''

''तू मला खोटारडा ठरवतो आहेस का?''

''नाही. तुम्ही माझं सर्वस्व आहात. तुम्ही सर्वव्यापी व सर्वशक्तिमान आहात. मी माझ्या आयुष्याचा चुथडा केला आहे. त्या मुलाच्या आयुष्याचं भलं माझ्या हातून खरोखर होणार आहे का?''

बाबा रुद्रला त्याच्या पूर्वजन्मातील घटनांचे स्मरण देतात. ''तू अनेक जन्म घेतलेले आहेस. तुझ्याशी संपर्कात आलेल्या अनेकांबरोबर तू वावरलेला आहेस. तुझी अनेक जन्मांचा एकत्र प्रवास केलेला आहे. तुम्ही सर्वांनी एकमेकांशी वेगवेगळी

नाती अनुभवली आहेत. तुला मानवजातीची सेवा करायची होती. तुझी आता मानवजातीच्या सेवेसाठी तुझी तयारी करू घेतली जात आहे. देवाचा दुवा बनून मानवजातीला मदत कर. तू त्यासाठी चांगला माध्यम बनण्याची गरज आहे.''

बाबा रुद्रला पारशी धर्माचा संस्थापक झरतुष्ट्र, वाल्मीकी वगैरेंच्या जीवनकार्याचे रहस्य सांगतात.

माध्यम म्हणजे काय? उत्तम माध्यम कोण हेही स्पष्ट करतात.

सर्वांत मोठा फकीर कोण? राम, देव, अल्ला, दुर्गा, अहुरमझ्द... (९९)

माध्यम म्हणजे एक साधन. दैवी प्रकाश आणि ऊर्जा यांनी संपृक्त. 'मी'पणातून मुक्त.

रुद्रला बाबा म्हणतात, ''तू पुण्य जोडलं आहेस, तू माझी सेवा केली आहेस. अनेक जन्म माझी सेवा केली आहेस आणि मी तुझं रक्षण केलं आहे. तुला मार्ग दाखवला आहे. तुझ्या उन्नतीची काळजी घेतली आहे.'' (१०६)

''तू माझं बोलणं ऐकतोस आणि मी तुला माध्यम बनवून तुझ्या तोंडून बोलतो याची रीत एकच आहे.'' (११०)

अशी आणखी काही उदाहरणे या कहाणीत वाचायला मिळतात.

योग्य व्यक्तीला अडचणीच्या वेळी मदत करण्याची देवाची रहस्यमय रीत त्यातून प्रकट होते. लोकांची सत्कर्माकडे रती वाढावी म्हणूनही काही आचारसूत्रे बाबा वेळोवेळी सांगत राहतात. मानवजातीची सेवा करण्याची प्रेरणा देत राहतात. रुद्रला बाबा माध्यम म्हणून वापरतात, त्याचबरोबर विविध विषयांवर मार्गदर्शनही करीत राहतात.

आपण अग्रक्रम कशाला देतो, याच्यावरही बरेच काही अवलंबून असते.

माध्यम म्हणून काम करताना रुद्रला बरीच मानसिक पूर्वतयारी करावी लागे.

मदत मागणाऱ्याकडून माध्यमाकडे दुःख, राग, असहायता, नकारात्मकता यासारख्या भावना रुद्रमध्ये येत. उपचारानंतर मदतीसाठी आलेले लोक हलके होऊन, सुटकेची भावना आणि आशावाद यांचा अनुभव घेऊन जात. पण रुद्र मात्र अशक्त, प्रक्षुब्ध, अस्वस्थ अवस्थेत असे. (१५४) साईबाबांच्या ऊर्जेनं स्वतःला भरून घेतल्यावरच त्याला चांगलं माध्यम बनवणं शक्य होई. जेव्हा ही ऊर्जा विपुल असे तेव्हा त्याला समोरच्या व्यक्तीच्या भूत-भविष्य-वर्तमानाचा सर्व पट सहजपणे वाचता येई. त्यामुळे आध्यात्मिक, भावनिक, मानसिक किंवा शारीरिक बिघाडाबाबत नेमके मार्गदर्शन करता येई.

मृत्यूनंतरही माणसाला आयुष्य असते. 'आत्मा' हा नश्वर देह सोडतो, तेव्हा त्याला काही निर्णय घेणे क्रमप्राप्त असते. आत्म्याला भूतलावरच घुटमळत रहायचे आहे का आपल्या उत्क्रांतीच्या प्रवासाकडे प्रस्थान ठेवायचे आहे हे ठरवायचे असते.

आपण मरण पावलोय यावरच काही जणांचा विश्वास नसतो, ते आपल्या अतृप्त इच्छा नंतर लोकांच्याद्वारे पूर्ण करू पाहतात. भूतबाधा वगैरे प्रकार त्यातून घडतात. प्रार्थना, ध्यान, आत्मिक उन्नतीसाठी दिलेला वेळ, दानधर्म न कळणाऱ्या व्यक्ती भूतलावर घुटमळत राहण्याची शक्यता जास्त असते.

एखाद्या व्यक्तीचा मृत्यूचा स्वीकार न करता शोक करीत राहणे हा प्रकारही त्या मृतात्म्याच्या भावी विकासाला आणि मुक्तीला अडथळ्यासारखा ठरतो. तो त्या दु:खाने पुढे जायला नकार देतो आणि प्रेमाच्या माणसाजवळच राहतो. अशी प्रेमाची माणसे शोक करीत, उन्मळून पडलेले जीवन जगत असतात. ते जीवन यातनामयच असते. आपल्या मृत व्यक्तीला आणि आपल्याला शांततामय मुक्त उन्नती हवी असेल तर मृत्यूचा स्वीकार दोघांनीही मन:पूर्वक करून शांतपणे जगायला आरंभ करणे इष्ट ठरते. हे एका मृत मुलाच्या आठवणीने दु:ख करणाऱ्या पित्याच्या उदाहरणाद्वारे स्पष्ट केले आहे. (१४९-१६१)

माध्यमं आपल्या शक्तीचा दुरुपयोग करू लागली तर त्यांच्यातील ऊर्जा स्थानभ्रष्ट होते. (१७२)

जेव्हा एखाद्या रोग्याला गुरू व्याधीमुक्त करतो तेव्हा त्याचे दु:ख व यातना गुरू स्वत:कडे घेतो; आपल्या आध्यात्मिक शक्तीमुळे तो त्या कर्माची ऊर्जा अल्पकाळात पण तीव्रतर सहनशक्तीने भोगून संपवतो. गुरू शिष्याच्याद्वारे कर्म आणि ऊर्जा यांना दुसरीकडे वळवतो; आणि ते आपल्यावर ओढवून घेतो. गुरूशी शिष्य एकरूप झाला तरच हे शक्य होईल. ''माध्यम दुसऱ्याला बरं करतो, तेव्हा त्या माणसाचा आजार स्वत: शोषून घेतो आणि आजारी पडतो. हे आजारी पडणे टाळायचे असेल तर आपला देह, मन, हृदय आणि आत्मा या बाबतीत तू खडखडीत बरा आणि ऊर्जा संपृक्त असायला हवे. माध्यम म्हणून काम करताना अगोदर पुढील प्रार्थना करायला हवीस.'' असेही बाबा सांगतात.

''माझा देह, मन आणि आत्मा, ऊर्जावलय, कंपनं आणि मार्ग, रक्ताचा प्रत्येक थेंब, गुणसूत्र आणि पेशी, माझा संपूर्ण देह, तुमच्या संरक्षणानं, प्रेमानं, मार्गदर्शनानं, बळानं, बरं करण्याच्या ऊर्जेनं, आत्मिक बळानं आणि प्रेमानं भरून टाका. मला क्षमा करा. मला मार्ग दाखवा. मला मार्गदर्शन करा. मला सुरक्षित ठेवा आणि माझ्यावर दया करा.''

''कृपा करून हे मूल बरं करण्यासाठी मला माध्यम म्हणून वापरा. फक्त तुमचीच ऊर्जा आणि कृपा माझ्यातून वाहून या आपल्या बालकाला बरी करो. कृपा करून या बालकाचा देह, मन आणि आत्मा, ऊर्जावलय, कंपनं आणि मार्ग, रक्ताचा प्रत्येक थेंब, गुणसूत्र आणि पेशी बरी करा.

पण जर कोणत्याही कारणास्तव, ह्या मुलाला आजारातून आणि आजाराच्या

अनुभवातून जाणं आवश्यक असेल तर कृपा करून ह्या आजारातून आणि अनुभवातून उमेदीनं, समर्पणाच्या भावनेनं आणि आनंदानंदेखील या मुलाला जाता यावं यासाठी त्याला शहाणपण, बळ, प्रेम आणि करुणेचं वरदान द्या.'' (१७५)

या प्रार्थनेचे महत्त्व बाबा विशद करतात.

माध्यम म्हणून रुद्र कामाला आरंभ करतो. रुग्ण बरे होऊन जातात. आभारासाठी परत येतात.

रुद्रला आपल्या बरं करण्याच्या शक्तीची जाणीव होते.

बाबा आणखी मार्गदर्शन करतात.

''तुझ्या ठायीची ऊर्जा नेहमी तुला योग्य तोच मार्ग दाखवील... मात्र तुझ्या मनाची पाटी कोरी ठेवणं महत्त्वाचं. ज्या मार्गानं ऊर्जा वाहून नेली जाते, तो मार्ग तुझ्या भावनांमुळे झाकोळला जाता कामा नये.

बरं होण्याच्या बैठकीनंतर गरजूंना औषधं, कपडे, निवारा, पैसे, नोकरी, दानधर्म, याद्वारे मदत करण्याची प्रेरणाही देण्याचा प्रयत्न रुद्र करीत असे.

गुरूचं ज्यावर खरंखुरं प्रेम असे त्याला जास्त यातना, जास्त दु:खं सोसावी लागतात हे देखील रुद्रच्या लक्षात येते.

''माझ्याच वाट्याला हे इतकं दारुण दु:ख का?'' असा प्रश्न जे विचारतात, त्यांना काय उत्तर द्यावे?

''तुमच्यावर देवाचे खूप प्रेम आहे, म्हणून तो तुम्हाला स्वच्छ, निकोप, शुद्ध बनवतो आहे. तुमच्यावरील सर्व घाण, सर्व चिखल, सर्व मळ दूर करून तुम्हाला घेण्याला तो आतुर आहे.'' असे उत्तर त्याला द्या.

गुरूला पूर्णपणे शरण जाणे म्हणजेच देवाशी एकरूप होण्याचा एकमेव मार्ग. त्यासाठी देता येईल तेवढे देत राहा. दानधर्म करीत राहा.

पृथ्वीतलावर एक नियम आहे. कुणालाही फुकट जेवण मिळत नाही. प्रत्येक घासाची, प्रत्येक गोष्टीची किंमत मोजावी लागते. अपवाद फक्त गुरूचा. त्याच्याकडूनच फुकट जेवणाची अपेक्षा करता येते. मात्र त्यासाठी गुरूवर निर्व्याज प्रेम असावं लागतं.

शेवटी गुरू रुद्रला सांगतात, ''चिरंजीव होण्यासाठी आता तुला मरायचं आहे. माझ्या लेकरा, आता झोपी जा. जेव्हा तू जागा होशील तेव्हा सारं काही ठीक असेल. तुझा 'फकीर' जे सांगतोय त्यावर विश्वास ठेव.''

रुद्रच्या चेहऱ्यावर अपूर्व, अभूतपूर्व शांततेचं तेज झळाळताना दिसतं.

आध्यात्मिक अनुभूतीचा हा एक अलौकिक आविष्कार आपल्याकडील संजीवन समाधीची आठवण करून देतो.

**किंमत : १८०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**

**नवे कोरे**

# स्लमगर्ल ड्रीमिंग




**रुबिना अली**

अनु. **मैत्रेयी जोशी**

**१२०रु. पोस्टेज २०रु.**

रुबिना अली. मुंबईतल्या झोपडपट्टीत राहून चंदेरी चित्रपटसृष्टीतली चमचमती तारका बनण्याचे स्वप्न पाहणारी एक सिनेमावेडी मुलगी. वय केवळ ८-९ वर्षांचं.

तिचं हे स्वप्न एक दिवस खरोखरीच साकार होतं आणि ती थेट ऑस्करपर्यंत मजल मारते.

'स्लमडॉग मिलीयनेअर' मधल्या या चिमुरड्या चित्रतारकेचा हा ऑस्करपर्यंतचा प्रवास आपल्याला या पुस्तकात बघायला मिळेल. तोही तिच्याच शब्दांत!

ऑस्कर जिंकूनही पुन्हा त्याच बकाल वस्तीत परत येणाऱ्या रुबिनामध्ये बालसुलभ निरागसता आणि परिस्थितीनं शिकवलेलं शहाणपण यांचं मजेदार मिश्रण आढळतं. कादंबरीच्या अखेरच्या भागात तर अतिक्रमण विभागाकडून तिचं ते झोपडंही पाडण्यात येतं आणि नाईलाजाने तिला तिच्या अब्बांच्या मित्राच्या घरी राहायला जावं लागतं.

एकीकडं चटका देणारं दाहक वास्तव तर दुसरीकडे हॉलिवूडच्या झगमगत्या दुनियेत अनुभवलेली 'रेड कार्पेट ट्रीटमेंट'! तो मानसन्मान, ते सत्कार समारंभ, ती यशाची धुंदी!... या साऱ्यांचा ताळमेळ घालत रुबिना एक दिवस फार मोठी अभिनेत्री बनण्याची स्वप्नं पाहत आहे.

हा तिचा दुर्दम्य आशावाद कौतुकास्पदच!

# पुस्तक परिचय

**आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि कर्तृत्वाला चालना देणारी आपली आत्मप्रतिमा.**

# हे वयच वेडं असतं




**शुभांगी खासनीस । प्रसन्न रबडे । केतकी काळे**

बाल्यावस्थेतून कुमारावस्थेत पदार्पण म्हणजे पौगंडावस्था. 'टीन एजर्स' असे या अवस्थेतील मुलामुलींना म्हणतात. त्यासाठी वापरला जाणारा पौगंडावस्था हा संस्कृत शब्द काहीसा कठीण आणि नित्य व्यवहारात वापरण्यास किचकट वाटतो. तारुण्यात प्रवेश करण्यापूर्वीचा हा काळ थोडा चमत्कारिक असतो. मुलामुलींमध्ये शारीरिक, मानसिक, व्यक्तिमत्त्वविषयक बदल होत असतात. त्यामुळे ही बदलाची प्रक्रिया चालू असताना मुले-मुली, काहीशी बेंगरुळ दिसतात. मुलामुलींना स्वत:चे हे बदलते रूप तितकेसे आकर्षक वाटत नाही. मुरमे, पुटकुळ्या, आवाजातील बदल इत्यादी.

तारुण्यात एक प्रकारचा सफाईदारपणा असतो. आकर्षकपणा असतो. बलदंडपणा असतो. शरीराला घाटदार घाट आलेला असतो. रेखीवपणा, नखरेलपणा, आपल्या रूपाची, सौंदर्याचे दिसणारे विभ्रम स्वत:लाच सुखावत असतात. मिरवावेसे वाटतात. भिन्नलिंगी व्यक्तीकडे मन ओढ घेत राहते. सुयोग्य जोडीदार वा मित्र शोधण्याची प्रक्रिया चालू असते. आपल्या आवडीनिवडींना अधिक काटेकोरपणा येऊ लागतो. आपले नाक, डोळे, केस, हनुवटी, बोटे यात काही दोष वा उणेपण असेल, तर त्याबद्दलचा न्यूनगंड सामाजिक पातळीवर आपल्याला संकोचाचे कवच धारण करायला लावतो. पालक आपल्याला आपल्या कलाने वागण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देतातच असे नाही, त्यामुळे त्यांच्याबद्दलचा विरोध, विद्रोह, नाराजी, राग मनात धुमसत राहतो. त्याचा कधी कधी स्फोट होतो. पालकांपासून अनेक गोष्टी लपवण्याकडे मग कल राहतो. आपल्या आदर्शाचे गुणगान, अनुकरण सुरू होते तसेच नावडत्या व्यक्तीबद्दलचे दोष दिग्दर्शनही जोरात सुरू राहते.

पौगंडावस्थेत स्वत:बद्दलची जी आत्मप्रतिमा मनोमनी स्थिरावते, ती आपल्या भावी उद्दिष्टाचे स्वरूप स्पष्ट करते. आपल्या व्यक्तिमत्त्वाला त्यानुसार आकार देते. आपल्या शिक्षणाचे, कौशल्य साधनेचे, मित्र-मार्गदर्शकांचे, कार्यपद्धतीचे आणि व्यावसायिक महत्त्वाकांक्षेचे बीजारोपण करते. आपले व्यक्तिमत्त्व लोकांना हवेहवेसे वाटावे आपले कार्य व जीवन ध्येय लोकांच्या कौतुकाचा आणि आदराचा विषय व्हावे, प्रसिद्धी-कीर्ती-संपत्ती यांचा यथोचित लाभ व्हावा, अशी प्रत्येकाचीच अपेक्षा असते.

'हे वयच वेडं असतं' या पुस्तकात पौगंडावस्थेतील समस्यांबाबतचे तज्ज्ञांचे मार्गदर्शन आहे. त्यात वेगवेगळे दृष्टिकोन दिसतात. डान्स थेरपीचा वापर करून शारीरिक-मानसिक विकलांगांना आत्मनिर्भर बनवणाऱ्या भरत नाट्यमच्या तज्ज्ञ केतकी काळे, सायकिॲट्रीच्या पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करून दिशा मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र चालवणाऱ्या शुभांगी खासनीस आणि समुपदेशक तसेच मानसोपचारतज्ज्ञ,

साद समुपदेशक केंद्राचे प्रमुख प्रसन्न रबडे या तिघांनी पौगंडावस्थेतील मुलांच्या स्व-प्रतिमेच्या जडणघडणीचे विश्लेषण करून, त्या दृष्टीने पालकशिक्षकांनी घ्यावयाच्या भूमिकेबद्दल सर्वंकष मार्गदर्शन केले आहे. या वयात होणारी काही प्रश्नांची जाणीव सर्वांत जास्त अस्वस्थ करीत असते. तिच्या संदर्भात अनेक प्रश्न सतावत राहतात.

* लग्नाआधी सेक्स बरोबर की चूक?
* जर लग्नाआधी सेक्स चूक असेल तर या काळात लैंगिक भावनांचा विषय करण्याचा योग्य मार्ग काय?
* सेक्सचा आणि प्रेमाचा, प्रेमप्रकरणाचा मेळ कसा घालायचा?
* लैंगिक भावनांचे व्यवस्थित व्यवस्थापन न करता त्या भावना लग्न होईपर्यंत दाबून ठेवायच्या का? ते शक्य होते का?
* लैंगिक शिक्षण घेतले तर करून बघण्याची उत्सुकता वाढते का?

या प्रश्नांची उत्तरे देणे पालकांनाही जड जाते. एकीकडे या भावनांचे स्वाभाविक आविष्कार होणे हे अटळ असे मनोमन पटत असते, पण दुसरीकडे यातून गर्भधारणा होणे, कुमारी मातांचे प्रश्न निर्माण होणे, प्रेमाबाबत आणि पितृत्वाबाबत दोघांमध्ये मतभेद होणे, घरच्या मंडळींचा विरोध होणे वगैरे प्रकारांमुळे विवाहपूर्व सेक्स संपूर्ण आयुष्याचीच घडी विस्कटून टाकू शकते.

या सर्व बाबतीत तज्ज्ञांकडून होणारे समुपदेशन जर वेळीच मिळाले, तर अनेक अनर्थ टाळता येतात. समुपदेशनाच्या प्रक्रियेत व्यावसायिक नाते आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्या आधारे मानवाचे विचार, मानवी भावना यांचा मूलगामी वेध घेऊन त्याबाबत योग्य ती कृती अभिप्रेत असते. या वयातील मुलांचे व्यक्तिमत्त्व फुलविणे, त्यांच्यात योग्य प्रकारची मूल्ये विकसित करणे, त्यांच्या शारीरिक, लैंगिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक कलात्मक आणि क्रीडात्मक स्वप्रतिमांची निर्मिती करणे आणि त्याबाबत मनात दृढ धारणा निर्माण करणे, रुजवणे हे कार्य या आडवयात शास्त्रशुद्ध रीतीने आणि पर्याप्त वृत्तिगांभीर्याने व्हायला हवे.

'हे वयच वेडं असतं' हे लक्षात घेऊन प्रत्येक मुलाची आणि मुलीची 'टीनएजरच्या' काळात सर्वांगीण जडणघडण व्हावी हे उद्दिष्ट पालक-शिक्षकांच्या प्रत्येक कृतीला पायाभूत असायला हवे.

त्या दृष्टीने या पुस्तकात टीनएजर्सच्या बाबतीत आत्मप्रतिमेबद्दलची समुचित धारणा रुजवण्याकडे लक्ष देण्याची निकड स्पष्ट केली आहे.

'शारीरिक स्वप्रतिमा' या विभागात या आडवयात मुलामुलींच्या शरीरात होणारे फरक समजावून दिले आहेत. प्रणयचेष्टा, प्रेमप्रकरण, प्रेम, मैत्री यांचे स्वरूप आणि त्यांच्यातील सीमारेषा यांचा विचार करून लैंगिक शोषण कसे टाळावे याबद्दल

मार्गदर्शन केले आहे.

मानवी लैंगिकतेचा सकारात्मक आणि नकारात्मक विश्लेषणात्मक तक्ता पृष्ठ ४४ वर दिला आले.

भिन्नलिंगी व्यक्तीबरोबर आकर्षण वाटणे आणि ओळख वाढवणे ही मानवी वृत्ती पूर्णतया स्वाभाविक आणि निकोप आहे. परस्पराबद्दल आदरभाव ठेवून नाते दृढ करणे हे आवश्यक आहे. त्यात गैर काहीही नाही.

एक वेळचा शारीरिक संबंध हा देखील गर्भधारणेस कारणीभूत ठरू शकतो. विवाहपूर्व क्षणिक मोह टाळणे आवश्यक.

बेजबाबदार लैंगिक संबंधातून अकाली गर्भधारणा, लैंगिक आजार, एड्स, मानसिक आजार, न्यूनगंड, मानसिक ताण, अपराधीपणाची भावना, भविष्यकालीन योजनांचा चक्काचूर वगैरे दुष्परिणाम संभावतात. समलिंगी संबंधांतूनही अनेक समस्या उद्‌भवतात.

मानसिक स्वप्रतिमा या विभागात ताणतणावांचे नियोजन, व्यक्तिमत्त्व, व्यक्तिमत्त्वाचे प्रकार, शिक्षक-पालकांची भूमिका, भावंडांची भूमिका, मानसिक आजार, स्किझोफ्रेनिया (छिन्न मनस्कता), समुपदेशन यांचा ऊहापोह केला आहे.

सामाजिक स्व-प्रतिमा या विभागात अहंगंड, न्यूनगंड, शालेय जीवन, नाते संबंधाचे स्वरूप मित्रमैत्रिणींचा प्रभाव, अभ्यास, व्यसने, करिअर मार्गदर्शन यांच्या संदर्भात वास्तव काय, अवास्तव काय याचा मागोवा घेतला आहे.

शिक्षकी पेक्षा, संवादात्मक कौशल्ये, धीरोदात्तपणा, संगणक क्षेत्र, पॅरामेडिकल क्षेत्र, फॅशन डिझायनिंग, योग्य अभ्यास प्रशिक्षण, कृषीक्षेत्र, अभियांत्रिकी प्रशिक्षण याबाबत विशेष निरीक्षणे नोंदवली आहेत.

सांस्कृतिक प्रतिमा हा पुढचा विभाग. पाश्चात्य संस्कृतीचा परिणाम, भारतीय संस्कृती आणि विवाहपद्धती यांच्या संदर्भातील अवलोकने उद्‌बोधक आहेत.

बौद्धिक स्व-प्रतिमा ही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कर्तृत्वाचा मेळ घालते.

बुद्धिमत्ता म्हणजे समस्या सोडविण्याची क्षमता किंवा एक वा एकापेक्षा अधिक सांस्कृतिक, सामाजिक परिसरात ज्याला मोल लाभू शकेल या उत्पादनाच्या निर्मितीची क्षमता.

बुद्धिमत्ता तीन प्रकारची असते. शैक्षणिक, भावनिक, सामाजिक.

बुद्धीच्या मोजमापासाठी बुद्ध्यांक, भावनांक यांचा उपयोग होऊ शकतो.

भावनांचे व्यवस्थापन करण्यासाठी स्वत:च्या भावना काय आहेत हे आधी स्वत:ला ठाऊक हवे. स्वत:च्या भावनांबाबत जर ठाम कल्पना असेल तर आयुष्याबाबत किंवा इतर निणयांबाबत निश्चितपणा जाणवतो. उदा. लग्न कोणाशी करायचे?

मुलगी कशी हवी? तिचे रूप, शिक्षण, घरदार, व्यक्तिमत्त्व इ. या बाबत अर्थात सर्व अपेक्षा पूर्ण होतील असे नाही. तेव्हा त्यात कशाला जास्त प्राधान्य द्यायचे, कशाला गौण मानायचे याचा विचार करावा लागतो. याला भावनांचे व्यवस्थापन असे म्हणता येईल.

भावनांवर विजय मिळवणे, त्यातून जीवनाचे उद्दिष्ट ठरवणे, स्वप्रेरणा मिळवणे, दुसऱ्याच्या भावना ओळखणे व त्यांची बूज राखणे, नातेसबंध जपणे, जोपासणे

सामाजिक बुद्धिमत्ता ही आपल्या वर्तनातून सिद्ध होते.

दुसऱ्याच्या मनातल्या भावना अचूक ओळखणे, त्याप्रमाणे त्याला सहानुभूती दाखवणे, आधार देणे, वेगवेगळ्या प्रसंगात योग्य प्रकारे नाती हाताळणे, योग्यवेळी योग्य कृती करणे. स्वत:च्या फायद्याकडे लक्ष ठेवून इतरांशी जुळते घेण्याचे कौशल्य दाखवणे. व्यक्तित नात्यात सौजन्यशील असणे.

या दृष्टीने पुस्तकात प्रश्नावली दिली आहे. तुमचे शरीर, तुमचे स्वभावविशेष, अभिमानाच्या गोष्टी, तुमचे कुटुंब, तुमचे कुटुंबातील स्थान, तुमच्या आवडीनिवडी, तुमच्या महत्त्वाकांक्षा, तुमचे स्वप्न, भविष्यांबद्दलच्या कल्पना याविषयी हे प्रश्न आहेत. ते प्रश्न नीट समजले तर भावनांचे व्यवस्थापन करणे जमू शकेल. भावनांमध्येही सकारात्मक, नकारात्मक किंवा निरोगी भावना आणि घातक भावना असे प्रकार संभवतात.

कुमारवयातच आर्थिक शिस्त लागली, तर पैशांचे महत्त्व जाणून घेऊन पुढच्या आयुष्याची इमारत भक्कम पायावर उभी राहू शकते.

या वयात फॅशन, हॉटेलिंग, चित्रपट, डिस्कोथेक, ब्युटी पार्लर, टू व्हीलरवर भटकणे वगैरे गोष्टींचे आकर्षण निर्माण होते. पालकांनी यासारख्या सर्व गरजा पुरवाव्या अशी अपेक्षा असते. 'कमवा आणि शिका'यांसारख्या योजनेतून स्वत:च्या शिक्षणाचा आणि इतर गोष्टींचा खर्च करण्याची ज्यांच्यावर पाळी येते, त्यांना पैशाचे महत्त्व कळून त्याचा विनियोग काटकसरीने करण्याची सवय लागते. आपली आर्थिक स्वप्रतिमा त्यातून तयार होते.

कला, क्रीडा यात नैपुण्य मिळवण्यासाठी पौगंडावस्थेतील साधना, सराव आणि अभ्यास आवश्यक व उपयुक्त ठरतो. कला-क्रीडा क्षेत्रातील कामगिरी ही भावी जीवनाची दिशा ठरवायलाही प्रेरक ठरते.

एकूणच आपल्या स्वप्रतिमेचे स्वरूप जाणून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.

**किंमत : २००रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**

# नम्र आवाहन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या परिवारात आपले स्वागत आहे.

पुस्तकविश्वातील नवीन, ताज्या, ज्ञान-मनोरंजनपूर्ण, बालसाहित्य, अनुवादित साहित्य, विज्ञान साहित्य अशा असंख्य पुस्तकांची ओळख करून देण्यासाठी, रसिक वाचकांना आमच्या आकर्षक योजना कळविण्यासाठी, आम्ही उत्सुक आहोत.

<u>आपण फक्त आपला ई-मेल कळवावा.</u>

पत्र पाठवा, फोन करा किंवा इंटरनेटवर कळवा.

आम्ही वाट पाहत आहोत

आमचा Email

info@mehtapublishinghouse.com

# २०१० प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| | **कादंबरी** | |
| **द ॲटर्नी :** स्टीव्ह मार्टिनी | अनु. अजित ठाकूर | ३५० |
| **क्रायसिस :** रॉबिन कुक | अनु.डॉ. प्रमोद जोगळेकर | ३५० |
| **जॅपनीज ऑर्किड :** रेई किमुरा | अनु. स्नेहल जोशी | २०० |
| **प्रस्थान** | रेखा बैजल | १५० |
| **शांताराम :** ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स | अनु. अपर्णा वेलणकर | ९९० |
| **द फकीर :** रुझबेह एन. भरूचा | अनु. सुनीति काणे | १८० |
| **वन शॉट :** ली चाइल्ड | अनु. बाळ भागवत | ३४० |
| **गर्ल्स ऑफ रियाध :** रजा अल्सानिया | अनु. स्नेहल जोशी | २६० |
| **द फर्म :** जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे | ४४० |
| | **कथासंग्रह** | |
| **कुरुक्षेत्रानंतर... :** महाश्वेतादेवी | अनु. वर्षा काळे | ६० |
| **नष्टनीड :** रवींद्रनाथ टागोर | अनु. नीलिमा भावे | १४० |
| **भेटीगाठी** | शंकर पाटील | ११० |
| **खुशखरेदी** | शंकर पाटील | १०० |
| **श्रीगणेशा** | शंकर पाटील | १२० |
| **गारवेल** | शंकर पाटील | १३० |
| **पाऊलवाटा** | शंकर पाटील | १०० |
| | **सत्यकथा** | |
| **कोल्ड स्टील :** टीम बुके, बायरॉन उसी | अनु. सुभाष जोशी | ३०० |
| | **चरित्रे** | |
| **थेंबभर पाणी अनंत आकाश** : डॉ. भवरलालजी जैन यांचे चरित्र | सुरेखा शहा | २८० |
| **रुसी मोदी : द मॅन हू ऑल्सो मेड स्टील** : पार्थ मुखर्जी, ज्योती सबरवाल | अनु. अंजनी नरवणे | २०० |
| | **आत्मकथन** | |
| **कॅच मी इफ यू कॅन** : फ्रँक अबॅग्नेल/स्टॅन रेडिंग | अनु. ज्योत्स्ना लेले | २०० |

| | | |
|---|---|---|
| **मॅन, इंटरप्टेड :** जेम्स बेली | अनु. विदुला टोकेकर | १८० |
| **सर्कल ऑफ लाइट** | | |
| : किरणजीत अहलुवालिया,राहिला गुप्ता | अनु. उषा महाजन | ३५० |
| **द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स** | | |
| : सोमाली माम | अनु. भारती पांडे | १६० |
| **स्लमगर्ल ड्रीमिंग :** रुबिना अली | अनु. मैत्रेयी जोशी | १२० |
| **उधाण वारा :** तसलिमा नासरिन | अनु. विलास गीते | ४०० |
| **मना सर्जना** | डॉ. अनिल गांधी | २०० |

### संकलित व्याख्याने

| | | |
|---|---|---|
| **अ बेटर इंडिया अ** | | |
| **बेटर वर्ल्ड :** ए.आर. नारायण मूर्ती | अनु. चित्रा वाळिंबे | २५० |

### राजकीय

| | | |
|---|---|---|
| **जिना : हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य** | | |
| जसवंत सिंग | अनु. अशोक पाध्ये | ५०० |

### विज्ञानविषयक कथा/लेख/संशोधन

| | | |
|---|---|---|
| **विज्ञानातील सरस आणि सुरस** | राहुल गोखले | १८० |

### आरोग्य-माहितीपर

| | | |
|---|---|---|
| **उष्ण जलोपचार :** | | |
| डॉ. पॅट्रिक होरे/डेव्हिड हार्प | अनु. सुभाष जोशी | १२० |

### नाटक

| | | |
|---|---|---|
| **कथा अकलेच्या कांद्याची** | शंकर पाटील | ७० |

### English Fictions

| | | |
|---|---|---|
| The Myth Called Wealth | Rajesh Wattamwar | 150 |
| Call Centre : An Inside Story | Vikrant Shukla | 250 |
| The Meaning of Madness | Neel Burton | 225 |
| Plato's Shadow : | | |
| A Primer On Plato | Neel Burton | 250 |
| Master Your Mind : | | |
| The Mental Health Guide | Dr. Neel Buron | 200 |

## बालवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| **चालणारे बूट आणि मजेदार गोष्टी** | संस्मिता गुप्ते | ५० |
| **जादूचा अंगरखा आणि मजेदार गोष्टी** | संस्मिता गुप्ते | ५० |
| **पतंगाची करामत आणि मजेदार गोष्टी** | संस्मिता गुप्ते | ५० |
| **पिनू-चिनूची चतुराई आणि मजेदार गोष्टी** | संस्मिता गुप्ते | ५० |

## जंगल जंमत मालिका

| | | |
|---|---|---|
| **बूम बूम बैल आणि जंमत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ५० |
| **तीन छोटे मासे आणि जंमत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ५० |

## फ्रँकलिन मालिका

| | | |
|---|---|---|
| **फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन शाळेत जातो** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिनचं पांघरूण** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि सण** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिनचा वाईट दिवस** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन सायकल चालवतो** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिनचा नवा मित्र** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि वादळी पाऊस** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि रात्रीची धमाल** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **शाळेच्या नाटकात फ्रँकलिन** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |







# मेहता पब्लिशिंग हाऊसची आगामी पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | अनुवाद |
|---|---|---|
| **तरुणांनो होशियार** | निरंजन घाटे | |
| **स्वप्न चौर्य** | निरंजन घाटे | |
| **रोबॉट फिक्सिंग** | निरंजन घाटे | |
| **ज्ञानज्योती** | निरंजन घाटे | |
| **शास्त्रज्ञ आणि संशोधक** | निरंजन घाटे | |
| **असे शास्त्रज्ञ असे संशोधक** | निरंजन घाटे | |
| **अंतरीचा दिवा** : वि.स. खांडेकर | संपादन : डॉ. सुनीलकुमार लवटे | |
| **सुगरणीचं विज्ञान** | डॉ. बाळ फोंडके | |
| **मळ्याची माती** | आनंद यादव | |
| **जन्मठेप** | गिरिजा कीर | |
| **शब्द चर्चा** | एम.बी. कुलकर्णी | |
| **अन्नपुराण** | डॉ. अरविंद लिमये | |
| **आदिपर्व** | प्रमिला जरग | |
| **नीळकंठ** | स्नेहल जोशी | |
| **आनंदाचे पासबुक** | श्याम भुर्के | |
| **उद्ध्वस्त** | उमेश कदम | |
| **विज्ञानकथा** | संजय ढोले | |
| **ती दोघं** | डॉ. रमा मराठे | |
| **स्पर्श - कोडे उकलेल का?** | विनिता परांजपे | |
| **मंतरलेले काळे पाणी** | एस.एस. गाडगीळ | |
| **अस्मिता** | सूर्यकांत जाधव | |
| **ॲडम** | रत्नाकर मतकरी | |
| **निलांगिनी** | स्मिता पोतनीस | |
| **सूड** | नितीन बापट | |
| **केक्स** | अपर्णा परचुरे | |
| **युथेन्शिया** | स्वाती चांदोरकर | |
| **एका परिसाची कथा** | मिलिंद जोशी | |
| **दर्पणी पाहता रूप** | विद्युल्लेखा अकलूजकर | |
| **विज्ञानमंथन - सूर्य** | लीना दामले | |

# एक दृष्टिक्षेप.....




**परंपरेच्या क्षितिजावरील नवा चंद्र**

## भोगले जे दु:ख त्याला...

**आशा आपराद**

२२०रु. पोस्टेज २५रु.

नाव तिचं आशा असलं, तरी तिच्या भोवतालचा आसमंत सतत निराशा, निरूत्साह, उपेक्षा नि छळानंच भरलेला असायचा. घरी वडील शिकलेले असले, तरी जामदारखान्याच्या किल्ल्या आईच्या कनवटीला सतत बांधून राहिल्यानं जहाँगीर जिवंत असतानाही राज्य नूरजहाँनचंच असायचं, आशाची आई अशिक्षित मुस्लिम. पारंपारिकतेचंच भूत सतत अंगात भिनलेलं. मुलीच्या जातीनं शिकायचं नाही, हे पक्कं डोक्यात असल्यानं सुशिक्षित वडील वारताच आशाची शाळा इयत्ता ९ वीतच सुटते. शाळा सुटून महिनाही गेला नसेल, शाळा सोडण्यापूर्वी भाग घेतलेल्या निबंधस्पर्धेत आशाचा जिल्ह्यात पहिला क्रमांक आल्याचं कळतं. आशा बक्षिसाचा चषक घेऊन उंबऱ्यात पाय ठेवताच मा 'ऐशे टिनपाट बक्षीसा लई देखिवं मैने, रख जा, ऐशे गलासा मे हामी उद घालतीय,' 'उद' म्हणत चषकाचा उपयोग उदान (धूपदान) म्हणून करते... आयुष्याच्या प्रगतीच्या प्रत्येक पायरींवर आशाचा काळी, कुरूप, अपशकुनी, रडकी चिपलकके मूँ की (पालीच्या तोंडाची), टाँगे केक टप के मूँह की म्हणून उद्धार होत राहायचा....

धोक्याचं वय लागण्यापूर्वी लग्नाचा धक्का.. अन् २०वं लागण्यापूर्वी चार मुलींची आई झालेली आशा एकीकडे वेठबिगारीवर ड्रायव्हिंग करणाऱ्या नवऱ्यासाठी उधार-उसनवार करून रिक्षा घेऊन देते तर दुसरीकडे घरांच्या नरकयातनांतून मुक्तीचा,

स्वावलंबनाचा उपाय म्हणून शिकत राहते. बी.ए., एम.ए., बी.एड., एम.फिल, अशी मजल दरमजल करत, आपल्याच बळावर आपली प्रकाशवाट निर्माण करणारी 'भोगले जे दु:ख त्याला' या आत्मकथेची नायिका नि लेखिका प्रा. आशा आपराद यांचं जीवन वाचत असताना ते कुणाच्याही वाट्यास येऊ नये, असं पदोपदी जाणवत राहतं. ही जाण हेच या आत्मकथेचं यश!

माणसांच्या विकासात आनुवंशिकता महत्त्वाची की परिस्थिती, याचं कोडं अद्याप सुटलेलं जरी नसलं तरी प्रा. आशा आपरादचं समग्र जीवन वाचताना लक्षात येतं की, माणसांच्या आत-आत जोवर स्वयंप्रकाश नि विकासाचे आपसूक घडणारे उद्रेक असत नाहीत, तो वर त्यांच्या अंधाऱ्या जीवनात विद्युल्लतेचा कल्लोळ कडाडत नसतो. नाहीतर हे कसं शक्य आहे, की कुटुंबात खायची भ्रांत, शिक्षणाचं म्हणाल तर आसपास सह्याजीराव व अंगठेबहाद्दर. आशालाचं शिकावंसं का वाटत राहतं– ज्यांच्या जीवनात यातनांचा उच्छाद असतो अशांच्याच जीवनात स्वप्नांची चंदेरी वृष्टी घडून येते... अन्यथा हे कसं शक्य आहे, की रिक्षा ड्रायव्हरचा एस.टी. ड्रायव्हर झालेला आशाचा नवरा दस्तगीर आपराद निवृत्तीच्या दिवशी स्वत:च्या सँट्रोतून घरी येतो, तेही चार सुशिक्षित मुली, जावई, नातवांसह.

'भोगले जे दु:ख त्याला' ही आत्मकथा एका मुस्लिम कन्येची करूण कथा नसून शिक्षण, प्रयत्न, साहस व चिकाटीतून कायाकल्प घडू शकतो, अशा आश्वासक संस्कारांची प्रेरक व अनुकरणीय क्रांतिकथा म्हणून पुढे येते.

ही आत्मकथा मुस्लिम समाजजीवनातील स्त्रीशिक्षण, स्वावलंबन, पुरोगामित्त्व इ. स्त्रीस माणूस बनवणाऱ्या बदलांचे भीषण वास्तव अधोरेखित करत असले, तरीही कथा मूलत: जात, धर्म, वंश या परंपरांना छेद देणारी माणूसपणाची व्याकूळ कहाणी आहे. प्रा.आशा आपराद यांनी ती मनस्वीपणे लिहिली आहे. ही आत्मकथा लिहिण्यामागे आपणास भोगाव्या लागलेल्या भोगांची रामकहाणी सांगून केवळ स्वत:चं मन हलकं करणाचा व्यक्तिगत स्वार्थ व संकुचित हेतू नाही; आपल्यामागून येणाऱ्या अशा मुलींच्या जथ्यास बळ नि प्रेरणा देण्याचा हेतू आहे.

आशा आपराद यांची भाषा हृदयाचा ठाव घेणारी संवेदनशील आहे. मुस्लिम परिवारातील बोली संवाद जागोजागी आल्याने मुस्लिम कुटुंबाचं जिवंत चित्र उभं राहतं. ही बोली बोधगम्य व्हावी, म्हणून लेखिकेने पुस्तकाच्या शेवटी शब्दार्थ परिशिष्ट जोडून आपलं लेखन सुबोध बनवलं आहे. लेखिकेस दैनंदिनी लिहिण्याचा छंद असल्याने ती आपल्या जीवनातील अनेक छोटे-मोठे बारकावे सुसंगतपणे मांडू शकली. त्यामुळे मण्यामागे मणी ओवत जाऊन सुरेख माळ बनावी, अशी प्रसंगांची मालिका या आत्मकथेस कलात्मक ललित बनवते. कधीकाळी आपल्या आईकडे, माँ कडे, गहाण असलेलं आपलं आयुष्य ती ज्या सोशिक समजदारपणे सोडवत समृद्ध करते ते पाहिलं, की स्त्रीमधलं सहनशक्तीचं आश्चर्य वाटल्याशिवाय राहत

नाही. काही गंभीर, भीषण प्रसंगांचा मी साक्षीदार असल्याने प्रा. आशा आपरादांनी दाखवलेला संयम केवळ खानदानीच आहे.

या आत्मकथेत बाप-लेकीचा संवाद, सहवास, संस्कार वाचला, की उभयतांची जगण्याची ताकद उमजते. आई - 'मा'स - आशा अपराद सतत दूषण देत आल्या... त्यांनी हे समजून घेतलं पाहिजे की, मुस्लिम समाजात वैधव्य येणं... त्यातून वाट काढणं... म्हणजे 'रात्रंदिन युद्धाचा प्रसंग' असलेली आई भ्रमिष्ट, आतंकितच राहणार ना? स्वभावाला औषध नसतं हेच खरं! आपल्या वडिलांबद्दलची लेखिकेची आस्था, आत्मीयता सार्वत्रिक... तिनं वडिलांच्या खांद्यावर झोपणं... वेताळासारखं (पृ.६), वडिलांनी मांडीवर घेऊन झुलवत झोपवणं याचं अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन केलंय. लेखिकेकडे प्रसंग चित्ररूप करण्याची विलक्षण हातोटी आहे. सोन्या मारूती चौक, स्मशान वाट, पूर, टवाळखोर मुलांना कॉलेजात 'आई' म्हणून निरूत्तर करणं, आंबेवाडीत अपरात्री चेष्टा करणाऱ्यांना धारेवर धरणं यांसारख्या प्रसंगांतून ते स्पष्ट होतं. चरित्रचित्रणातही त्यांचा हातखंडा लक्षात येतो. आई-वडील म्हणजे दक्षिण-उत्तर असे परस्परविरूद्ध ध्रुव, प्रसंगवर्णनात लेखिकेची अशीच हुकमत दिसून येते. उगीच गळेकाढूपणा नाही. ज्यांना कुणाला जगण्याच्या उद्वेगानं पछाडलं असेल... जे आत्महत्त्या करण्याच्या विचारात असतील; त्यांना ही आत्मकथा 'या जगण्यावर शतदा प्रेम करावे', असा आशावाद जागवल्याशिवाय राहणार नाही.

चंद्रमोहन कुलकर्णी यांनी बक्षिसाचा चषक प्रदान करण्याचा कठोरपणा करण्याच्या आईच्या जुलमाला न कंटाळता आशा यशाचा सूर्य उगवून दाखवते. हे मोठ्या ताकदीनं चित्रित करून २७३ पानांची सारी कथा, व्यथा, गाथा एका मुखपृष्ठात रेखाटली आहे. अनेक प्रसंग, अनेक व्यक्ती, अनेक भाव यांनी भरलेलं हे आत्मकथन इतक्या संयतपणे कसं लिहिता येतं, ते भोगले जे दु:ख त्यालाच ठावे. लेखिकेनं काव्य, म्हणी, विश्वविख्यात रचनांचे दाखले देत आपली कहाणी केवळ वाचनीयच केली नाही, तर ती चिंतनगर्भही केली आहे.

आशांची ही आत्मकथा वाचताना मला माझ्या कॉलेजात पदवीधर झालेली फजिया आठवली. नवरा तिला रोज सोडायला नि न्यायला यायचा. घरातून ती बुरख्यात यायची. लेडिज रूममध्ये तो उतरवून चुडीदारमध्ये शिरायची. एन.सी.सी. ही तिनं केली. परत जाताना बुरखा घालून घरी जायची.

एकदा मी फजियाला शेवटच्या वर्षात शिकताना विचारलं, 'यह चोरी चोरी शिक्षा कब तक?' फजिया म्हटली होती, 'अपना चाँद निकलने तक।' प्रा. आशा आपराद यांची ही आत्मकथा ही आत्मचंद्राचं परंपराक्षितिजावर उदयमान होणंच नाही का?

**अंतर्नाद : जून २०१०**

# एक दृष्टिक्षेप.....




‘जावे त्याच्या वंशा’ची अनुभूती देणारा आठव...

## मी अनीता राकेश सांगतेय...

**अनीता राकेश** अनुवाद : रजनी भागवत

१६०रु. पोस्टेज २५रु.

हिंदी साहित्यात अवघी साडेतीन नाटकं लिहून अजरामर झालेले नाटककार मोहन राकेश! त्यांनी कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, निबंध, दैनंदिनी, अनुवाद अशा सर्व साहित्य प्रकारांना स्पर्श केला असला, ‘सारिका’सारख्या पाक्षिक साहित्य पत्रिकेचं संपादन केलं असलं, तरी त्यांची खरी ओळख राहते ती हिंदीत रंगमंचीय नाट्यलेखन परंपरा सुरू करणारा नाटककार म्हणूनच.

‘अनीता राकेश’ ही त्यांची तिसरी बायको, त्यांनी हिंदीत आपली आत्मकथा, आठवणी लिहिल्या. ‘चंद सतरें और’ आणि ‘सतरें और सतरें’. सतर म्हणजे रेष. हे आत्मकथन आठवणींच्या उभ्या-आडव्या रेषांचं वस्त्र आहे. त्यात क्रमबद्धता असली, तरी मूळ पाया आठवणी सांगण्याचा. ‘आपल्या एखाद्या जिवलगाशी मन हलकं करण्यासाठी केलेलं हितगुज’ असं या आत्मकथेचं स्वरूप असल्यानं ते हृदयस्पर्शी झालंय. हिंदीच्या कविमना प्राध्यापिका रजनी भागवत यांनी सदर आत्मकथेचा अनुवाद मनस्वीपणे केला आहे.

शीला, पुष्पा यांच्यानंतर अनीता राकेश यांच्या जीवनात आली, ती कथाकार म्हणून आणि त्यांची जीवननायिका बनली. राकेशांच्याच शब्दांत सांगायचं तर

'अनीतानं त्याचं रेकॉर्ड खराब केलं. यापूर्वी दोन वर्षांपेक्षा जास्त ते कोणा बाई (?) बरोबर राहू शकले नव्हते. सहा-सात वर्ष झाली, तरी या बाईंचं घर सोडायचं काही लक्षण दिसेना...! अनीताच्या जीवनातही अनेक पुरुष आले... ऐन धोक्याच्या वयातला पहिला प्रियकर, मग राकेश नि त्यांच्यांनंतर कमलेश्वर, जतीन दास, पी.के. रम्मी, आणि वेळोवळी मनात आलेले अनेक! अनीतामध्ये  हा गुण बहुधा अनुवंशानं आलेला... तिची आईही लेखिका होती... तिच्या भोवतीपण जैनेंद्रकुमार, अज्ञेय, महावीर अधिकारी यांसारख्या मान्यवर हिंदी साहित्यकार, संपादकांचा गराडा असायचा...! 'मी अनीता राकेश सांगतेय...', शीर्षकाने प्रकाशित सदर अनुवादित आत्मकथेत गढूळ, 'काळेशार पाणी' असलं, तरी ते अत्यंत नितळ, पारदर्शीपणे, कोणताही आडपडदा न ठेवता लिहिलं गेलंय. मराठीतील लेखकांच्या पत्नींनी यापूर्वी लिहिलेल्या 'मला उद्ध्वस्त व्हायचंय', 'नाच गं घुमा', 'अजुनि चालतेचि वाट' वगैरेपेक्षा हे कितीतरी थेट असल्यानं ते शैलीच्या अंगानं मराठी स्त्री आत्मकथा साहित्यास बरंच काही देऊन जातं.

भारताच्या फाळणीचा काळ. विभाजित पाकिस्तानातून विस्थापित अनेक कुटुंबांबरोबर एक कुटुंब भारतात येतं. शरणार्थी म्हणून दिल्लीतल्या सिव्हिल लाइन्समधील ग्रँड हॉटेलमध्ये त्यांचं पुनर्वसन केलं जातं... डॅडी व्यापारी. मम्मी लेखिका. दोघंही प्रयत्नशील, पण यश सतत क्षितिजापारच. दोघांत भांडणं नित्याची. घरात साहित्यिक वातावरण. पंजाबी घर असल्यानं, परिवारावर मम्मीचा वरचष्मा. अनीता आणि तिचा भाऊ आई-वडील असूनही अनाथपणाचं जीवन जगतात. कोणत्याही नशेत जगणाऱ्या आई-वडिलांची मुलं भरल्या घरातही अनाथच असतात. फाळणी नि हे घर यांचं अद्वैत असतं. फाळणी होते नि घर दुभंगतं, दारिद्र्य येतं. घरात आणखी एक मुलगी जन्मते नि फाळणी संपते.

घरातली मोठी मुलगी अनीता वयात येते, तशी लिहिती होते. लेखिका असलेल्या मम्मीस याचं अप्रूप नि कौतुकही! 'सारिका' या प्रसिद्ध हिंदी पाक्षिकाचे (नंतर ते मासिक झालं) संपादक मोहन राकेश यांच्याशी पत्रमैत्री असते. अनीताच्या कथा ती संपादकांकडे पाठवते. मार्गदर्शन, दुरूस्ती व प्रकाशनार्थ. राकेशांचं पत्र येतं – 'मीच घरी येऊन दुरुस्त करतो.' ते घरी येतात. घरचेच होतात. नि दुरुस्तही! दुसऱ्या पत्नींचा घटस्फोट होण्यापूर्वीच अनीताला पळवून नेऊन विवाहबद्ध करतात. राकेश कलंदर. सतत मित्रांच्या गराड्यात. पूर्वा नि शैली अशी दोन अपत्यं अनीताच्या पदरात टाकून निवर्ततात.

मोहन राकेश हे हिंदीतलं मोठं प्रस्थ. राजकारण, पत्रकारिता जगतात हुकूमत.

राकेश गेले तरी 'राकेश पत्नी' या ओळखीवर जीवन तगून जावं असा माहौल असला तरी, अनीता राकेश यांचं जगणं, जगलेलं खरं खरं सांगणं यांत कुठेच खोटं नसणं हे या कथा नजराण्याचं खरं वैभव.

ही आत्मकथा अनेकांगांनी आपला ठाव घेते. ती अनीताची कैफियत असल्यानं सुरुवातीपासून शेवटपर्यंत आपल्याला पकडून ठेवते, ती तिच्या करुण भोगामुळे. स्त्रीचं जगणं नव्या सुख शोधाचा कांचनमृग असतो. ती शिकार साधायला जाते नि स्वत:च शिकार होते. अनीताच्या वाट्यास जे येतं, ते कुणाच्याच वाट्यास येऊ नये... उपेक्षित बालपण, फसवलेलं तारुण्य, अत्याचारित प्रौढपण व संघर्षशील उत्तरायण. एखाद्या स्त्रीच्या जीवनात येणारा प्रत्येक किरण तिरका नि तिरकसच का यावा? तिनंच म्हणून प्रत्येक वेळी का सहन करत राहायचं? पुरुष प्रत्येक वेळी नामानिराळा विश्वामित्र का? हा या आत्मकथनानं न विचारलेला, उच्चारलेला प्रश्न!

रजनी भागवतांच्या अनुवादांचं विशेष हे, की त्या मराठी अनीता राकेश होतात. त्यामुळे लेखिका नि अनुवादिका दोन्ही माहीत असलेल्या माझ्यासारख्या वाचकांस ही कथा रजनी भागवतांची वाटायला लागते. ही आत्मकथा अनीता राकेशंची एक स्मरणसाखळी आहे. तीत त्या आपल्या जीवनाचा एक-एक हृदयस्पर्शी प्रसंग उत्कटपणे ओवतात. एक स्त्री इतकं खरं कसं सांगते, याचं पुरुषवाचकांना आश्चर्य. नि स्त्रीवाचक अनीता राकेशांबद्दल अशासाठी चकित की, स्त्रीनं मनातलं सगळं सांगायचं असतं का?

...मी प्रेम करते, दारु पिते, सिगरेट पिते, मी समलिंगी आहे (अपवाद म्हणून का असेना), या या पुरुषांबद्दल मला हे हे वाटलं... याला मी नाकारलं... यापासून मी लांबच राहिले... त्याला दोन हात दूरच ठेवलं... याला आकर्षण म्हणून, तर त्याला गरज म्हणून जवळ केलं... तद्दन अर्धसत्य, फसवं वरवरचं लिहिणाऱ्या मराठी लेखकपत्नींच्या आत्मकथांच्या पार्श्वभूमीवर हे आत्मकथन उजवं अशासाठी की, ते सारं नितळपणे सांगते. ना खंत, ना खेद असा सारा लेखनाचा बाज. पदरी पडेल, ते पवित्रपणे निभवायची नायिकेची जीवनशैली. इतकी बिकट परिस्थिती आली म्हणून तिनं कुणापुढे हात पसरले... अगदी सासूकडेही (अम्मीजी) असं नाही. अपवाद इंदिरा गांधी. लेखन, रॉयल्टीवर ती जगते तशी राकेश यांच्या प्रतिष्ठेवरही. तेही ते प्रांजळपणे कबूल करण्यातील प्रामाणिकपणा ही या आत्मकथेची नजाकत. तोच तिचा नजराणाही. पुस्तकाचं मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णीचं; अनीता राकेश यांच्याच शब्दात सांगायचं झालं तर 'या आत्मकथनाचा आरसा नि खरंखुरं प्रतीक!'

आत्मकथा वाचताना अनेक ओळी अधोरेखित करण्याचा मोह वाचकांत निर्माण

करण्याचं सामर्थ्य कथेच्या आशयाबरोबर लेखिका/अनुवादिकेच्या भाषाप्रभुत्त्वात आहे. ओघवत्या शैलीमुळे लेखिका आपल्याजवळ बसून सांगतेय... हे शीर्षकात जसं आहे, तसं निवेदनातही. लेखिका वाचतावाचता वाचकांची जिवाभावाची सखी, भगिनी होते हे या आत्मकथेचं खरं यश. आई-मुलगी एकमेंकीच्या स्पर्धक होणं, सत्तींची असंवाद गळाभेट, अनीताचं बच्चनच्या घरी जाऊन न सांगता बरंच काही समजावून येणं, पोलिसांच्या नजरेतील 'नर'पण (पुरुषास स्त्री नराधम का म्हणते सांगणारं!), लेखक, संपादकांकडे येणारे लाळघोटे, प्रत्येक पुरुषाचं 'धोबी' (रामायणातला!) असणं अशा कितीतर चिजा, जागा या आत्मकथेत भरलेल्या आहेत. त्याचं वाचन स्वत: करण्यात जो अनुभव येतो तो कबीरांच्या भाषेत सांगायचं झालं तर 'गुंगे का गुड'. मुक्या माणसास गुळाची चव कळते पण सांगता येत नाही. 'जावे त्याच्या वंशा'ची अनुभूती देणारा हा आठव... सांगावा तर पंचाईत... न सांगावं तर काळ सोकावेल याचं शल्य. अशी आत्मकथनं मराठीत येतील, तर मराठी आत्मकथा (विशेषत: स्त्री आत्मकथा) अधिक धीट होईल. म्हणून हा परिचयप्रपंच.

**अंतर्नाद : जून २०१०मधून**

**श्री. सुनीलकुमार लवटे,**
'निशाकुंर', रणनवरे वसाहत, राजीव गांधी रिंग रोड,
कोल्हापूर ४१६ ००७.
फोन - (०२३१) २३२४४०५.

**प्रिय वाचकमित्रहो........**

आपल्या सोयीसाठी
**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
आठवड्याचे सातही
दिवस नियमित सुरू राहील.
वेळ -सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०
रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

सामाजिक जीवन, समाजशास्त्राचे विविध पैलू आणि याचाच अविभाज्य भाग असणारे अर्थकारण, राजकारण आणि संबंधित इतर अनेक विषय!
त्यांची व्याप्ती, त्यांतील तज्ज्ञ-विचारवंत यांचा परिचय, मूलभूत प्रश्न, सिद्धांत यांवर लिहिलेले विविध लेख यांतून मराठी भाषेच्या समृद्धीत भर घालणारे...




५ खंडांचा
एकत्र संच घेणे
आवश्यक आहे.

# भारतीय समाजविज्ञान कोश

खंड १ ते ५

प्रमुख संपादक

**स. मा. गर्गे**

**पाच खंडांची एकूण किंमत :**

**२५००रु.**

पोस्टेज खर्च : १००रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

# पुरस्कार

### * पॉपकॉर्न'ला द.म.सा.चा विशेष पुरस्कार

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने वेगवेगळ्या साहित्य प्रकारातील पुस्तकांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे लक्ष्मण माने, गिरिजा कीर यांच्या उपस्थितीत झालेल्या समारंभात सुप्रिया वकील यांच्या 'पॉपकॉर्न' या ललित लेख संग्रहास विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### * मीरा सिरसमकर यांना 'गीताबाई चारठाणकर पुरस्कार'

सेलू (जि. परभणी) येथील 'महिला मंडळ सत्कार समिती'तर्फे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात बहुमोल कार्य करणाऱ्या, 'किर्लोस्कर' व 'स्त्री' मासिकाच्या सहसंपादिका तसेच नोबेल ललनाच्या लेखिका मीरा सिरसमकर यांना **'स्वातंत्र्यसैनिक वीर महिला गीताबाई चारठाणकर पुरस्कार'** संध्याताई दुधगावकर यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.



**मीरा सिरसमकर पुरस्कार स्वीकारताना**

या पुरस्काराचे यंदा सोळावे वर्ष होते. या निमित्ताने मीरा सिरसमकर यांचे 'नोबेल विजेत्या स्त्रिया' या विषयावर 'स्लाइड शो'सह व्याख्यान झाले.

*** सुधीर गाडगीळ यांना स. मा. गर्गे पुरस्कार**

बीड जिल्हा पत्रकार संघ आणि नगर परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. स. मा. गर्गे राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार सुप्रसिद्ध मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांना महसूल मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते देण्यात आला. पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंत मुंडे, नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर उपस्थित होते.

मागील वर्षापासून जिल्ह्याचे भूमिपुत्र गर्गे यांच्या नावाने दरवर्षी राज्यातील एका नामवंत पत्रकाराला पुरस्कार दिला जातो. ५१ हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

*** अरुण दाते यांना गजाननराव वाटवे पुरस्कार**

स्वरानंद प्रतिष्ठानचा पहिला 'काव्यगायक गजाननराव वाटवे' पुरस्कार भावगीतगायक अरुण दाते यांना टिळक स्मारक मंदिर येथे ७ जून रोजी ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

१० हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरणानंतर 'हा नाद ओळखीचा' हा भावगीतांचा कार्यक्रम सादर केला गेला. त्यामध्ये गजाननराव वाटवे यांचे सुपुत्र मिलिंद वाटवे यांनी स्वत:च्या काही रचना सादर केल्या.

*** आचार्य अत्रे पुरस्कार**

'लोकसत्ता'चे बातमीदार सुनील माळी, ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड आणि झी महाराष्ट्राचा सुपरस्टार, पुरंदरचा सुपुत्र नीलेश साबळे यांना आचार्य अत्रे यांच्या स्मृतिदिनी १३ जूनला पुरस्कार देण्यात आले. अत्रे पुरस्काराचे हे १९ वे वर्ष आहे.

साहित्य पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेले बाबा भांड हे लेखन, प्रकाशन क्षेत्रात कार्यरत आहेत. अध्यापनाचाही अनुभव असून, बालवीर चळवळीत त्यांनी १० देशांचा प्रवास केला आहे. साकेत प्रकाशनाच्या माध्यमातून १,५०० पुस्तके प्रकाशित केली आहेत. ७ कादंबऱ्या, २ कथासंग्रह, ४ प्रवास वर्णने, ४ ललित गद्य यासह ७९ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत.

अत्रे पत्रकारिता पुरस्कारासाठी निवड झालेले लोकसत्ताचे मुख्य बातमीदार सुनील माळी हे एम.कॉम. जर्नालिझममधील पदवीधर आहेत. 'केसरी' आणि 'सकाळ' चे उपसंपादक म्हणून त्यांनी काम केले. सध्या 'लोकसत्ता'मध्ये ते मुख्य बातमीदार आहेत. पुणे विद्यापीठ वृत्तपत्र विद्या विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,

मराठवाडा महाविद्यालयात बातमीदारी विषयाचे अध्यापन केले आहे. नागरीकरण, नागरीसमस्या, पर्यावरण आदी विषय, विविध प्रश्नांची सोडवणूक, शहर विकास आराखडा, जलोत्सारण, झोपडपट्टी सुधारणा, वाहतूक व्यवस्था या विषयावर त्यांनी लिहिले आहे.

कलाकार पुरस्कारासाठी झी मराठी वाहिनीवर महाराष्ट्राचा सुपरस्टार म्हणून पुढे आलेला सासवडचा (पुरंदर) सुपुत्र डॉ. नीलेश पोपट साबळे हा एम.ए. असून, वैद्यकीय क्षेत्रात काम करत आहे. लहानपणापासून अभिनय, नकलाकार म्हणून काम करत आहे. झी मराठी वरील 'फू बाई फू' या कार्यक्रमाचे नेटके व प्रभावी सूत्रसंचालन प्रेक्षकांच्या पसंतीला उतरले आहे.

*** मोनिका गजेंद्रगडकर यांना पुरस्कार**

'प्रियदर्शिनी अकादमी'तर्फे दिला जाणारा उल्लेखनीय मराठी साहित्यनिर्मितीचा पुरस्कार यंदा मोनिका गजेंद्रगडकर यांना 'आर्त' या कथासंग्रहासाठी जाहीर झाला.

२५ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून, २५ जून रोजी मुंबईत हा पुरस्कार प्रदान सोहळा झाला. यांचे 'आर्त' व 'भूप' हे दोन कथासंग्रह गाजलेले आहेत. तसेच त्या 'मौज प्रकाशन'च्या संपादिका आहेत.

*** 'महाराष्ट्र जर्नालिस्ट फाउंडेशन'चे पुरस्कार**

ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर व महाराष्ट्र टाइम्सचे संपादक अशोक पानवलकर यांना सांगली महाराष्ट्र जर्नालिस्ट फाउंडेशनचे 'भास्कर ॲवॉर्ड २०१०' पणजी येथील दीनानाथ मंगेशकर कला अकादमीमध्ये गोव्याचे मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. माजी केंद्रीय मंत्री रमाकांत खलप, गोवा युनियन ऑफ जर्नालिस्टचे अध्यक्ष प्रकाश कामत हे या सोहळ्याला उपस्थित होते.

'भास्कर ॲवॉर्ड'चे हे चौथे वर्ष आहे. श्रीपाद नाईक आणि दिग्विजय खानविलकर यांनाही राजकीय, सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल 'भास्कर ॲवॉर्ड' प्रदान करण्यात आले.

*** नाट्य परिषद पुणे शाखा - पुरस्कार**

''नाटकाचं वेड असंच सुरू ठेवा. त्यामुळे आपल्या जगण्याला अर्थ प्राप्त होईल. वाचन आणि नाटक पाहण्याचा रियाज सुरू ठेवला पाहिजे. नाटकाच्या वेडात चिंब भिजलं पाहिजे,'' अशी भावना ज्येष्ठ साहित्यिक - नाटककार शं. ना. नवरे यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुणे शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त नवरे यांच्या हस्ते ज्येष्ठ अभिनेते राघवेंद्र कडकोळ, सुरेश साखवळकर, आनंद अभ्यंकर, राजन भिसे, शरद पोंक्षे, अनंत जोशी,विजय वांकर, दिलीप हल्याळ, कविता टिकेकर, विद्या भागवत, माधव मोडक यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

नाट्यसमीक्षणासाठी 'सकाळ'चे राज काझी यांना गो. रा. जोशी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नवरे म्हणाले, ''नाटक ही वस्तू एखाद्या सणासारखी असते. लेखक, दिग्दर्शक, अभिनेते सगळेच त्याचे निर्माते असतात. सगळे वेड्यासारखे झटतात, तेव्हा सण उत्तम साजरा होतो. नाट्यक्षेत्रात आलो आणि या वेडात चिंब भिजलो, हे मला भाग्य वाटते. वेगवेगळी माणसं आणि त्यांची शिस्त पाहायला मिळाली. नाटकाकडे का वळलो, असे कधीच वाटले नाही.''

प्रशांत दामले म्हणाले, ''कलाकार वर्षभर मेहनत करतात. अशा वेळी त्यांच्या पाठीवर थाप पडणे महत्त्वाचे असते. कलाकाराला कौतुकाचे शब्द ऐकायला आवडते. पुरस्कारामुळे नवे काम करण्याचा उत्साह वाढतो आणि प्रोत्साहन मिळते. या जिद्दीतून तो पुन्हा उभा राहतो. ''

*** डॉ. विश्वनाथ खैरे यांना मसाप गौरव पुरस्कार**

'महाराष्ट्र साहित्य परिषद गौरव पुरस्कार' डॉ. खैरे यांना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांच्या हस्ते देण्यात आला. तसेच डॉ. मंदा खांडगे यांना 'भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार, 'मसाप'च्या कार्यवाह डॉ. माधवी वैद्य, ह.ल.निपुणगे यावेळी उपस्थित होते.

जागतिकीकरणामध्ये भाषाबोली वाहून जाण्याची भीती निर्माण झाली असून, नव्या दृष्टीने भाषेचा अभ्यास विद्यापीठांमध्येही होत नाही. भाषाबोलीचे जतन करण्यासाठी व ज्ञानभाषा मराठी घडविण्यासाठी तिचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे, असे विचार ज्येष्ठ भाषा संशोधक डॉ. विश्वनाथ खैरे यांनी व्यक्त केले.

'स्त्रियांच्या साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे,' असे सांगून बाळ म्हणाल्या, ''वेगवेगळ्या क्षेत्रात महिलांनी उत्तम कामगिरी केली असली, तरी पुरुषप्रधान समाजात तिला आजही अस्तित्वासाठी लढा द्यावा लागतो आहे. साहित्याच्या क्षेत्रात महिला आरक्षण नव्हे, तर प्रोत्साहनाची गरज आहे.''

❐





**वजन कमी करण्यासाठी योगसाधना**

**भरत ठाकूर** अनु. डॉ. सुभाष दांडेकर

योग्य आहार व साध्या योगक्रियांनी तंदुरूस्त राहून वजन कमी करता येते याचा पुरावा देणारे पुस्तक.

**५०रु. पोस्टेज २०रु.**

# वाचकांचा प्रतिसाद



सविनय नमस्कार!

आपण पाठवलेल्या मेहता मराठी ग्रंथजगतच्या दिवाळी अंक ०९ व जाने., फेब्रु., मार्च, एप्रिल ०९ च्या अंकाबद्दल धन्यवाद. प्रवासवर्णनांना वाहिलेला दिवाळी अंक अप्रतिम आहे. इतर अंकही ग्रंथसंबंधी माहितीचा खजिना आहेत.

सौ. सुनिता कट्टी
बेंगलोर




स. न. वि. वि.

आपण पाठवलेला जून २०१० चा अंक मिळाला. मुखपृष्ठावरील पुस्तकांच्या आकर्षक जाहिरातीनी मन वेधून घेतले. साहित्यवार्ता, विशेष वार्ता, पुस्तक प्रकाशन, पुस्त परिक्षण यामुळे महाराष्ट्रातील ग्रंथजगत च्या हालचाली समजतात. आपले हे कार्य अवर्णनीय व संस्कारक्षम आहे.

उत्तमोत्तम ग्रंथनिर्मितीना चालना देत आहात, वेगवेगळे विषय पुस्तकांचे माध्यमातून हाताळीत आहात, त्यामुळे ‘मेहता मराठी ग्रंथजगत’चे अंक वाचनीय आहेत, आणि संदर्भग्रंथ म्हणून संग्रहणीय आहेत. त्याबद्दल शतशः धन्यवाद!

पंडित हिंगे,
पुणे.

‘ले मिझराबल’ या पुस्तकात
प्रसिद्ध व्हिक्टर ह्युगोने ८२३
शब्दांचं एक भलं मोठं वाक्य
लिहिलं होतं! हस्तलिखित
संपादकांना पाठविल्यानंतर,
ह्युगोने त्यांना

‘?’

एवढंच लिहून पाठवलं.

त्यावर त्याने संपादकांची
प्रतिक्रिया आजमावयाचा
प्रयत्न केला.

यावर संपादकांकडूनही त्याला
तातडीनं उत्तर आलं.

ते उत्तर होतं

‘!’

# श्रद्धांजली

*** प्रा. ग. प्र. प्रधान**

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांचे २८ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. प्रा. प्रधान यांच्या इच्छेनुसार सुमतीबाई शहा आयुर्वेद रुग्णालयामध्ये त्यांचे नेत्रदान व देहदान करण्यात आले.

प्रा. प्रधान हे आचार्य जावडेकर आणि साने गुरुजी या मातृवत्सल विचारवंतांच्या परंपरेचे पाईक होते. लोकमान्य टिळकांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता.

थोर स्वातंत्र्यसैनिक, नामांकित वक्ते, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, आदर्श लोकप्रतिनिधी, अभ्यासू लेखक अशा 'प्रधान मास्तरां'च्या अनेक प्रतिमा मराठी जनमानसावर ठळकपणे उमटल्या.

नि:स्वार्थी समाजसेवेबद्दल टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने सन्माननीय डी.लिट. देऊन त्यांना गौरविले होते.

२६ ऑगस्ट १९२२ रोजी पुण्यात त्यांचा जन्म झाला. संस्कारक्षम वयातच त्यांना आचार्य जावडेकर, साने गुरुजी यांचा सहवास लाभला. १९४२ च्या चलेजाव आंदोलनातील सहभागाबद्दल त्यांना ११ महिन्यांचा कारावास झाला. फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी १६ वर्षे इंग्रजी विषयाचे अध्यापन केले. एस.एम.जोशी आणि नानासाहेब गोरे यांचे ते निकटचे सहकारी होते. १९६६ पासून सलग १८ वर्षे समाजवादी पक्षातर्फे ते पदवीधर मतदारसंघांतून विधान परिषदेवर निवडून गेले. १९८० ते ८२ या कालावधीत ते विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते होते. आणीबाणीत ते १८ महिने तुरुंगात होते.

लोकलढ्यातील अखंड सहभाग हे प्रधान यांचे वैशिष्ट्य होते. गोवे मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, एक गाव एक पाणवठा आंदोलन, मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा, अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन वगैरे आंदोलनांत त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. १९८४ मध्ये सक्रिय राजकारण सोडल्यावर त्यांनी

१४ वर्षे त्यांनी 'साधना'च्या संपादकपदाची जबाबदारी सांभाळली.

पत्नी डॉ. मालविका प्रधान यांच्या निधनानंतर प्रा. प्रधान यांनी सदाशिव पेठेतील आपले राहते घर साधना कार्यालयाला दिले.

*** प्रसिद्ध लेखिका, पत्रकार वसुधा माने**

प्रसिद्ध लेखिका, ज्येष्ठ पत्रकार आणि अनुवादकार वसुधा वसंतराव माने (वय ७७) यांचे रक्तदाबाच्या विकाराने निधन झाले.

वसुधा माने यांनी प्रामुख्याने ललितगद्य लेखन केले. ललितगद्यकार व अनुवादक अशी त्यांची ओळख होती. भटकंतीची त्यांना आवड होती. 'गोव्यातील धालो' हे लोकगीतांचे संकलन, 'नीलशैल' ही अनुवादित कादंबरी, 'गोव्यातील दिवस', 'सरहद आणि इतर' हे ललितलेख, तसेच 'सैबेरियातून पलायन' हे अनुवादित प्रवासवर्णन असे त्यांचे विविध लेखन आहे.

१९६५ मध्ये भारत-पाकिस्तान युद्धात प्रत्यक्ष रणभूमीवर जाऊन तेथील वार्तांकन करणाऱ्या त्या पहिल्या मराठी पत्रकार होत्या.

'आनंद' या बालकांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मासिकाचे कार्यकारी संपादकपद त्यांनी काही काळ भूषविले होते. १९७१ मध्ये 'सत्यकथा' मासिकातून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले होते.

'मौज', 'स्त्री' व 'किर्लोस्कर' या मासिकांसह 'सकाळ' आणि विविध वृतपत्रांतून त्यांनी लेखन केले. 'मानेंचे घर' या दीर्घ लेखनाबद्दल त्यांना 'अनंत काणेकर' पुरस्कार मिळाला होता. तळेगाव दाभाडे येथील साहित्य, कला व संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी १९९३ मध्ये त्यांची बिनविरोध निवड झाली होती.

*** ज्येष्ठ बासरीवादक पं. अरविंद गजेंद्रगडकर**

ज्येष्ठ बासरीवादक, स्वरमंडल वादक व संगीत समीक्षक पंडित अरविंद गजेंद्रगडकर (वय ८३) यांचे ३० मे रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. संगीत व साहित्य या दोन्ही क्षेत्रांमध्ये त्यांचा वावर होता.

त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली, एक स्नुषा व नातू असा परिवार आहे. 'केसरी'चे सहसंपादक निखिल गजेंद्रगडकर यांचे ते वडील होत. गजेंद्रगडकर यांना राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागाचा पुरस्कार नुकताच जाहीर झाला होता. मात्र, पुरस्कार वितरण सोहळा होण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले.

पं. गजेंद्रगडकर यांचा जन्म ११ जानेवारी १९२८ रोजी नाशिक येथे झाला. नाशिक, सोलापूर व पुणे या ठिकाणी त्यांचे शिक्षण झाले. त्यांनी विज्ञान शिक्षक म्हणून काम केले. त्यानंतर बनारस हिंदू विश्वविद्यालयामध्ये संगीताचे प्राध्यापक

म्हणून ते रुजू झाले. 'स्वरमंडल' या वाद्याचे स्वतंत्र वादन करणारे ते एकमेव कलाकार होते. गायकीच्या अंगाने बासरीवादन हे त्यांच्या वादनाचे वैशिष्ट्य होते.

पुणे, धारवाड, पाटणा व नागपूर या आकाशवाणी केंद्रांवर त्यांनी संगीत संयोजक म्हणून काम केले. पुणे आकाशवाणी केंद्रावरील 'आशा उद्याच्या' आणि 'बालोद्यान' या कार्यक्रमांची त्यांची निर्मिती उल्लेखनीय ठरली.

संगीत समीक्षेबरोबरच त्यांनी संगीतावर आस्वादक लेखनही केले. 'स्वरांच्या बनात', 'स्वरांची स्मरणयात्रा', 'असे सूर', 'अशी माणसं' सुमारे २५ पुस्तके त्यांनी लिहिली.

कुमार गंधर्व, पं.भीमसेन जोशी, गंगुबाई हनगल, पं.फिरोज दस्तूर, सरस्वतीबाई राणे, पं. जितेंद्र अभिषेकी आदी दिग्गजांचा सहवास पं.गजेंद्रगडकर यांना लाभला. महाराष्ट्र, राजस्थान, उत्तरप्रदेश, कर्नाटक आदी राज्यांमध्ये त्यांनी ४०० कार्यशाळा घेतल्या. बासरीवादनाचा वारसा नव्या पिढीला देण्यासाठी त्यांनी संगीत विद्यालयही चालवले.

*** आशा भेंडे**

प्रायोगिक रंगभूमीवरील प्रसिद्ध कलाकार आशा भेंडे यांचे वृद्धापकाळाने चेंबूर येथील निवासस्थानी निधन झाले. त्या ८२ वर्षांच्या होत्या.

आत्माराम भेंडे व आशा भेंडे हे रंगभूमीवरील मनमिळावू दाम्पत्य सर्वांमध्ये लोकप्रिय होते. आशा भेंडे या पूर्वाश्रमीच्या लीली इझीकेल. त्या रेडिओस्टार म्हणून प्रसिद्ध होत्या. पती आत्माराम भेंडे यांच्यासह अनेक फार्सिकल नाटकांमधून भूमिका केल्या. पूर्णिमा थिएटर या नाट्यसंस्थेमार्फत त्यांनी आत्माराम भेंडे यांच्या साथीने अनेक नाटकांची निर्मिती केली होती. 'माझ्या जगात मी' हे आशा भेंडे यांचे आत्मचरित्र अलीकडेच प्रकाशित झाले. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'मटा सन्मानसंध्ये'मध्ये २००८ साली आत्माराम व आशा भेंडे यांच्या लग्नाच्या ६०व्या वाढदिवसाचा सोहळा थाटामाटात पुन्हा लग्न लावून साजरा करण्यात आला होता.

त्यांच्या पश्चात पती आत्माराम भेंडे, पुत्र मराठी रॉकस्टार नंदू भेंडे व अमेरिकास्थित कन्या पूर्णिमा माने असा परिवार आहे.

*** ज्येष्ठ पत्रकार वि. ना. देवधर**

ज्येष्ठ पत्रकार वि. ना. देवधर (वय ८१) यांचे वृद्धापकाळाने २५ मे रोजी निधन झाले. देवधर यांनी वृत्तपत्र क्षेत्रात ५५ वर्षांची कारकीर्द केली. देवधर हे 'विसूभाऊ' या नावाने परिचित होते. आरंभी चार वर्षे 'तरुण भारत'मध्ये काम केल्यानंतर ते 'केसरी'मध्ये चार वर्षे वार्ताहर होते. ज्येष्ठ साहित्यिक-विचारवंत श्री. म. माटे

यांच्याकडे दररोज पहाटे जाऊन लेखांचे शब्दांकन करण्याचे काम त्यांनी केले. त्यांनी 'बीएमसीसी'मधून बी.कॉम. ही पदवी संपादन केली. १९६२ मध्ये ते 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये ते रुजू झाले. दोन वर्षे दिल्ली प्रतिनिधी म्हणूनही काम केले. वयाच्या ५१ व्या वर्षी ते 'तरुण भारत'चे संपादक म्हणून पुण्याला परतले. त्यानंतर 'मुंबई तरुण भारत', 'नाशिक तरुण भारत'चे कामही पाहिले.

बातमीदारी करताना डोळे, कान आणि मनदेखील उघडे ठेवायचे आणि त्यात कुठे 'मी'पणा येऊ द्यायचा नाही, हा त्यांचा कटाक्ष असे. आणीबाणीनंतर केंद्रात जनता सरकारचा प्रयोग सुरू झाला त्या वेळी देवधर दिल्लीला गेले. पुढे त्यांनी 'लोकसत्ता'मध्ये सहसंपादक म्हणून काम केले. 'एसएनडीटी'च्या दूरशिक्षण योजनेत त्यांनी रात्रीचा पत्रकारिता अभ्यासक्रम चालवला.

*** ज्येष्ठ पत्रकार श्रीकृष्ण महाबळ**

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्थेचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार श्री. श्रीकृष्ण भास्कर महाबळ (वय ७०) यांचे निधन झाले.

महाबळ हे 'किर्लोस्कर', 'स्त्री', मनोहर या मासिकांच्या संपादकीय विभागातील एक अनुभवी व अभ्यासू पत्रकार होते. मनोहर साप्ताहिकाचे ते प्रदीर्घ काळ संपादक होते. किर्लोस्कर मासिकाचे संपादक त्यांनी भूषविले होते. अनेक नियतकालिके, त्यांचे निखळ विनोदी, कल्पनानिष्ठ, प्रासंगिक लेखन वाचकांच्या स्मरणात दीर्घ काळ राहील.

'डावपेच' आणि 'बाई माणसाची अब्रू' ही त्यांची दोन विनोदी पुस्तके चोखंदळ वाचकांच्या जगात लोकप्रिय ठरली. 'श्रीनगर', 'हासरेबाण', 'क्षितिज रेषा' ही त्यांची सकाळ, ऐक्य, पुढारी, लोकमत आदी दैनिकांतील सदरे विशेष गाजली होती.

*** ज्येष्ठ पार्श्वगायिका ललिता फडके**

जुन्या पिढीतील ज्येष्ठ पार्श्वगायिका ललिता फडके-देऊळकर यांचे २५ मे रोजी मुंबईत विलेपार्ले येथे निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. दिवंगत गायक-संगीतकार सुधीर फडके यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात संगीतकार व गायक श्रीधर फडके हे पुत्र, सून आणि दोन नाती असा परिवार आहे. त्यांनी अनेक मराठी आणि हिंदी चित्रपटांसाठी पार्श्वगायन करून काही काळ गाजवला होता.

श्रीधर पार्सेकर यांच्या एका ऑपेरामध्ये (१९४५) ललिता देऊळकर, शांता आपटे, राम मराठे आणि सुधीर फडके हे काम करत होते. १९४६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'रुक्मिणी स्वयंवर' या चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायन केले.

त्यानंतर संगीतकार शंकर व्यास यांनी 'भक्त ध्रुव' या चित्रपटासाठी आणि

संगीतकार सी. रामचंद्र यांनी 'साजन' या चित्रपटांसाठी गाणी गाऊन घेतली. त्यांनी मोहमंद रफी यांच्याबरोबर 'हमको तुम्हाराही आसरा, तुम हमारे हो न हो' हे गाणे म्हटले. तेव्हा रफी हे या क्षेत्रात नवखे होते. रफी यांच्याबरोबर गायलेले 'मोरे राजा हो, ले चल नदिया के पार' हे गाणे त्या काळी खूप गाजले.

१९४८-४९ या कालावधीत 'रामबान', 'बेदर्द', 'दौलत', 'गर्ल्स स्कूल', 'नरसिंह अवतार', 'रोशनी', 'सावरिया', 'शबनम', 'खामोश', 'सिपाही', 'जयभीम', आदी चित्रपटांतील गाणी गायली. 'मायाबाजार' या चित्रपटातील त्यांची गाणी खूप गाजली. 'नमक', 'उठो जागो', 'जलन', 'खिडकी', 'मेरा मुन्ना', या चित्रपटांसाठी त्यांनी गाणी गायली. 'शहीद' चित्रपटांतील त्यांनी गायलेले 'बचपन की याद धीरे धीरे प्यार बन गई' हे गुलाम हैदर यांनी संगीतबद्ध केलेले गाणेही लोकप्रिय झाले होते.

हिंदीप्रमाणेच मराठी चित्रपटांसाठीही त्यांनी पार्श्वगायन केले होते. 'मायाबाजार', 'उमज पडेल तर', 'चिमण्यांची शाळा', 'सुवासिनी', 'जशास तसे', 'वंशाचा दिवा', 'सौभाग्य' आदींचा यात समावेश आहे. 'वंशाचा दिवा' या चित्रपटांतील 'रंगू बाजाराला जाते, हो जाऊ द्या' हे पं. वसंतराव देशपांडे यांच्यासमवेत गायलेले गाणे लोकप्रिय झाले.

*** अरुणा दामले**

'प्रभात'च्या परिवारातील लेखिका अरुणा अनंत दामले (वय ७७) यांचे 'प्रभात' रस्त्यावरील त्यांच्या निवासस्थानी दीर्घ आजाराने निधन झाले. वन्यजीवसृष्टीचे अभ्यासक व लेखक अनिल दामले, प्रभात चित्रपटगृहाचे चालक विवेक दामले व अजित दामले हे त्यांचे चिरंजीव होत.

अरुणा दामले यांचा २६ मे १९३४ रोजी मुंबईत जन्म झाला. 'प्रभात' कंपनीचे एक संस्थापकांपैकी विष्णू दामले यांचे चिरंजीव अनंत दामले यांच्याशी विवाह झाल्यानंतर अरुणाताईंनी विविध नियतकालिके व वृत्तपत्रांमधून 'प्रभात'संबंधी व संगीतासंबंधी विपुल लेखन केले. त्यांनी लिहिलेल्या 'मराठी चित्रपट संगीताची वाटचाल' या पुस्तकाला राष्ट्रपती पुरस्कारही मिळाला.

*** मल्याळी कादंबरीकार कोविलन**

मल्याळीतील ख्यातनाम कादंबरीकार व्ही.व्ही. अयप्पन उर्फ कोविलन यांचे खासगी रुग्णालयात निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात मुलगा व दोन मुली असा परिवार आहे. ते श्वसनविकाराने आजारी होते.

कोविलन यांच्या ११ कादंबऱ्या, १२ लघुकथासंग्रह, तीन ललित लेखसंग्रह

व एक नाटक असे साहित्य प्रसिद्ध झालेले आहे. ते स्वातंत्र्यसैनिक होते. कोविलन यांचा जन्म ९ जुलै १९२३ रोजी कंदानसेरी येथे झाला होता.

*** ज्येष्ठ साहित्यिक मनोहर माळगावकर**

प्रख्यात कादंबरीकार, इतिहाससंशोधक व पत्रकार मनोहर माळगावकर यांचे कर्नाटकमधील 'जगलपेट' येथे रात्री निधन झाले. ते ९७ वर्षाचे होते. त्यांनी डिस्टन्ट ड्रम, द प्रिन्सेस, द डेव्हिल्स विंड, कान्होजी आंग्रे, छत्रपती ऑफ कोल्हापूर यांसारखे ग्रंथ लिहून इंग्रजी साहित्यात मोलाची भर घातली.

जगलपेट येथील त्यांच्या बंगल्याच्या परिसरातच लष्करी इतमामात मनोहर माळगाावकर यांच्यावर मंगळवारी संध्याकाळी अंतिम संस्कार करण्यात आले. त्यावेळी त्यांचे नातेवाईक तसेच पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांच्या मागे जावई असून माळगावकरांच्या मुलीचे १२ वर्षांपूर्वीच निधन झाले आहे.

इतिहास, लष्करातील दिवस, जातीयवाजी राजकारण यासारख्या विषयांवर लिहिणाऱ्या मनोहर माळगावकरांनी मानवी नातेसंबंधांचाही सूक्ष्म व तरल वेध आपल्या पुस्तकांतून घेतला आहे.

*** डॉ. बळिराम हरिराम शुक्ल**

डॉ. शुक्ल यांचे हृदयविकाराच्या आजाराने निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते.

वेदान्त तत्त्वज्ञानातील न्यायशास्त्रातील ते अखिल भारतीय पातळीवरील विद्वान होते. 'न्यायदर्शन' विषयावर त्यांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

❐



# बालनगरी

अनुक्रमणिका

फ्रँकलिन आणि
हरवलेला कॅमेरा १०५

# फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा

पोलेत बुर्ज्वा . ब्रेन्डा क्लार्क
मराठी अनुवाद : मंजूषा आमडेकर

(जून २०१० / पान नं.१११ वरून पुढे)

त्याचे मित्र निघून गेल्यानंतर त्यानं तो कॅमेरा त्याला जिथं सापडला होता, तिथंच नेऊन ठेवला.

''हां, आता काही काळजी नाही.'' त्यानं हुश्श केलं. ''आता माझ्यावर कुणीही रागावणार नाही.''

फ्रँकलिन घरी गेला आणि त्यानं मस्तपैकी जेवण केलं.

जेवण झाल्यावर फ्रँकलिनच्या बाबांना गोट्या खेळायची लहर आली. फ्रँकलिननं आपली गोट्यांची पिशवी उलटी केल्यावर त्यातून फिल्म रोल गडगडत बाहेर पडला.

''ते काय आहे?'' फ्रँकलिनच्या बाबांनी विचारलं.

''अं...'' फ्रँकलिन म्हणाला.

तो पुढं काय बोलतोय, ते ऐकण्यासाठी त्याचे बाबा शांतपणे वाट बघायला लागले.

शेवटी फ्रँकलिननं त्यांना सगळी कथा ऐकवली - त्याला कसा तो कॅमेरा सापडला, मग त्यानं फोटो कसे काढले आणि मग पुन्हा तो होता तिथं कसा नेऊन ठेवला, वगैरे.

''याचा अर्थ जी वस्तू तुझी नव्हती, ती तू

वापरलीस?'' त्याच्या बाबांनी विचारलं.

''मी असं मुद्दाम नाही केलं.'' फ्रँकलिन म्हणाला. ''ते आपोआप घडलं.''

''आणि मग आता आपोआप काय घडावं, असं तुला वाटतं?'' त्याच्या बाबांनी विचारलं.

फ्रँकलिननं बराच वेळ विचार करून पाहिला.

''आपण तो कॅमेरा परत घेऊन त्याच्या मालकाला शोधलं पाहिजे.'' शेवटी तो म्हणाला.



त्यामुळं तो आणि त्याचे बाबा पुन्हा जाऊन तो कॅमेरा घरी घेऊन आले. मग कॅमेरा सापडल्याचं कागदांवर लिहून ते कागद बागेत सगळीकडे चिकटवून आले.

त्यांनी आठवडाभर वाट पाहिली, पण तो कॅमेरा आपला असल्याचं सांगायला कुणीही आलं नाही.

मग ते पोलिस स्टेशनवर गेले आणि आपल्याला एक कॅमेरा सापडल्याचं त्यांनी पोलिसांना सांगितलं. पण



तरीही कुणी कॅमेरा घेऊन जाण्यासाठी आलं नाही.

फ्रँकलिननं त्यातली फिल्म धुण्याकरता दिली. मग त्यानं आपल्या साठवलेल्या पैशातून एक नवा रोल विकत आणला आणि तो कॅमेऱ्यात भरला.

दुसऱ्याच दिवशी फोटो मिळाले.

फ्रँकलिननं रकून अस्वलाच्या घरातला फोटो उचलून वर धरला.

"हा कॅमेरा कुणाचा आहे, ते मला माहीत आहे!" तो ओरडून म्हणाला.

"कॅमेरा हरवण्यापूर्वी रकूननं नुकतेच फोटो काढले असतील. मग कदाचित गावाला गेल्यामुळं त्यानं आपण चिकटवलेले कागद वाचले नसतील."

फ्रँकलिननं तो कॅमेरा रकून अस्वलाला नेऊन दिला आणि तो वापरल्याबद्दल त्याची माफी मागितली.

पण रकून त्याच्यावर मुळीच रागावलं नाही. आपला कॅमेरा परत मिळाला हे पाहून ते इतकं खुश झालं होतं, की त्यानं आपल्यातला खाऊ फ्रँकलिनला खायला दिला.

"चीज!" फ्रँकलिन म्हणाला आणि हसायला लागला.

रकूननं पटकन त्याचा एक फोटो काढला.

# चित्र रंगवा



## सुविचार

**परिक्षा म्हणजे स्वत:च्या आत डोकाऊन पाहण्याची संधी!**

# विज्ञान म्हणजे मौज आहे हे सांगणारा
# १२ पुस्तकांचा संच

## चला, प्रयोग करू या!

| | | |
|---|---|---|
| उर्जा | मीना किणीकर | २५ |
| उष्णता | मीना किणीकर | २५ |
| अन्न | मीना किणीकर | २५ |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २५ |
| रसायने | मीना किणीकर | २५ |
| हवा | मीना किणीकर | २५ |
| पदार्थ | मीना किणीकर | २५ |
| अवकाश | मीना किणीकर | २५ |
| हवास्थिती | मीना किणीकर | २५ |
| गती : चलन | मीना किणीकर | २५ |
| ध्वनी | मीना किणीकर | २५ |
| मोजमापे | मीना किणीकर | २५ |

१२ पुस्तकांचा एकत्र संच घेणे आवश्यक आहे.




पोस्टेज ४०रु.

# मुलांसाठी सोप्या वैज्ञानिक प्रयोगांची पुस्तके

## छंदातून विज्ञान




डी. एस. इटोकर

घरातल्या निरुपयोगी वस्तू वापरून वैज्ञानिक उपकरणे कशी करावी, मुलांमधील सर्जनशीलता व सौंदर्यदृष्टी कशी वाढवावी याचे सहजसुंदर विवेचन.

**६०रु. पोस्टेज २०रु.**

## वैज्ञानिक खेळणी




डी. एस. इटोकर

ज्या मुलांना काहीतरी करावेसे वाटते त्यांना मजेमजेची खेळणी या पुस्तकावरून सहज बनवता येतील.

**५०रु. पोस्टेज २०रु.**

## खेळणी विज्ञानाची




डी. एस. इटोकर

मुलांमध्ये वैज्ञानिक खेळण्यांची आवड निर्माण करणारे नवे पुस्तक.

**८०रु. पोस्टेज २०रु.**

## संस्मिता गुप्ते

प्राणी, पक्षी, खेळणी आणि जादू हे विषय सगळ्याच मुलांना आवडतात. या पुस्तकात या सगळ्याच विषयांवरच्या मजेदार गोष्टी आहेत.
या गोष्टींत प्राणी, पक्षी आणि खेळण्यांची मजा तर आहेच, पण त्यातून चांगलं कसं वागावं हेही कळतं. आपल्या आजूबाजूच्या गोष्टींची काळजी घ्यावी, दुसऱ्यांना मदत करावी, कोणालाही त्रास देऊ नये अशा अनेक गोष्टी या 'मजेदार गोष्टी'तून शिकायला मिळतात. या गोष्टींत प्राणी, पक्षी आणि खेळणीसुद्धा बोलतात, त्यामुळे या सगळ्या गोष्टी खऱ्या अर्थाने 'मजेदार' झाल्या आहेत.

**किंमत प्रत्येकी ५०रु. | एकत्रित पोस्टेज ४० रु.**










## अरुंधती महाम्बरे

छोट्टे-मोठ्ठे, प्राणी-पक्षी रुसवा-फुगवा, भांडण-मैत्री सारं काही
तुमच्यासारखं तिथेच जाऊन पहायला हवं चटकन् चला,
पाहूया गंमत दोस्तांना दाखवू जंगल जंमत...






**किंमत प्रत्येकी ५०रु.**
**एकत्रित पोस्टेज २५रु.**

The Secret Seven

# द सीक्रेट सेव्हन

धडाकेबाज छोट्या सात गुप्तहेरांची
१५ पुस्तकांची साहसपूर्ण मालिका...

- द सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम
- शाब्बास, सीक्रेट सेव्हन
- रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन
- आगे बढो, सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी
- सीक्रेट सेव्हनची सरशी
- सीक्रेट सेव्हन झिंदाबाद
- सीक्रेट सेव्हन आणि रहस्य
- सीक्रेट सेव्हन समोर कोडं
- सीक्रेट सेव्हनची आतषबाजी
- 'गुणवान' सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनला धक्का
- सावधान! सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत



**एनिड ब्लायटन | अनु. प्रियंका कुलकर्णी**

किंमत प्रत्येकी ८०रु. | संपूर्ण सेटची किंमत ९९९रु.
एकत्रित पोस्टेज ४० रु.

# ओळखा पाहू



‘यांना अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले आहे.’

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक ५ ऑगस्ट २०१० पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल सप्टेंबर २०१०च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

‘मे’ अंकातील ‘ओळखा पाहू’चे उत्तर

पंडिता रमाबाई यांच्या जीवनावर कादंबरी लिहिणाऱ्या नामवंत लेखिका-ज्योत्स्ना देवधर

स्पर्धेचे विजेते - भीमराव गुंडे - सोलापूर,

रविंद्र सराफ - रावेर, मेधा किराणे, डॉ. मधुकर भिडे - श्रीरामपूर, योगिनी बापट - सांगली, आशिष पचलोड - अमरावती, सुरेखा भुसारी - पनवेल, संभाजी येवले - मधुरा शिंदे - धुळे

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,

**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**

टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना** - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चतुर बोकोबा आणि नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!

पोस्टेज २० रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'शिवणकला–एक छंद'**
(सलवार कमीज । स्कर्ट–ब्लाऊज
इव्हिनिंग गाऊन्स । मिडी)
लेखिका : हेमा कळके
हे ८० रु. चे
पुस्तक भेट !
पोस्टेज २० रु.










**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 July 2010

न
वी
न

# मीरा एक वसंत आहे

जेव्हा दु:खाचा भडिमार होतो तेव्हा सामान्य मनुष्य ईश्वराला दोष देतो, वेठीला धरतो आणि मीरा मात्र ईश्वराचे आभार मानते. 'सर्व मोहपाशातून सुटका केलीस,' असं म्हणते. 'ईश्वराराधना व्हावी म्हणूनच अशी तजवीज केलीस.' असं म्हणते. ती ईश्वराराधनेत कधी रममाण होते, हे तिचं तिलाही कळत नाही. ईश्वराराधना म्हणजे फक्त कृष्णाची आराधना. पंचवीस हजार वर्षांपूर्वी अवतरलेल्या कृष्णावर ती पंचवीस हजार वर्षांनतर स्वत:ला समर्पित करू शकते.




अशा भक्तीला नावं ठेवली जातात. कलंक लावला जातो, जीवे मारण्याचा यत्न केला जातो. तरीही प्रसन्नता, शांतता, सुमधुर हास्य विलासत राहतं. न पाहिलेल्या मीरेचं रूप नजरेसमोर तरळत राहतं. शिल्पकारांनी त्यांच्या कल्पनेनुसार घडवलेली मीरा नजरेसमोर येते आणि वाटून जातं, 'खचितच, मीरा अशीच दिसत असणार. शांत, सुंदर, जगाचं भान नसलेली, कृष्णमय झालेली.'

**ओशो** अनुवाद : **स्वाती चांदोरकर**
**किंमत- १५० रु. पोस्टेज -२५ रु.**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.